सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, दि. १८ सप्टेंबर २०२६ | वर्ष - ४ थे | अंक १५४ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# बीड-पुणे थेट रेल्वेसेवेचा दिमाखदार शुभारंभ; उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते विविध विकासप्रकल्पांचेही भूमिपूजन



**बीड :** मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधत आजचा दिवस बीडकरांसाठी अत्यंत ऐतिहासिक, आनंदाचा आणि अभिमानाचा ठरला आहे. अनेक दशकांपासून प्रतीक्षेत असलेल्या 'बीड-पुणे' थेट रेल्वेसेवेचा शानदार शुभारंभ राज्याच्या उपमुख्यमंत्री आणि बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात आला. या महत्त्वपूर्ण सोहळ्यात "रेल संख्या ०१४०१ प्रस्थान के लिए तयार है" हा आवाज परिसरात घुमताच उपस्थितांमध्ये एकच उत्साह पाहायला मिळाला.

बीडकरांची अनेक वर्षांची प्रतीक्षा संपली

बीड जिल्हा अनेक दशके रेल्वे नकाशापासून दूर राहिल्याने शेतकरी, विद्यार्थी, व्यापारी आणि नोकरदार वर्गाला प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत होता. मात्र, केंद्र व राज्य सरकारच्या सहकार्यातून आज सुरू झालेल्या या थेट रेल्वेसेवेमुळे बीडकरांची प्रतीक्षा संपुष्टात आली आहे.

गेल्या वर्षी १७ सप्टेंबर २०२५ रोजी बीड-अहिल्यानगर रेल्वेसेवा सुरू करताना, पुढील वर्षी बीडकरांना थेट पुण्यापर्यंत प्रवास करता येईल, असा शब्द देण्यात आला होता. आज तोच शब्द पूर्ण करताना मराठवाड्याची कन्या म्हणून विशेष अभिमान वाटत असल्याची भावना उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी व्यक्त केली. तसेच, आगामी काही महिन्यांत बीड ते पनवेल थेट रेल्वेसेवा सुरू करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. बीड-परळी मार्ग पूर्ण झाल्यानंतर हा मार्ग थेट दक्षिण भारताशी जोडला जाईल, ज्यामुळे मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासाला मोठी गती मिळेल, असा विश्वास त्यांनी यावेळी दर्शवला.

**रेल्वेच्या शुभारंभासोबतच बीड शहराच्या वैभवात भर घालणाऱ्या दोन महत्त्वाच्या प्रकल्पांचे भूमिपूजनही मोठ्या उत्साहात पार पडले:**

**यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाचे नूतनीकरण:** स्थानिक कलाकारांसाठी हक्काचे व्यासपीठ असलेल्या या नाट्यगृहाच्या नूतनीकरणासाठी ८ कोटी १९ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. जुन्या भिंती कायम ठेवून येथे अत्याधुनिक ध्वनी व प्रकाश व्यवस्था, साउंड इकोस्टिक, सेंट्रल एसी, आरामदायी आसनव्यवस्था आणि आधुनिक ग्रीन रूम्स उभारण्यात येणार आहेत.(Beed Pune railway inauguration)

**भव्य तारांगण व विज्ञान उद्यान:** धानोरा रस्त्यावरील "पंढरी" येथे सुमारे २८ कोटी रुपये खर्चाचे भव्य तारांगण व विज्ञान उद्यान उभारले जाणार आहे. पहिल्या टप्प्यासाठी १४ कोटी रुपयांना मंजुरी मिळाली असून, येथे विद्यार्थ्यांना मातृभाषेतून कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), आभासी तंत्रज्ञान आणि खगोलशास्त्राचे शिक्षण मिळणार आहे.


मान्यवरांची प्रमुख उपस्थिती आणि पारितोषिक वितरण

या भव्य सोहळ्यासाठी खासदार बजरंग सोनवणे, आमदार प्रकाश सोळंके आणि आमदार विजयसिंह पंडित हे लोकप्रतिनिधी प्रामुख्याने उपस्थित होते. तसेच प्रशासकीय पातळीवर उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कावत आणि विभागीय रेल्वे प्रबंधक राजेशकुमार वर्मा उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले.(Beed Pune railway inauguration)

यावेळी भारतीय रेल्वेचे महाराष्ट्र राज्याच्या विकासातील योगदान या विषयावर आयोजित निबंध आणि चित्रकला स्पर्धेत उत्तीर्ण झालेल्या शाळकरी विद्यार्थ्यांना उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते गौरविण्यात आले. समारोप करताना त्यांनी मराठवाडा मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्यसैनिकांना विनम्र आदरांजली वाहून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना शुभेच्छा दिल्या. बीड जिल्ह्याच्या विकासासाठी शासन कटिबद्ध असल्याची ग्वाही देत या दिमाखदार सोहळ्याची

## राज्यावर 'पाणीटंचाई'चे सावट, टंचाईग्रस्त गावांचा आराखडा तयार करण्याचे निर्देश

**मुंबई:** राज्यातील अनेक भागांत सप्टेंबरचा निम्म्याहून अधिक कालावधी उलटूनही समाधानकारक पाऊस झालेला नसल्याने आगामी उन्हाळ्यात पाणीटंचाईची शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने ऑक्टोबर २०२६ ते जून २०२७ या कालावधीसाठी टंचाई कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश दिले आहेत. संभाव्य पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी गाव आणि वाड्यांची यादी तयार करून उपाययोजनांचे नियोजन करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. राज्य मंत्रिमंडळाच्या मंगळवारी झालेल्या बैठकीत पिके आणि पाण्याच्या परिस्थितीचा आढावा घेण्यात आला होता. पावसाने ओढ दिल्याने टंचाई निवारणाच्या उपाययोजना सुरू करण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली होती. त्यानंतर पाणीपुरवठा विभागाने टंचाई कृती आराखडा तयार करण्यासंदर्भात शासन परिपत्रक जारी केले. त्यानुसार आगामी उन्हाळ्यात पाणीटंचाईची शक्यता असलेल्या गावांची आणि वाड्यांची यादी तयार करण्याची जबाबदारी तहसीलदार आणि गटविकास अधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे. या दोन्ही अधिकाऱ्यांनी संयुक्त अहवाल तयार करून तो ऑक्टोबरमध्ये जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करायचा आहे.




## संजय लाठकर यांची अणुऊर्जा विभागाच्या महासंचालकपदी नियुक्ती

**मुंबई :** मराठवाड्यातील संजय आनंदराव लाठकर यांच्यावर देशाच्या अणुऊर्जा क्षेत्राशी संबंधित सुरक्षेची महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. लातूरचे माजी पोलीस अधीक्षक आणि नांदेडचे रहिवासी असलेल्या लाठकर यांची केंद्र सरकारच्या अखत्यारीतील अणुऊर्जा विभागाच्या महासंचालकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. देशातील अणुऊर्जा केंद्रे, संबंधित संस्था तसेच किरणोत्सारी पदार्थांच्या साठ्यांच्या सुरक्षेचे व्यवस्थापन त्यांच्या अखत्यारीत राहणार आहे.

लाठकर यांच्या नेतृत्वाखाली देशभरातील ५०हून अधिक अणुऊर्जा केंद्रे आणि संबंधित संस्थांच्या सुरक्षेशी निगडित व्यवस्था तसेच युरेनियमसारख्या किरणोत्सारी पदार्थांच्या साठ्यांच्या सुरक्षेशी संबंधित जबाबदाऱ्या पार पाडल्या जाणार आहेत. मराठवाड्यातील अधिकाऱ्याला प्रथमच या पातळीवरील महत्त्वाची जबाबदारी मिळाली आहे.

संजय लाठकर हे १९९५च्या तुकडीचे झारखंड केडरचे भारतीय पोलीस सेवेतील अधिकारी आहेत. प्रदीर्घ सेवाकाळात त्यांनी महाराष्ट्रासह



विविध राज्यांमध्ये महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. मराठवाड्यात त्यांनी लातूर आणि परभणीचे पोलीस अधीक्षक म्हणून काम केले. त्यानंतर पुण्यात अप्पर पोलीस आयुक्त म्हणूनही त्यांनी जबाबदारी पार पाडली. महाराष्ट्रातील दहशतवादविरोधी पथकात पोलिस उपमहानिरीक्षक म्हणूनही त्यांनी काम केले आहे.

गडचिरोली, मुंबई तसेच झारखंडमध्ये केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या उपमहानिरीक्षकपदाची जबाबदारीही लाठकर यांनी सांभाळली आहे. कर्नाटक, हैदराबाद, राजस्थान आणि मध्य प्रदेशातील केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या प्रमुखपदाची जबाबदारी त्यांनी पार पाडली आहे.

लाठकर यांच्या सेवाकाळातील कामगिरीची दखल विविध स्तरांवर घेण्यात आली आहे. त्यांना राष्ट्रपतींची तीन आणि केंद्रीय गृहमंत्र्यांची तीन पदके मिळाली आहेत. महाराष्ट्र, बिहार आणि

## जि. प. 'नाशिक ते नासा', निवडणार 105 'ज्ञानयात्री'

**नाशिक :** जिल्हा परिषद नाशिकच्या 'मिशन स्कॉलरशिप' अंतर्गत 'ज्ञानयात्री' हा अभिनव शैक्षणिक सहल उपक्रम राबविण्यात येणार आहे.इयत्ता सातवीच्या सुमारे १५ हजार विद्यार्थ्यांची विशेष निवड परीक्षा घेऊन गुणवत्तेच्या आधारे १०५ विद्यार्थ्यांची अंतिम निवड केली जाणार असल्याची माहिती राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी जिल्हा परिषदेत पत्रकार परिषदेत दिली.

## शेतात अचानक वीज कोसळली; तिघींचा दुर्दैवी मृत्यू

तभा वृत्तसेवा

**कन्नड :**दि.१७ सप्टेंबर - तालुक्यातील पिशोर शिवारातील राशा टेकडीजवळ शेतात असताना अचानक वीज कोसळल्याने तीन महिलांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना गुरुवारी (दि. १७) दुपारी घडली. या घटनेमुळे शफेपुर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

तसलिमबी मुक्तार सैय्यद (वय ४०), फरजाना हामीद सैय्यद (वय ४०) आणि अलविरा हनिफ सैय्यद (वय १६), सर्व रा. शफेपुर, पिशोर, ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर, अशी मृतांची नावे आहेत.



गुरुवारी दि. १७ सप्टेंबर रोजी दुपाराच्या सुमारास या तिन्ही महिला पिशोर शिवारातील राशा टेकडीजवळील शेतात होत्या. यावेळी परिसरात अचानक पावसाला सुरुवात झाली. पावसासोबत अचानक वीज कोसळल्याने तिन्ही महिलांचा मृत्यू झाला.

घटनेनंतर तिन्ही महिलांना ग्रामीण रुग्णालय, पिशोर येथे नेण्यात आले. मात्र, वैद्यकीय तपासणीनंतर त्यांचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. या घटनेची पिशोर पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून, पुढील तपास सुरू आहे. अचानक घडलेल्या या दुर्घटनेत एकाच परिसरातील तीन महिलांचा मृत्यू झाल्याने शफेपुरसह पिशोर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## 'दहा लाख दे, नाहीतर जीव घेऊ '; धमक्यांनंतर बाभुळगावात तरुणाची आत्महत्या !

### आरोपीतांना अभय , मोबाईल रिसेट केल्याचा पोलिसांवर गंभीर आरोप

सिल्लोड ( प्रतिनिधी )

छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलीस हद्दीतील वडोद बाजार पोलीस ठाणे हद्दीतील बाभूळगाव परिसरात एका तरुणाच्या आत्महत्येप्रकरणी गंभीर आरोप करण्यात आल्याने खळबळ उडाली आहे. सततच्या धमक्या, मानसिक छळ, खंडणीची मागणी आणि जीवे मारण्याच्या धमक्यांमुळेच आपल्या भावाने आत्महत्या केल्याचा दावा मृताच्या भावाने पोलीस अधीक्षकांकडे केलेल्या तक्रारीत केला आहे. विशेष म्हणजे, आत्महत्येनंतर पोलिसांनी ताब्यात घेतलेला मृत तरुणाचा मोबाईल 'रिसेट/फॉरमॅट' करून त्यातील संभाव्य डिजिटल पुरावे नष्ट केल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला आहे.

अर्जदार विष्णू शिवाजी फरकाडे यांनी २५ मे रोजी पोलीस अधीक्षक, ग्रामीण छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांचा भाऊ नवनाथ शिवाजी फरकाडे याचे एका विवाहित महिलेसोबत परस्पर संमतीने प्रेमसंबंध होते. ही बाब उघडकीस आल्यानंतर गावातील पंच व प्रतिष्ठित व्यक्तींच्या मध्यस्थीने प्रकरण मिटविण्यात आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.



मात्र, त्यानंतर संबंधित महिलेच्या कुटुंबीयांकडून नवनाथला कथितरीत्या वारंवार त्रास देण्यात येत होता, असा आरोप करण्यात आला आहे. 'तुला जिवंत सोडणार नाही', 'कायमचा बंदोबस्त करू', 'दहा लाख रुपये दे, नाहीतर जीव घेऊ', तसेच बलात्काराचा गुन्हा दाखल करण्याची धमकी दिल्याचा दावा तक्रारदाराने केला आहे.

तक्रारीनुसार, १७ मे रोजी रात्री सुमारे ११ वाजता काही व्यक्ती घरात आल्या आणि शिवीगाळ करून कुटुंबाला धमकावल्याचा आरोप आहे. या सततच्या धमक्या व मानसिक दबावामुळे नवनाथ मानसिकदृष्ट्या खचला आणि दुसऱ्या दिवशी, १८ मे रोजी सकाळी सुमारे ७ वाजता त्याने आत्महत्या केल्याचा दावा करण्यात आला आहे.

मोबाईल रिसेट झाल्याचा आरोप; तपासावरच प्रश्नचिन्ह

या प्रकरणाला आणखी गंभीर वळण देणारी दुसरी तक्रार विष्णू फरकाडे यांनी १६ जून रोजी पोलीस अधीक्षकांकडे दिली आहे. आत्महत्येच्या पंचनाम्यावेळी पोलिसांनी नवनाथचा मोबाईल आणि काही कागदपत्रे ताब्यात घेतल्याचे त्यात म्हटले आहे. मोबाईलमध्ये कॉल रेकॉर्डिंग, संदेश आणि इतर डिजिटल पुरावे असण्याची शक्यता तक्रारदाराने व्यक्त केली आहे.

तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, त्यांनी पोलीस अधीक्षक कार्यालयात धाव घेतल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांना त्यांच्या समक्ष मोबाईल उघडण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. मात्र, त्यानंतर पोलिसांनी मोबाईल 'रिसेट/फॉरमॅट' केल्याने महत्त्वाचे डिजिटल पुरावे नष्ट झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

बीट जमादार खाकरे व गायकवाड या पोलीस कर्मचाऱ्यांनी तपासात आरोपींना साथ देऊन प्रकरण कमकुवत करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोपही तक्रारीत करण्यात आला आहे. त्यामुळे संबंधित पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुद्ध चौकशी करून कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, आत्महत्येस प्रवृत्त करणे, खंडणीची मागणी, जीवे मारण्याची धमकी आणि इतर आरोपांची सखोल चौकशी करून संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी तक्रारदाराने केली आहे. या आरोपांबाबत पोलिसांची भूमिका विचारली असता संबधित प्रकरणी जाब जबाब घेऊन प्रकरण वरिष्ठांकडे मार्गदर्शनासाठी ठेवण्यात आले आहे असे बीट जमादार खाकरे यांनी सांगितले



सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

# गुरुकृपात भव्य राज्यस्तरीय पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धा उत्साहात पार

## ‘पोस्टर’मधून दिसली भविष्यातील फार्मसीची दिशा!

**माजलगाव :** विद्यार्थ्यांच्या संशोधनवृत्तीला चालना देत त्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पनांना राज्यस्तरीय व्यासपीठ मिळवून देण्यासाठी गुरुकृपा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, माजलगाव यांच्या वतीने आयोजित सहावी राज्यस्तरीय पोस्टर प्रेझेंटेशन ( भित्तीपत्रक सादरीकरण ) स्पर्धा मोठ्या उत्साहात संपन्न झाली. या स्पर्धेचे उद्घाटन प्रा. प्रकाश राजेभोसले आणि सौ. नंदिनी राजेभोसले यांच्या शुभ आशीर्वादाने रिबीन कापून झाले. महाराष्ट्रातील विविध फार्मसी महाविद्यालयांतील शेकडो विद्यार्थ्यांनी 94 संघाच्या माध्यमातून या स्पर्धेत सहभाग घेत विविध वैज्ञानिक व संशोधनात्मक विषयांवरील पोस्टर्स प्रभावीपणे सादर केली.

बक्षीस वितरण समारंभात फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. अमित बिंदू यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली. तसेच या कार्यक्रमास डॉ . रंगनाथ गोळेकर, पत्रकार श्री. पांडुरंग उगले यांची प्रमुख उपस्थित लाभली. गुरुकृपा सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष डॉ. यशवंत राजेभोसले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून अध्यक्षीय समारोप केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैभवी लोखंडे आणि शितल गोपाळघरे या विद्यार्थिनींनी केले व आभार प्रदर्शन प्रा. गणेश वाघमारे यांनी केले.




या स्पर्धेत बी.फार्मसी गटात के. टी. पाटील कॉलेज, धाराशिव येथील श्रद्धा साळगरे यांनी प्रथम क्रमांक पटकावला. गुरुकृपा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, माजलगाव येथील सानिया पठाण हिने द्वितीय क्रमांक मिळवून गौरव वाढविला. तर डीजेपीएस कॉलेज, पाथरी येथील वैष्णवी काळे व सोनाली वाघमारे यांनी तृतीय क्रमांक पटकावला. विजेत्या विद्यार्थ्यांना प्रथम,द्वितीय आणि तृतीय क्रमांकास अनुक्रमे 7000, 5000, 3000 रुपये असा रोख धनादेश, प्रमाणपत्र आणि सन्मान चिन्ह देऊन गौरवण्यात आले. तसेच डी.फार्मसी गटात दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी, लातूर येथील शेख सानिया व शेख तस्मिया यांनी प्रथम क्रमांक मिळविला. चन्नबसवेश्वर कॉलेज ऑफ फार्मसी, लातूर येथील पटेल शिफा व वैभवी धनश्री यांनी द्वितीय क्रमांक मिळविला. तसेच आदित्य डिप्लोमा फार्मसी कॉलेज, बीड येथील गजानन गोरे व लबासे भागवत यांनी तृतीय क्रमांक पटकावला. प्रथम,द्वितीय आणि तृतीय क्रमांकास अनुक्रमे 5000, 3000, 2000 रुपये असा रोख धनादेश, प्रमाणपत्र आणि सन्मान चिन्ह देऊन गौरवण्यात आले. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना संशोधन, वैज्ञानिक विचारसरणी, सादरीकरण कौशल्य आणि नाविन्यपूर्ण कल्पनांना व्यासपीठ मिळाले. विशेषतः माजलगावसारख्या शहरात राज्यस्तरीय फार्मसी उपक्रमाचे आयोजन झाल्याने शैक्षणिक क्षेत्रातून गुरुकृपा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीच्या उपक्रमाचे कौतुक होत आहे. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी फार्मसी महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापकवर्ग व सर्व सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# स्वा. सावरकर महाविद्यालयात पानाचे पारंपारिक विडे करण्याची कार्यशाळा



बीड ( प्रतिनिधी) योग्य पद्धतीने तयार केलेले नागवेलीचे पान हे शरीरासाठी आरोग्यदायी आहे. महालक्ष्मी पूजनासाठी पानाचे पारंपारिक पद्धतीने दहा प्रकारचे खायचे वीडे तयार करण्याची कार्यशाळा स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयात संपन्न झाली.

महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर यांनी कार्यशाळेच्या सुरुवातीला पानाचे आयुर्वेदिक महत्त्व आणी उपयोग समजून सांगितले. पाचन तंत्र, मधुमेह, भूक लागणे, डोकेदुखी मायग्रेन, अंग खाजवणे, चेहऱ्यावरचे डाग, निद्रानाश इत्यादी आजारावर पानाचा औषध म्हणून वापर करतात. महालक्ष्मी पूजनात पानाला महत्त्व आहे पानाचे विडे महालक्ष्मी साठी पारंपारिक पद्धतीने तयार केले जातात. हे विडे कसे तयार करायचे याचे मार्गदर्शन डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर यांनी केले आणी सहभागी प्रशिक्षकांना विडे कसे तयार करण्याचे हे शिकवले. साधा विडा, खन विडा, अधिक वीडा, वळकटी विडा, नारायण विडा, पट्टी विडा, गोविंद विडा, पुडी विडा, कुलूप किंवा पर्स विडा असे वेगवेगळे विडे त्यांनी तयार करून दाखवले. डॉ. रूपाली कुलकर्णी, प्रा. दीपा देशपांडे, प्रा.रुचिरा ढेरे, डॉ. अनुजा कास्तीकर, प्रा.स्वाती कुलकर्णी, मनीषा धारूरकर, अलका कुलकर्णी यांच्या सह महाविद्यालयातील विद्यार्थी प्राध्यापक कार्यशाळेत सहभागी झाले होते.

# मराठवाडा मुक्ती संग्राम दिन डॉ. बाबासाहेब ओबेडकर विद्यालयामध्ये उत्साहात संपन्न !

**बीड (प्रतिनिधी):-** येथील आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचलित डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेचे अध्यक्ष बी.एस. धुतालमल यांच्या शुभहस्ते ॲड.व्ही.बी.मगर आणि संचालक राम शिंदे, लक्ष्मण शिंदे, व्ही. जी.आव्हाड, सेवानिवृत्त मुख्याधापक बी.ए. हावळे व नवनिर्वाचीत मुख्याधापक एस.बी.मेश्राम यांच्या प्रमुख उपस्थितीत ध्वजारोहन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमाच्या प्रारंभी महात्मा गांधी, भारतरत्न डॉ. बाबासाहेब. आंबेडकर आणि स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांची प्रभात फेरी शालेय परिसरात काढण्यात आली. या प्रसंगी शासनाच्या आदेशानुसार मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाच्या अनुषंगाने वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात प्राथमिक गटातून ‘बीड जिल्ह्याची मराठवाडा मुक्ती संग्रामात कामगीरी’ व माध्यमिक गटातून ‘बीड जिल्ह्यात सद्यास्थितीत असणारी आव्हाने आणि करावयाची कामगिरी’ या विषयावर कु.आरुषी धुतालमल, कु.पुजा भागवत, कु.आरती भागवत, चि. प्रदुम्न घुले, या विद्यार्थ्यांनी वकृत्व केले. या प्रसंगी माजी मु.अ तथा संचालक व्हि.जी. आव्हाड यांनी मराठवाडा मुक्ती संग्रामाचा लढा या विषयावर आपले विचार प्रतिपादन केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आर. बी. घुले (स.शि.), श्रीमती एन.जी मुंडे, श्रीमती शिंदे एस.एस. यांनी प्रयत्न केले. तसेच या प्रसंगी आनंद छात्रालयाचे अधिक्षक डी.व्ही. खरसाडे हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संचालन पवळ यु.बी. यांनी केले व प्रास्ताविक शाळेचे मु.अ.एस.बी. मेश्राम यांनी केले. आभार प्रदर्शन आर बी. घुले यांनी केले. या प्रसंगी शिक्षकेत्तर कर्मचारी व बहुसंख्य विद्यार्थी पालक उपस्थित होते.

# धरणाच्या उंचीवाढीविरोधात युवा शेतकरी संघर्ष समितीचे शेकडो शेतकऱ्यांसह धरणात उतरून जलसमाधी आंदोलन

**माजलगाव, (प्रतिनिधी):-** माजलगाव धरणाची उंची वाढविण्याच्या निर्णयाविरोधात युवा शेतकरी संघर्ष समितीच्या नेतृत्वाखाली

आज १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी धरणग्रस्त शेतकऱ्यांनी धरणात उतरून जलसमाधी आंदोलन केले.

धरणाच्या उंचीवाढीमुळे २२ गावांतील शेतकरी व ग्रामस्थांच्या जमिनी, घरे आणि गावांवर नांगर फिरणार असल्याची युवा शेतकरी संघर्ष समितीचे फरताडे यांनी सांगितले

माजलगाव धरणाच्या

उंची वाढीमुळे बावीस गावच्या शेतकऱ्यांवर संक्रात

येण्याची शक्यता असल्याचा आरोप करत युवा शेतकरी संघर्ष समितीच्या आंदोलकांनी शासनाच्या निर्णयाविरोधात तीव्र संताप व्यक्त केला. त्यामुळे धरणाच्या उंचीवाढीचा मुद्दा आता अधिक तीव्र बनला आहे.

युवा शेतकरी संघर्ष समितीच्या कार्यकर्त्यांनी शासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत मराठवाडा मुक्ती दिनी माजलगाव धरणाच्या पाण्यात उतरून



आंदोलन सुरू केले. पैठण धरणाच्या धर्तीवर माजलगाव धरणातील गाळ, दगड गोटे काढून पाणीसाठ्याची क्षमता वाढविण्याचा पर्याय असताना धरणाची उंची वाढविण्याचा निर्णय का घेतला जात आहे? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. धरणाच्या उंचीवाढीबाबत प्रशासनाच्या दोन पत्रांमुळे शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाल्याचा आरोप समितीने केला आहे. ९ सप्टेंबरच्या पत्रात उंचीवाढीमुळे जमिनी संपादित केल्या जाऊ शकतात, असे नमूद असल्याचा दावा आंदोलकांनी केला आहे. उंचीवाढीमुळे २२ गावांतील नागरिकांवर विस्थापनाचे संकट ओढवू शकते, अशी भीती व्यक्त करण्यात आली आहे. हा प्रश्न केवळ शेतजमिनीचा नाही. आमची घरे आणि गावेही पाण्यात जाण्याचा धोका आहे. २२ गावांतील ग्रामस्थ हा अन्याय कदापि सहन करणार नाहीत. अशी आक्रमक भूमिका युवा शेतकरी संघर्ष समितीने घेतली आहे. दरम्यान प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या बाजूने छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष मोहनराव जगताप, बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे, भाजपाचे नितीन नाईकनवरे, माकपचे मोहन जाधव, आझाद क्रांती सेनेची राजेश घोडे, इत्यादींचं अनेकांनी आंदोलनात सहभागी होत युवा शेतकरी संघर्ष समितीची बाजूने भूमिका घेतली आहे.

लोकप्रतिनिधीच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केला आहे. जलसमाधी आंदोलन सुरू झाल्याने माजलगाव धरण परिसरात वातावरण तणाव निर्माण झाला. दुपार नंतर प्रशासनाने ठोस आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

आंदोलन स्थळी काही अघटीत घटना घडू नये म्हणून एन.डी.आर.यफची टीम पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# तुलसी इंग्लिश स्कूलमध्ये मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन उत्साहात साजरा

**बीड, दि. १७ (प्रतिनिधी) :** देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी इंग्लिश स्कूल, बीड येथे गुरुवार (दि. १७) रोजी मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने करण्यात आली. त्यानंतर, विशेष पाहुण्या अजिजपुरा क्लस्टरच्या क्लस्टर हेड शेख सलमा बेगम अब्दुल रशीद यांच्या हस्ते सकाळी ठीक ७.४५ वाजता शाळेच्या प्रांगणात ध्वजारोहण सोहळा संपन्न झाला. ध्वजवंदनानंतर राष्ट्रगीत व देशभक्तीपर गीतांच्या जयघोषाने परिसर भारावून गेला.

याप्रसंगी शाळेच्या प्राचार्या उमा जगतकर यांनी स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाचे स्मरण करत उपस्थितांना मुक्तिसंग्राम दिनाच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बीड जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करून तातडीची मदत करा- रमेश भिसे



केज/प्रतिनिधी

मराठवाड्यात बीड जिल्हा हा सतत दुष्काळाच्या छायेत येतो इथले जीवनमान हे शेती वरती अवलंबून असून शेती ही निसर्गाच्या अवेळी पडणाऱ्या पावसाचा पाण्यावरती अवलंबून आहे शेतीव्यतिरिक्त उत्पन्नाचे व जगण्याचे काहीही साधन लोकांकडे उपलब्ध नाही त्यामुळे दरवर्षी 60 टक्के लोक ऊसतोड कामगार म्हणून स्थलांतरित होतात

मात्र खरिपाचे पीक संपूर्ण पदरात घेऊन लोक स्थलांतरित दरवर्षी होतात यावर्षी सुरुवातीला थोडासा पाऊस झाला आणि लोकांनी शंभर टक्के खरीपाची पेरणी ज्यामध्ये तूर मूग उडीद बाजरा हे पीक पेरली गेली दीड महिना अजिबात पाऊस नाही शास्त्रज्ञाचे व इतरांचे सर्व अंदाज फेल गेले त्यामुळे खरिपाची सर्व पीक उध्वस्त झाली वाया गेली जरी पाऊस थोडाफार झाला तरी रब्बी साठी शेती दुरुस्त करणे शेतकऱ्यांना शक्य नाही आणि पाऊस होण्याचेही चिन्ह दिसत नाहीत. गावागावातील नदी नाले विहिरी पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत तलाव हे कोरडे ठाक असून अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचे भयंकर संकट सध्या उभा राहिलेला आहे बीड जिल्ह्यात पाण्याची पातळी पाचशे फुटाच्या खाली गेलेली असून तिथेही पाणी लागण्याचे शाश्वती नाही

त्यामुळे शासनाने तातडीने मराठवाड्यातील बीड जिल्ह्यातील दुष्काळाच्या प्रश्नावर ती लक्ष घालून गावात पिण्याचे पाण्याची सोर्स उपलब्ध करून देणे तसेच जनावरांना चारा ज्यांच्या घरात खायला काही नाही त्यांना धान्य तसेच मनरेगाची काम गावात सुरू करावीत व भविष्यात दुष्काळाचा सामना करण्यासाठी पाण्याची पातळी वाढण्याच्या दृष्टिकोनातून नदी नाले खोलीकरण रुंदीकरण व सरळीकरण तसेच तलावातील गाळ काढून शेतीला देणे या पद्धतीची काम मोठ्या प्रमाणात हाती घेणे गरजेचे आहे .

# आश्वासनाची पूर्ती ; ना. पंकजाताई मुंडेंनी मानले केंद्रीय मंत्री नितीन गडकरींचे आभार

**बीड।दिनांक १६।:** परळी मतदारसंघातील बर्दापूर ते लोखंडी सावरगांव रस्ता रुंदीकरणाला आता गती येणार असून यासाठी १०४ कोटीची निविदा तरतूद आराखड्यात करण्यात आली आहे, या कामासाठी जनतेला दिलेल्या आश्वासनाची पूर्ती केल्याबद्दल राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांचे आभार मानले आहेत.

निवडणुक प्रचाराच्या वेळी ना. पंकजाताई मुंडे यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या सभेत बर्दापुर ते लोखंडी सावरगाव रस्त्याचे रुंदीकरण करावे अशी मागणी केली होती, हा रस्ता अरूंद असल्याने यावर वारंवार अपघात झाले होते, त्यामुळे ही मागणी पुढे आली होती, यावर गडकरी यांनी रस्त्यासाठी लवकरच निधी देऊन काम सुरू करू असे आश्वासन दिलं होते. ना.पंकजाताईंनी या मागणीसाठी गडकरी यांची काही महिन्यापुर्वी दिल्ली येथे भेटही घेतली होती.

रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय, भारत सरकार यांच्या २०२५-२६ च्या वार्षिक आराखड्यात बर्दापूर ते लोखंडी सावरगांव या एकूण १८ किमी लांबीच्या चौपदरीकरणाचा समावेश अधिकृतपणे करण्यात आला होता. आता या कामासाठी १०४ कोटींची निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे, त्यामुळे हया रस्त्याचे लवकरच रुंदीकरण होणार आहे, दरम्यान, जनतेला दिलेल्या आश्वासनाची पूर्ती केल्याबद्दल ना. पंकजाताईंनी गडकरींचे आभार मानले आहेत.

# बीड लोकसभा शिवसेनेचे संपर्कप्रमुख अशोकजी सकपाळ साहेब यांचा उपस्थितीत केज येथे बैठक संपन्न



**केज :** शिवसेना पक्षप्रमुख माननीय उद्धवजी ठाकरे साहेब युवा सेना प्रमुख आदित्य ठाकरे साहेब यांच्या आदेशावरून सोमवार दिनांक 14-09-2026 रोजी बीड जिल्ह्यातील परळी विधानसभा व केज विधानसभा पदाधिकारी बैठक शिवसेना नेते अंबादास दानवे साहेब उपनेते तथा मराठा वाडा समन्वयक विश्वनाथ नेरुरकर साहेब उपनेत्या माननीय सुषमाताई अंधारे यांच्या मार्गदर्शनाखाली व बीड लोकसभा संपर्कप्रमुख अशोक सकपाळ साहेब व मा . जिल्हा प्रमुख रत्नाकर शिंदे यांच्या उपस्थितीत संपन्न झाली सदरील बैठक ही नवनिर्वाचित बीड लोकसभा संपर्कप्रमुख अशोकजी सपकाळ साहेब यांचे मा. जिल्हाप्रमुख रत्नाकर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली केज विधानसभा व परळी विधानसभा यांच्या वतीने जंगी स्वागत करण्यात आले. तालुका निहाय पदाधिकारी ची चर्चा नवीन शाखाप्रमुख नियुक्ती रिक्त पदाची नियुक्ती व बी एल ए ची नियुक्ती पडताळणी यांच्या आढावा घेण्यात आला तसेच तालुका निहाय शिवसेना महिला आघाडी युवा सेनेच्या सर्व पदाधिकारी सोबत पक्ष संघटना वाढीव बाबत अनमोल अशी चर्चा करण्यात आली तसेच पक्ष वाढीव करिता प्रत्येक पदाधिकाऱ्यांनी आपली मांडणी करून येणाऱ्या काळात पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे साहेब यांच्या हात बळकट करण्यासाठी सर्व पदाधिकारी ग्राउंड वर काम करून आपल्या अहवाल बीड लोकसभा संपर्कप्रमुख यांच्याकडे सादर करणार आहेत.केज व परळी विधानसभा मतदारसंघातील सर्व उपजिल्हा प्रमुख तालुका प्रमुख महिला आघाडी .शहर प्रमुख सर्व पदाधिकारी शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते....

# स्वातंत्र्य टिकवणे आणि संवर्धन करणे ही सर्वांची जबाबदारी : प्रा.डॉ. विजयकुमार बांदल

## तुलसी महाविद्यालयात मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन साजरा

**बीड, दि. १७ (प्रतिनिधी) :** जगण्यासाठी माणसाला जसा श्वास अत्यंत महत्त्वाचा असतो, तितकेच मानवी जीवनात स्वातंत्र्याचे मोल आहे. स्वातंत्र्य सहज किंवा सहजासहजी मिळालेले नाही, तर त्यामागे अनेक स्वातंत्र्यसैनिकांचा प्रदीर्घ संघर्ष, त्याग आणि मोठे बलिदान आहे. त्यामुळे अनेक हुतात्म्यांच्या बलिदानातून मिळालेले हे स्वातंत्र्य टिकवणे, त्याचे रक्षण करणे आणि त्याचे योग्य संवर्धन करणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन गुरुकुल महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. विजयकुमार बांदल यांनी केले.

बीड येथील देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयात आयोजित ७८ व्या मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या सोहळ्यात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

सोहळ्याची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने झाली. त्यानंतर विशेष पाहुणे प्रशासकीय अधिकारी डी. डी. राऊत यांच्या हस्ते सकाळी ७.४५ वाजता महाविद्यालयाच्या प्रांगणात ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजवंदनानंतर राष्ट्रगीत, वंदे मातरम् आणि महाराष्ट्र गीताच्या जयघोषाने महाविद्यालयाचा संपूर्ण परिसर देशभक्तीच्या वातावरणाने भारावून गेला.

या प्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना डॉ. नंदकुमार उघाडे यांनी मराठवाडा निजामाच्या राजवटीतून मुक्त का करावा लागला, यामागील ऐतिहासिक घटनाक्रमाचा आढावा घेत या संघर्षात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बजावलेल्या महत्त्वपूर्ण भूमिकेवर प्रकाश टाकला. तसेच डॉ. बाळासाहेब कटारे यांनी स्वातंत्र्याचा इतिहास आणि त्याचे मोल नव्या पिढीने सदैव जपले पाहिजे, असे आवाहन केले. प्रा. दीपक जमदाडे यांनी निजामाच्या जुलमी राजवटीविरोधातील लढा व मराठवाड्याच्या मुक्तीची ऐतिहासिक पार्श्वभूमी विशद करत मुक्तिसंग्राम दिनाच्या शुभेच्छा दिल्या, तर महाविद्यालयाचे प्राचार्य डी. जी. निकाळजे यांनीही सर्वांना या ऐतिहासिक दिनानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

# खो -खो स्पर्धेत समर्थ माध्यमिक विद्यालय तरनळी चा संघ तालुक्यात प्रथम

केज/प्रतिनिधी

क्रीडा व युवक कल्याण मंत्रालयामार्फत आयोजित शैक्षणिक वर्ष 2026-2027क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.तालुका स्तरीय खोखो 17 वर्ष वयोगटातील 'समर्थ माध्यमिक विद्यालय तरनळी' मुलीच्या संघाने नेत्रदीपक कामगिरी केली. दिनांक 16/9/2026 रोजी आयोजित तालुका स्तरीय खोखो स्पर्धेत 17 वर्ष वयोगटातील मुलींच्या संघाने तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवत जिल्हा स्तरावर प्रवेश मिळवला तसेच 14 वर्ष वयोगटातील मुलींच्या संघाने तालुक्यात उपविजेते मिळवले.तसेच तालुकास्तरीय 17 वर्ष वयोगट मुली बुद्धिबळ स्पर्धेत अदिती सरवदे व संघवी सरवदे यांनी बाजी मारत जिल्हा स्तरावर प्रवेश मिळवला त्याचप्रमाणे बॅडमिंटन स्पर्धेत विद्यार्थिनींनी



उपविजेते पद मिळवले. या यशाबद्दल बीड जिल्ह्याचे खासदार मा.श्री बजरंग बप्पा सोनवणे साहेब यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.संस्थेच्या अध्यक्षा माननीय सौ.सारिका ताई सोनवणे, संस्थेचे सचिव ॲड कांदे साहेब,तालुका क्रीडा अधिकारी सौ राखी मॅडम,गटशिक्षणाधिकारी साहेब,मुख्याध्यापक श्री कुलकर्णी सर,क्रीडा शिक्षक श्री जोगदंड सर,श्री सोनवणे सर,श्री काकडे सर श्री धायगुडे सर,श्री डाके सर श्री थळकरी सर,श्रीमती तरकसे मॅडम, श्रीमती काळे मॅडम,श्री अंजान सर,श्री सरवदे, श्री मंदे श्री सुरवसे तसेच गावातील पालक व प्रतिष्ठित नागरिक यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# रणवीर बेद्रे याने जिल्हा स्तर बॉक्सिंग स्पर्धेत सुवर्णपदक



गेवराई ,दि. १६( प्रतिनिधी)- राजारामबापू पाटील मिलिटरी स्कूल अँड स्पोर्ट्स अकॅडमी ईश्वरपूर यांच्या वतीने नुकत्याच घेण्यात आलेल्या आंतरशालेय जिल्हास्तर एमॅच्युअर बॉक्सिंग स्पर्धेत गेवराई येथील सामाजिक कार्यकर्ते राजकुमार बेदरे यांचे चिरंजीव रणवीर यांनी सुवर्णपदक पटकावले आहे. जिल्हास्तरीय बॉक्सिंग स्पर्धा ईश्वरपूर येथील सयाजीराव यादव बॉक्सिंग क्लब येथे नुकत्याच संपन्न झाल्या .या स्पर्धेतून 17 वर्षे वयोगटातील 80 किलो प्लस किलो वजन गटातील बॉक्सर रणवीर राजकुमार बेद्रे यांनी जोरदार फाईट करून सर्वाधिक गुण मिळवत जिल्हास्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत सुवर्णपदक मिळवले .त्यामुळे 24 व 25 सप्टेंबर 2026 दरम्यान सातारा येथे होणाऱ्या विभागीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी रणवीर बेदरे याची निवड झाली आहे. या निवडीबद्दल राजारामबापू पाटील मिलिटरी स्कूल अँड स्पोर्ट्स अकॅडमीचे संस्थापक विनायकराव पाटील, सचिव मनीषाताई पाटील, प्राचार्य अशोक करे, प्रशिक्षक दीपक गिरासे यांनी अभिनंदन केले. राजकुमार बेद्रे यांचे चिरंजीव रणवीर बेद्रे यांच्या या यशाबद्दल बीड जिल्ह्यात अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

## ‘सा रे ग म प’चे नवे पर्व 19 सप्टेंबरपासून 100 हून अधिक संगीतकारांसह रंगणार भव्य संगीतसोहळा

**मुंबई :** झी टीव्हीचा लोकप्रिय गायन रिॲलिटी शो ‘सा रे ग म प’ नव्या भव्य पर्वासह १९ सप्टेंबरपासून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. ‘हिंदुस्तान का संगीतस्थान’ या संकल्पनेवर आधारित हा कार्यक्रम दर शनिवार आणि रविवारी रात्री ९.३० वाजता झी टीव्ही तसेच हिंदी झी५वर प्रसारित होईल.

मुंबईत झालेल्या पत्रकार परिषदेत नव्या पर्वाची घोषणा करण्यात आली. यावेळी ३६० अंशांचा अत्याधुनिक भव्य सेट आणि कार्यक्रमाच्या संकल्पनेची झलक सादर करण्यात आली. भारतीय संगीत रिॲलिटी शोच्या इतिहासात प्रथमच अशा प्रकारचा सेट उभारण्यात आला असून, १०० हून अधिक संगीतकार आणि विशाल कोरस समूहाच्या सहभागामुळे प्रेक्षकांना थेट संगीत मैफलीचा अनुभव मिळणार आहे.

जवळपास तीन दशकांचा वारसा असलेल्या या कार्यक्रमातून अनेक गुणी गायकांना राष्ट्रीय स्तरावर ओळख मिळाली आहे. यंदाच्या पर्वात भारतीय संगीताची विविधता आणि समृद्ध परंपरा सादर केली जाणार आहे. शंकर महादेवन, कुमार सानू, नीति मोहन आणि जावेद अली मार्गदर्शक म्हणून सहभागी होणार असून, अभिनेता श्रेयस तळपदे सूत्रसंचालन करणार आहेत.

## किया इंडियाने पॉवरट्रेन पर्यायांचा विस्तार केला

**नवी दिल्ली:** किया इंडिया या देशातील अग्रगण्य मास-प्रीमियम ऑटोमेकर कंपनीने आपल्या कॅरेन्स सीएनजी, कॅरेन्स क्लॅव्हिस सीएनजी आणि कार्निव्हल लिमोझिन हायब्रिड मॉडेल्ससाठी प्री-बुकिंग सुरू केल्याची घोषणा केली. यामुळे कंपनीच्या मल्टि-पॉवरट्रेन पोर्टफोलिओचा अधिक विस्तार झाला आहे, तसेच ग्राहकांना उत्पादन श्रेणीमध्ये अधिक पर्याय उपलब्ध झाले आहेत. नुकतेच झालेल्या किया इन्स्पिरेशन डेमध्ये प्रदर्शित करण्यात आलेली ही तीन उत्पादने वैविध्यपूर्ण मोबिलिटी सोल्यूशन्सच्या माध्यमातून ग्राहकांच्या बदलत्या आवडीनिवडी पूर्ण करण्याच्या किया इंडियाच्या कटिबद्धतेला अधिक दृढ करतात.

## दक्षम कॅपिटलने सौरभ मुंढड़ा नियुक्ती केली.

**पुणे :** दक्षम कॅपिटल, व्यवसाय आणि उद्योजकांना त्यांच्या गरजेनुसार गुंतवणूक आणि भांडवली उपाययोजना पुरवणारी एक वित्तीय सेवा फर्म, हिने सौरभ मुंढड़ा यांची १ ऑगस्ट, २०२६ पासून सहसंस्थापक आणि पश्चिम विभागाचे प्रमुख म्हणून नियुक्ती केली आहे. कॉर्पोरेट बँकिंग, भांडवली बाजार, धोरणात्मक वित्त आणि सल्लागार क्षेत्रात दोन दशकांहून अधिक अनुभव असलेले सौरभ, पश्चिम विभागात दक्षमचा सल्लागार व्यवसाय उभारण्याच्या आणि वाढवण्याच्या प्रयत्नांचे नेतृत्व करतील.ही नियुक्ती अशा वेळी झाली आहे, जेव्हा दक्षम संपत्ती सल्ला, खाजगी भांडवल आणि धोरणात्मक सल्ला या क्षेत्रांमध्ये आपले संशोधनआधारित व्यासपीठ विकसित करत आहे.

## सर्व्हिस नेटवर्क 1,000 टचपॉइंट्सपर्यंत विस्तारण्याची योजना

**मुंबई :** एआय प्लस स्मार्टफोनने भारतातील विक्रीनंतरची सेवा अधिक सक्षम करण्यासाठी सर्व्हिस नेटवर्क 1,000 हून अधिक टचपॉइंट्सपर्यंत विस्तारण्याची घोषणा केली आहे. सध्या 800 हून अधिक सर्व्हिस सेंटर्स असलेल्या नेटवर्कमध्ये 200 हून अधिक केंद्रांची भर पडणार आहे. याशिवाय, दिवाळीत दिल्लीत पहिले एक्सक्लुझिव्ह एआय प्लस सर्व्हिस सेंटर सुरू करण्यात येणार आहे. ग्राहकांना तांत्रिक सहाय्य, अस्सल स्पेअर पार्ट्स, दुरुस्ती, वॉरंटी आणि सॉफ्टवेअर सपोर्ट मिळेल. कंपनीने ‘एआय प्लस असिस्टन्स ॲप’ही सादर केले असून, त्याद्वारे सर्व्हिस बुकिंग, तिकीट ट्रॅकिंग, वॉरंटी माहिती, जवळचे सर्व्हिस सेंटर आणि समस्यानिवारण सुविधा उपलब्ध होणार आहेत.

## पल्स कँडीकडून गणेशोत्सवानिमित्त विशेष डिजिटल मोहीम

**जळगाव :** धर्मपाल सत्यपाल ग्रुपच्या (डीएस ग्रुप) पल्स कँडीकडून महाराष्ट्रात सलग पाचव्या वर्षी गणेश महोत्सव साजरा केला जात आहे. ‘देश की पल्स से बना गणपती त्योहार’ या संकल्पनेअंतर्गत १४ ते २३ सप्टेंबरदरम्यान मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, औरंगाबाद आणि जळगाव येथे विविध उपक्रम राबविले जाणार आहेत. ‘पल्स से अर्पण, बप्पा को समर्पण’ या मोहिमेत भक्तांना परस्परसंवादी डिजिटल अनुभवाच्या माध्यमातून बाप्पाला वैयक्तिक अर्पण करता येणार आहे. मूषकाच्या माध्यमातून अर्पण बाप्पापर्यंत पोहोचविण्याचा अनुभव देण्यात येणार असून, सहभागी ग्राहकांना पल्स कँडीचे पाकीट व लागवड करता येणाऱ्या बियांच्या कागदाचे कार्ड दिले जाणार आहे.


## महाराष्ट्रभर "हिरकणी कक्ष" लॅक्टेशन पॉड्स सुरु

**मुंबई, :** टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एमएसआरटीसी) सोबत सामंजस्य करार (एमओयू) करून "हिरकणी कक्ष" (लॅक्टेशन पॉड्स) हा महिलांसाठी महत्त्वाचा उपक्रम सुरू केला आहे. हा परिवर्तनशील आणि लिंग-संवेदनशील उपक्रम स्तनपान करणाऱ्या मातांना मदत करण्यासाठी तसेच महाराष्ट्रातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत महिला प्रवाशांच्या सुरक्षितता आणि सन्मान वाढविण्यासाठी राबविण्यात आला आहे.या उपक्रमांतर्गत, टीकेएम महाराष्ट्रभरातील एमएसआरटीसी बसस्थानकांवर 125 लॅक्टेशन पॉड्स उभारणार आहे. या पॉड्समध्ये सुरक्षित, खाजगी आणि स्वच्छ जागा उपलब्ध करून दिली जाणार असून त्यात पूर्वनिर्मित खोल्या, बसण्याची सोय, फीडिंग टेबल्स, बाळांचे डायपर बदलण्याची सुविधा, सॅनिटरी नॅपकिन डिस्पेंसर आणि वायुविजन यांसारख्या आवश्यक सुविधा असतील. या उपक्रमामुळे दरवर्षी सुमारे 4.50 लाख महिला प्रवाशांना लाभ होईल आणि सार्वजनिक वाहतूक केंद्रांवर महिलांसाठी आवश्यक असलेल्या लिंग-संवेदनशील पायाभूत सुविधांची मोठी उणीव दूर होणार आहे.

## कमी मासिक ईएमआयसह गॅलेक्सी झेड फोल्ड8 अल्ट्रा उपलब्ध

**मुंबई :** सॅमसंग इंडियानेआपल्या गॅलेक्सीफॉरएव्हरप्रोग्राम अंतर्गत अत्याधुनिक फ्लॅगशिप फोल्डेबलस्मार्टफोन्स - गॅलेक्सी झेड फोल्ड८ अल्ट्राआणि गॅलेक्सी झेड फोल्ड८ साठी नवीन, स्थिर पेमेंट योजना सुरू केली आहे.ही नाविन्यपूर्ण योजना गॅलेक्सी फोल्डेबल डिवाईसची मालकी मिळवणे पूर्वीपेक्षा अधिकसुलभ आणि परवडणारे बनवते.या दोन वर्षांच्या प्रोग्राम अंतर्गत, ग्राहक २४ महिन्यांच्या ईएमआयमध्येविभागून गॅलेक्सीफॉरएव्हरप्रोग्राम शुल्कासह डिवाईसच्या मूळ किमतीच्याकेवळ ६० टक्के रक्कम भरून गॅलेक्सी झेड फोल्ड८अल्ट्रा आणि गॅलेक्सी झेड फोल्ड८ खरेदी करू शकतात. यामुळे २४ महिन्यांसाठी ईएमआय २५ टक्क्यांनी कमी होतो, ज्यामुळे हप्ते भरणेअधिक सोपे होते. या प्रोग्रामद्वारे, गॅलेक्सीझेड फोल्ड८ अल्ट्राचा ईएमआय ९,४१७ रुपयांवरून घसरून ६,९९७ रुपये* होतो, तर गॅलेक्सीझेड फोल्ड८ चा ईएमआय ८,५८४ रुपयांवरून घसरून ६,४१६ रुपये* होतो.

## ह भ प ज्ञानदेव (आबा) गोंदकर



**शिर्डी (प्रतिनिधी) :** येथील ह.भ.प ज्ञानदेव (आबा) निवृत्ती गोंदकर वय ९२ यांचे नुकतेच वृद्धपकळाने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी ,दोन मुले, दोन मुली, सूना, नातवंडे , पणतू ,जावई असा परिवार आहे. शिर्डीतील सामाजिक कार्यकर्ते प्रमोद गोंदकर , उद्योजक विनोद गोंदकर आणि जि. प माजी सदस्या सौ. कांचनताई मांढरे तसेच सौ मंगलताई सोमवंशी यांचे ते वडील होत. ज्ञानदेव गोंदकर यांचे प्राथमिक शिक्षण शिर्डी येथे तर माध्यमिक शिक्षण नाशिक व महाविद्यालय शिक्षण पुणे येथे झाले. त्यानंतर त्यांनी बी.ए एल,एल,बीचे शिक्षण पूर्ण केले. शेतकरी व सदन कुटुंबातील असल्यामुळे त्यांनी अनेक वेगवेगळे व्यवसाय केले.

# स्व. बाबुरावजी काळे महाविद्यालयात मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन साजरा



तभा वृत्तसेवा

**अजिंठा १७ सटेंबर ,:** स्व. बाबुरावजी काळे महाविद्यालय, अजिंठा येथे मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाचे प्राचार्य **डॉ. संभाजी वाघमारे** यांच्या हस्ते ध्वजारोहणाने झाली.

मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या इतिहासाची विद्यार्थ्यांना माहिती व्हावी आणि या ऐतिहासिक लढ्याचे महत्त्व नव्या पिढीपर्यंत पोहोचावे, या उद्देशाने **इतिहास संशोधक श्री. विजय पगारे** यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. आपल्या व्याख्यानातून त्यांनी मराठवाडा मुक्तिसंग्रामाची ऐतिहासिक पार्श्वभूमी, त्याचे महत्त्व तसेच **अजिंठा परिसरातील मुक्तिसंग्रामाचा स्थानिक इतिहास** यावर सखोल विवेचन केले.

यावेळी त्यांनी मराठवाड्याच्या स्वातंत्र्यलढ्यात योगदान देणारे **स्वातंत्र्यसेनानी बाबुरावजी काळे ऊर्फ आप्पासाहेब** यांच्यासह परिसरातील इतर स्वातंत्र्यसेनानींच्या कार्याचा विशेष उल्लेख केला. स्थानिक स्वातंत्र्यसैनिकांच्या त्याग आणि योगदानाची माहिती विद्यार्थ्यांना मिळाल्याने इतिहासाशी त्यांचा भावनिक व बौद्धिक संबंध दृढ होण्यास मदत झाली.

कार्यक्रमाच्या निमित्ताने **उपजिल्हा रुग्णालय, सिल्लोड येथील आयसीटीसी समुपदेशक श्री. मंगेश कांबळे** यांनी एचआयव्हीविषयी जनजागृती व संवेदीकरण कार्यशाळा घेतली. या माध्यमातून प्राध्यापक व विद्यार्थ्यांचे एचआयव्ही प्रतिबंध, जनजागृती आणि आरोग्यविषयक बाबींवर समुपदेशन करण्यात आले.

तसेच **‘हिंदी पंधरवडा’** निमित्ताने **डॉ. रीना सुरडकर** यांनी तयार केलेल्या भित्तीपत्रकाचे विमोचन मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य **डॉ. संभाजी वाघमारे** यांनी केला. कार्यक्रमाचे आयोजन व सूत्रसंचालन **डॉ. रीना सुरडकर** यांनी केले, तर **डॉ. प्रकाश बावस्कर** यांनी उपस्थितांचे आभार मानले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य **डॉ. गणेश वाघ**, डॉ. प्रकाश बावस्कर, डॉ. काकासाहेब वराडे, डॉ. दत्तात्रय पिसे, प्रा. अनिल देसाई, प्रा. प्रकाश गावंडे, प्रा. नंदा आगवाल, प्रा. प्रीती गायकवाड, शिक्षकेतर कर्मचारी **श्री. संतोष चौंडीये, श्री. जुगल राजपूत, श्री. शुभम राजपूत, श्री. स्वप्निल जाधव, श्री. अनिल शिरसाट, श्री. राकेश परिहार** यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मराठवाडा मुक्तिसंग्रामातील ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाचे स्मरण करून त्यांच्या कार्याची प्रेरणा विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणारा हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

# सहयोग नगरच्या राजाची किशोर शितोळे यांच्या हस्ते आरती

### गणरायाच्या जयघोषाने परिसर दुमदुमला



**छत्रपती संभाजीनगर :** सहयोग नगर येथे विराजमान असलेल्या ‘सहयोग नगरच्या राजा’ची आरती भाजप जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे यांच्या हस्ते भक्तिमय वातावरणात उत्साहात पार पडली. यावेळी परिसरातील नागरिक आणि गणेशभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आरतीदरम्यान गणरायाच्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. भाविकांनी गणरायाचे दर्शन घेत आरतीमध्ये सहभाग नोंदविला. यावेळी सर्वांच्या सुख, समृद्धी, उत्तम आरोग्य आणि उज्ज्वल भविष्यासाठी गणरायाच्या चरणी प्रार्थना करण्यात आली.

या प्रसंगी भाजप युवा मोर्चाचे प्रथमेश चौधरी, विनय शिरोडकर, ज्ञानेश्वर डोळे, ऋषिकेश थोटे, अमित शिंदे आणि प्रसाद पेरे यांच्यासह स्थानिक नागरिक व गणेशभक्त उपस्थित होते.

# खुलताबाद पोलिसांनी उत्तर प्रदेशातील महिलेची हरवलेली पर्स शोधून केली परत



तभा वृत्त सेवा

खुलताबाद प्रतिनिधी दि १६/९/२०२६ रोजी श्रीमती दयावती राजकुमार वर्मा, वय ३६ वर्षे, रा. अमरगड, झाशी, राज्य उत्तर प्रदेश या छत्रपती संभाजीनगर येथून सिटी बसने श्री घृष्णेश्वर मंदिर, वेरूळ येथे दर्शनासाठी आल्या होत्या.

परंतु घाई गडबडीत सिटी बसमध्ये त्यांची ₹४०००/- रोख रक्कम तसेच अंदाजे ₹६०.०००/- किमतीचे सोन्याचे दागिने (मंगळसूत्र) असलेली पर्स अनावधानाने विसरली. पर्स हरवल्याचे लक्षात येताच त्यांनी तात्काळ पोलीस ठाणे खुलताबाद येथे माहिती दिली.

माहिती मिळताच खुलताबाद पोलिसांनी विलंब न करता CCTV फुटेजच्या माध्यमातून तपासाची चक्रे गतिमान केली. दिवसभर विविध ठिकाणचे CCTV फुटेज तपासून अखेर सदर पर्स कसाबखेडा येथील गोविंद शर्मा यांना मिळाल्याची माहिती पोलिसांच्या निदर्शनास आली.

त्यानंतर संबंधित व्यक्तीचा शोध घेऊन पोलिसांनी त्यांच्याकडून ₹४०००/- रोख रक्कम व सोन्याचे दागिने असलेली पर्स हस्तगत केली आणि ती श्रीमती दयावती राजकुमार वर्मा यांना सुरक्षितपणे परत करण्यात आली.

श्रीमती दयावती वर्मा या टेलरिंगचे काम करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. मौल्यवान दागिने व रोख रक्कम परत मिळाल्याने त्यांनी खुलताबाद पोलिसांचे मनःपूर्वक आभार मानत समाधान व आनंद व्यक्त केला. ही कारवाई म्हणजे केवळ हरवलेली वस्तू परत मिळवणे नसून, नागरिकांच्या अडचणीच्या वेळी पोलीस तत्परतेने त्यांच्या पाठीशी उभे राहतात, याचे उदाहरण आहे.

“नागरिकांचा विश्वास — हीच पोलिसांची खरी ताकद

सदरची उल्लेखनीय कामगिरी पोलीस निरीक्षक श्री. प्रशांत महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक विशाल बोडखे, सहाय्यक फौजदार आव्हाड व पोलीस अंमलदार ठोंबरे यांनी केली.

# आर्य चाणक्य मध्ये मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात साजरा



तभा वृतसेवा

**पैठण दि १७ :** -भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाई द्वारा संचालित आर्य चाणक्य विद्यामंदिर, पैठण येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजनाने करण्यात आली.

श्रीमती अर्चना गिरवलकर (सहशिक्षिका, प्राथमिक तथा स्थानीय व्यवस्थापन समिती सदस्य) यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. राहुल लांडगे यांनी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचा ऐतिहासिक संदर्भ, स्वातंत्र्यलढ्याचे महत्त्व आणि मराठवाड्याच्या मुक्तीसाठी झालेल्या संघर्षाची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना दिली. सोबतच ऐतिहासिक वारशाचे स्मरण, स्वातंत्र्याची जाणीव आणि राष्ट्रभक्तीची प्रेरणा आपल्या शब्दात व्यक्त करत मार्गदर्शन केले.त्यानंतर श्रीमती अर्चना गिरवलकर यांनी भावनिक शब्दांत आपले मनोगत व्यक्त करून विद्यार्थ्यांना स्वातंत्र्याच्या मूल्यांची जाणीव करून दिली.

याप्रसंगी विजय चाटुपळे यांनी मनोगत व्यक्त केले तर कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. जुगलकिशोर लोहिया (कार्यवाह, स्था. व्य. स.) यांनी अध्यक्षीय समारोपातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी नंदकिशोर मालानी (अध्यक्ष, शा. स. मा.), शिवाजी मारवाडी (अध्यक्ष, शा. स. प्रा.), भास्कर कुलकर्णी (मुख्याध्यापक, प्राथमिक तथा केंद्रीय कार्यकारिणी सदस्य), विजय चाटूपळे, रविंद्र साळजोशी, अनिल कावसानकर, श्रीमती ज्योती जोशी (मुख्याध्यापिका, माध्यमिक) यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.कार्यक्रमाचा समारोप क्षणी विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त उपजिल्हा रुग्णालयात ध्वजारोहण

### स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाला अभिवादन; रुग्णसेवेचा संकल्प अधिक दृढ



तभा वृत्तसेवा

**गंगापूर दि.१७:** मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त गंगापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात देशभक्तीपूर्ण आणि उत्साहपूर्ण वातावरणात ध्वजारोहण कार्यक्रम पार पडला. डॉ. सुधाकर मुंडे यांच्या हस्ते राष्ट्रध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उपस्थित अधिकारी, कर्मचारी आणि रुग्णालयीन कर्मचाऱ्यांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना देत मराठवाड्याच्या मुक्तीसाठी संघर्ष करणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांच्या त्याग व बलिदानाला अभिवादन केले.

मराठवाडा मुक्ती संग्राम हा स्वातंत्र्य, लोकशाही आणि सामाजिक न्यायासाठी झालेल्या संघर्षाची प्रेरणादायी गाथा आहे. असंख्य ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांनी केलेल्या त्यागामुळे आज आपण स्वातंत्र्याचा श्वास घेत आहोत. त्यांच्या बलिदानाची आठवण ठेवणे आणि त्यांच्या विचारांची प्रेरणा घेऊन समाजासाठी कार्य करणे हीच त्यांना खरी आदरांजली असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

यावेळी अतुल रासकर सदस्य रुग्ण कल्याण समिती यांनी उपस्थित राहून स्वातंत्र्यसैनिकांना अभिवादन केले. रुग्णालयातील सर्वसामान्य, गोरगरीब आणि गरजू रुग्णांना योग्य उपचार, आवश्यक मार्गदर्शन आणि संवेदनशील सेवा मिळावी, यासाठी रुग्णसेवेला सर्वोच्च प्राधान्य देण्याची भूमिका यावेळी अधोरेखित करण्यात आली.

स्वातंत्र्यसैनिकांनी देशासाठी केलेल्या त्यागातून प्रेरणा घेत “रुग्णसेवा हीच समाजसेवा” या भावनेने प्रत्येक रुग्णाशी आपुलकीने आणि संवेदनशीलतेने वागण्याचा संकल्प करण्यात आला. रुग्णालयात येणाऱ्या प्रत्येक नागरिकाला शासकीय आरोग्य सुविधांचा लाभ मिळवून देण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडावी, असा संदेशही यावेळी देण्यात आला.

ध्वजारोहणानंतर राष्ट्रगीताचा सन्मान राखण्यात आला. संपूर्ण रुग्णालय परिसरात देशभक्तीपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. स्वातंत्र्याचा अभिमान, स्वातंत्र्यसैनिकांच्या बलिदानाची जाणीव आणि जनतेच्या आरोग्याची सेवा करण्याची बांधिलकी या भावनेने कार्यक्रम पार पडला.

स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाची प्रेरणा घेऊन जनतेची सेवा आणि रुग्णांची सेवा अधिक प्रभावीपणे करण्याचा संकल्प हीच या दिनाची खरी प्रेरणा असल्याचे यावेळी उपस्थितांनी सांगितले.उपस्थित अधिकारी व कर्मचारी यावेळी डॉ. सुधाकर मुंडे, अतुल रासकर – सदस्य, रुग्ण कल्याण समिती, डॉ. सूर्यवंशी, डॉ. केंद्रे, डॉ. मनोरे, डॉ. शेजूळ, डॉ. म्हस्के, सिस्टर कुलकर्णी, रुकसाना शेख, बेबी शेख, वाघ सिस्टर, पवार सिस्टर, तपसे सिस्टर, मंगेश गायकवाड, साबळे, अनिल साळुंके, मोहिते, दळे सिस्टर, लोंढे, किशोर हिवाळे आदी रुग्णालयीन अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# फारोळा ग्रामपंचायत येथे ध्वजारोहण



**बिडकीन दि१७ :** पैठण तालुक्यातील ग्रामपंचायत कार्यालय फारोळा येथे पं.स.पैठण विस्तार अधिकारी तसेच ग्रामपंचायत फारोळा प्रशासक .बी.डी.राठोड यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर,छत्रपती शिवाजी महाराज,महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पुजन करून, मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त ध्वजारोहण करण्यात आले.यावेळी उपस्थित ग्रामपंचायत अधिकार.ए.एस.तुपेताई मुख्याध्यापिका..स्वाती थिगळे,मीनाक्षी धुमाळ,अनिता पठारे,मीरा हाडे,रेखा इंदापुरे,गायत्री तुपे,मीना पवार,कोमल निकम,कांजन मराठे,शालीनी थोरात,अपर्णा निकुंभ,शितल केजकर,अरविंद महाकाळे,दर्शन बोरशे,वर्षाराणी कमळू,सुलभा शेळके,शितल शिरवत,प्रणाली भिलेगावकर,मिनाक्षी शिताळ,वर्षा नवगिरे,ज्योती खेडकर,सलीम पठाण,अनिल बारवाल,सांडु धुमाळ, याकुब पठाण,रमेश पवार,मुसा पठाण,शिवाजी गोरे, दिलीप गोरे,गणेश गायकवाड,तेजस जाधव,संजय धुमाळ,रविंद्र पवार,मंगेश धुमाळ,अदि गावकरी उपस्थित होते

# अशक्यप्राय लढा जिंकला! सात महिन्यांच्या प्रदीर्घ उपचारांनंतर 14 वर्षीय जगदीशने दुर्धर ‘GBS’ आजारावर केली मात

### चार महिने व्हेंटिलेटरवर; गंभीर गुंतागुंतींवर मात करत बालकाची सुखरूप घरवापसी

**छत्रपती संभाजीनगर :** अत्यंत गंभीर आणि जीवघेण्या गुलियन-बॅरे सिंड्रोम (GBS) या मज्जासंस्थेच्या आजाराशी तब्बल सात महिने झुंज देणाऱ्या १४ वर्षीय जगदीश निकम याने अखेर या आजारावर मात केली. चार महिने व्हेंटिलेटरवर उपचार, गंभीर फुफ्फुसाचा संसर्ग, ARDS, दोन्ही फुफ्फुसांमध्ये हवा भरणे तसेच रक्तदाबातील अचानक होणारे बदल अशा अनेक गुंतागुंतींवर मात करत जगदीश आता पूर्णपणे बरा होऊन स्वतःच्या पायावर उभा राहत घरी परतला आहे.

मेडिकव्हर हॉस्पिटलमधील बालरोग तज्ज्ञ डॉ. राहुल गोसावी, छाती विकार तज्ज्ञ डॉ. आशिष गाडे, ईएनटी तज्ज्ञ डॉ. शरद शेळके, अतिदक्षता विभागातील पथक आणि समर्पित नर्सिंग टीमच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे या अत्यंत गुंतागुंतीच्या केसला यश मिळाले.

आजाराची अचानक सुरुवात

२८ डिसेंबर २०२५ रोजी जगदीशला गंभीर अवस्थेत रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याच्या दाखल होण्याच्या सुमारे आठवडाभर आधी त्याला जुलाबाचा त्रास झाला होता. त्यानंतर काही दिवसांतच त्याच्या प्रकृतीत झपाट्याने बिघाड झाला. दोन्ही पायांवर उभे राहता येत नव्हते, हातांची ताकद पूर्णपणे कमी झाली होती आणि बोलताना जीभ अडखळत होती.

अवघ्या १२ ते १६ तासांत त्याची श्वसनक्षमता गंभीरपणे कमी झाली आणि स्वतःहून श्वास घेणे अशक्य झाले. तातडीने त्याला बालरोग अतिदक्षता विभागात दाखल करून व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले. तपासण्यांनंतर त्याला गुलियन-बॅरे सिंड्रोम (GBS) असल्याचे निदान झाले. या आजारात शरीराची रोगप्रतिकारक यंत्रणा चुकून मज्जातंतूंवर हल्ला करते, ज्यामुळे स्नायूंची ताकद कमी होऊन गंभीर परिस्थितीत श्वसनासाठी आवश्यक स्नायूही प्रभावित होऊ शकतात.



चार महिने व्हेंटिलेटरवर, अनेक गंभीर गुंतागुंती

जगदीशचा आयसीयूतील उपचारांचा प्रवास अत्यंत आव्हानात्मक होता. त्याला ऑटोनॉमिक डिस्फंक्शनमुळे रक्तदाबात अचानक चढ-उतार होत होते. उपचारादरम्यान गंभीर फुफ्फुसाचा संसर्ग आणि ARDSची गुंतागुंत निर्माण झाली. दोन्ही फुफ्फुसांमध्ये हवा भरल्याने तातडीने छातीमध्ये नळ्या टाकून उपचार करावे लागले.

दीर्घकाळ कृत्रिम श्वसनाची गरज असल्याने ट्रॅकिओस्टॉमी करून श्वासनलिकेत ट्यूब टाकण्यात आली. ही ट्यूब सुमारे सहा महिने ठेवावी लागली. जगदीश तब्बल चार महिने व्हेंटिलेटर सपोर्टवर होता.

सात महिन्यांच्या उपचारांनंतर पुन्हा उभा राहिला

दीर्घकाळ उपचार आणि अतिदक्षता विभागातील काळजी घेत असताना जगदीशच्या प्रकृतीत हळूहळू सुधारणा होऊ लागली. मज्जातंतूंचे कार्य हळूहळू पूर्ववत झाले, स्नायूंमध्ये ताकद परत येऊ लागली आणि त्याने स्वतःहून श्वास घेण्यास सुरुवात केली. सात महिन्यांच्या प्रदीर्घ उपचारानंतर तो स्वतःच्या पायावर उभा राहू लागला आणि हसतमुखाने घरी परतला.

सात महिने रुग्णालयात; एकही बेडसोर नाही

जगदीश सात महिने रुग्णालयात आणि चार महिने व्हेंटिलेटरवर असल्याने तो दीर्घकाळ अंथरुणावर होता. अशा परिस्थितीत एकही बेडसोर न होणे ही त्याच्या उपचारातील विशेष बाब ठरली. नियमित पोझिशनिंग, त्वचेची स्वच्छता, पोषण आणि सतत निरीक्षण यामुळे हे शक्य झाले. नर्सिंग टीमने दिवस-रात्र घेतलेल्या काळजीचे यावेळी विशेष कौतुक करण्यात आले.

सांघिक प्रयत्नांना यश

या अत्यंत गुंतागुंतीच्या आजारात बालरोग तज्ज्ञ डॉ. राहुल गोसावी, छाती विकार तज्ज्ञ डॉ. आशिष गाडे, ईएनटी तज्ज्ञ डॉ. शरद शेळके, मेंदू विकार तज्ज्ञ डॉ जयपाल घुणवत,डॉ अंगद घुले, डॉ पवन मुंदडा , डॉ रोहित, शीतल सिस्टर यांनी समन्वयाने उपचार केले. दीर्घकाळ चाललेल्या उपचारांमध्ये प्रत्येक टप्प्यावर रुग्णाच्या स्थितीनुसार उपचारपद्धतीत आवश्यक बदल करण्यात आले.

मेडिकव्हर हॉस्पिटलचे सेंटर हेड डॉ. विशाल कुटे यांनी या यशाबद्दल सांगितले, “जगदीशची केस अत्यंत गंभीर आणि आव्हानात्मक होती. अचूक निदान, वेळेवर घेतलेले वैद्यकीय निर्णय, सातत्यपूर्ण अतिदक्षता सेवा आणि संपूर्ण वैद्यकीय पथकाचे सांघिक प्रयत्न यामुळे या उपचारांना यश मिळाले. त्यासोबतच जगदीशच्या कुटुंबाची दुर्दम्य इच्छाशक्ती आणि उपचारांवरील विश्वासही या संपूर्ण प्रवासात महत्त्वाचा ठरला. आज तो स्वतःच्या पायावर उभा राहून घरी जात आहे, ही संपूर्ण टीमसाठी समाधानाची बाब आहे.”

अग्रलेख

# ‘या’ शुल्काचा फेरविचार व्हावा...

गेल्या दशकात भारताने तंत्रज्ञान आणि विशेषतः ‘डिजिटल’ अर्थव्यवस्थेत ज्या प्रचंड वेगाने झेप घेतली, ती प्रगत राष्ट्रांनाही अचंबित करणारी आहे. एकेकाळी साधी बँकिंग सेवा केवळ उच्चभ्रू आणि शहरी भागापुरती मर्यादित मानली जात होती, त्याच देशातील गल्लीबोळातल्या भाजी विक्रेत्यापासून ते थेट पंचतारांकित हॉटेल्स आणि आलिशान मॉल्सपर्यंत प्रत्येक ठिकाणी आज ‘डिजिटल पेमेंट’साठी एकच आवाज ऐकू येतो, ‘क्यूआर कोड द्या...’. नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने (एनपीसीआय) विकसित केलेल्या ‘युनिफाईड पेमेंट्स इंटरफेस’ अर्थात ‘युपीआय’ यंत्रणेने भारताच्या आर्थिक व्यवहारांत अभूतपूर्व अशी क्रांती घडवून आणली आहे. हे जाळे इतक्या सहज आणि पारदर्शकपणे विणले गेले की, दशकानुदशके रोख रकमेवर चालणारी भारतीय अर्थव्यवस्था अवघ्या काही वर्षांत रोखविरहित व्यवहाराच्या आघाडीवर जगात अग्रेसर ठरली. उत्तम वेग, पारदर्शकता आणि डिजिटल स्वरुपामुळे ‘युपीआय’ हे नागरिकांच्या दैनंदिन जीवनाचे अविभाज्य अंग झाले आहे.

गेल्या सहा वर्षांपासून ‘युपीआय’ची ही संपूर्ण यंत्रणा नागरिकांसाठी पूर्णपणे मोफत होती. परंतु, ‘एनपीसीआय’ने नुकत्याच घेतलेल्या निर्णयाने हा यशस्वी डिजिटल प्रवास काहीसा संथावतो की काय, असे वाटू लागले आहे. येत्या १५ ऑक्टोबरपासून व्यावसायिक संस्था आणि व्यापाऱ्यांसाठी २ हजार रुपयांपेक्षा अधिकच्या युपीआय व्यवहारांवर ०.४ टक्के इतके शुल्क आकारले जाणार आहे. तसेच ७५ हजार रुपयांपेक्षा जास्तीच्या व्यवहारांसाठी हे शुल्क ३०० रुपयांपर्यंत मर्यादित ठेवले गेले आहे. तांत्रिकदृष्ट्या हे शुल्क व्यापाऱ्यांवर लादले जात असल्याचे आणि दोन व्यक्तींमधील वैयक्तिक व्यवहार यातून मुक्त असल्याचे दिसत असले, तरी शेवटी या शुल्काचा अंतिम फटका सर्वसामान्य नागरिकांनाच बसणार आहे, हे समजून घेतले पाहिजे.

‘युपीआय’च्या अथांग आणि अवाढव्य विस्ताराची आकडेवारी थक्क करून सोडणारी आहे. वित्तीय वर्ष २०२५-२६ च्या ताज्या अहवालानुसार, भारतात एका वर्षात तब्बल २४ हजार १६२ कोटींपेक्षा जास्त युपीआय व्यवहार पार पडले, ज्यांचे एकूण मूल्य सुमारे ३१४ लाख कोटी रुपयांच्या घरात आहे. दररोज सरासरी ६६ कोटींहून अधिक व्यवहार या यंत्रणेद्वारे केले जातात. जगभरातील एकूण रिअल-टाईम डिजिटल व्यवहारांपैकी एकट्या भारताचा वाटा सुमारे ४९ टक्के एवढा जास्त आहे. एवढी अवाढव्य यंत्रणा चालवण्यासाठी सरकार, बँका आणि फिनटेक कंपन्यांना खर्च येत असेल. संसदीय वित्तीय समिती आणि उद्योग क्षेत्राच्या अंदाजानुसार, संपूर्ण युपीआयचे ‘इकोसिस्टम’ सुरळीत चालवण्यासाठी वर्षाला साधारणतः १५ हजार ते २० हजार कोटी रुपयांचा देखभाल व तांत्रिक खर्च येतो. मात्र, हा खर्च दिसायला मोठा वाटत असला, तरी प्रत्येक व्यवहाराचा विचार केला तर हा खर्च अवघा ५ ते १० पैसे इतका अत्यल्प आहे. वार्षिक ३१४ लाख कोटी रुपयांच्या प्रचंड व्यवहारांशी तुलना केली, तर २० हजार कोटी रुपयांचा खर्च फारच कमी. एवढा नगण्य खर्च भागवण्यासाठी यूपीआय व्यवहारावर थेट शुल्काचा बोजा कशापायी? येत्या काळात हा प्रश्न सर्वसामान्यांना अस्वस्थ करणार ठरू शकतो. त्यावर सरकार आणि ‘एनपीसीआय’चा युक्तिवाद असा आहे की, या शुल्कातून सर्वसामान्य व्यक्तींच्या व्यवहाराला पूर्णपणे वगळण्यात आले आहे; जेणेकरून त्यांच्यावर या शुल्काचा भुर्दंड बसणार नाही. केवळ २ हजार रुपयांवरील व्यावसायिक व्यवहारांवरच हे शुल्क लागू असेल. खरे तर हा केवळ कागदी आणि तांत्रिक युक्तिवाद आहे. भारताच्या करप्रणालीचा आणि व्यापारी मानसिकतेचा आजवरचा इतिहास सांगतो की, जेव्हा जेव्हा सरकार व्यापाऱ्यांवर किंवा उद्योगांवर कोणताही कर किंवा शुल्क लादते, तेव्हा तो कर व्यापारी आपल्या स्वतःच्या नफ्यातून किंवा खिशातून कधीही देत नाहीत. तो ग्राहकांकडूनच वसूल करतात. आधीचा ‘सेल्स टॅक्स’ असो, किंवा जीएसटी असो, शेवटी सारा भार सर्वसामान्य नागरिकांच्याच मानगुटीवर बसला आहे. एवढ्यावर व्यापाऱ्यांचे समाधान होत नाही. पुढे ‘सरचार्ज’ किंवा ‘सर्व्हिस चार्ज’च्या नावाखाली ते नागरिकांना लुटतात. आजवरचा हा कटू अनुभव विचारात घेतला, तर १५ ऑक्टोबरनंतरही हेच घडणार असे दिसते. व्यावसायिक आस्थापना २ हजार रुपयांवरील युपीआय व्यवहारांवर लागणारा ०.४ टक्के ‘एमडीआर’ स्वतः सहन करणारच नाहीत. ते ग्राहकाला एकतर रोख पैसे मागतील किंवा वस्तूच्या देयकात छुप्या मार्गाने ते ५ ते १० रुपये जोडून घेतील. धोरणकर्त्यांसाठी, युपीआय कंपन्यांसाठी, बँकांसाठी आणि व्यापाऱ्यांसाठी ५ किंवा १० रुपयाची रक्कम क्षुल्लक असेलही; परंतु भारतातील बहुसंख्य गरीब, मध्यमवर्गीय आणि हातावर पोट असणाऱ्या सामान्य जनतेसाठी दैनंदिन व्यवहारातील ५-१० रुपयांचे मूल्य फार मोठे असते. किराणा सामान, औषधे, कपडे किंवा दैनंदिन गरजेच्या वस्तू खरेदी करताना हा ५-१० रुपयांचा भुर्दंड वारंवार बसू लागला, तर महागाईच्या विळख्यात आधीच पिचलेल्या सामान्य जनतेला त्रासच होणार.

याहीपेक्षा या सशुल्क धोरणाचा घातक परिणाम म्हणजे, केंद्र सरकारने गेल्या दशकात ज्या मूळ धोरणात्मक उद्देशासाठी युपीआयची यंत्रणा उभारली आहे, त्या उद्देशालाच नख लागू शकते. ‘डिजिटल इंडिया’ आणि ‘कॅशलेस इकॉनॉमी’च्या संकल्पनेलाही धक्का बसेल. अर्थव्यवस्थेचे अधिकाधिक औपचारिकीकरण व्हावे यासाठी देशातील रोख व्यवहारांचे प्रमाण कमी व्हावे, समांतर अर्थव्यवस्था (ब्लॅक मनी) रोखली जावी आणि अर्थव्यवस्थेत पारदर्शकता यावी, हा खरा उद्देश होता. तो यशस्वी होण्याच्या मार्गावर आहे. पण युपीआय व्यवहारांवर शुल्क आकारणे सुरू झाले तर त्याला खीळ बसू शकते. या शुल्कातून वाचण्यासाठी सर्वसामान्य नागरिक आणि छोटे व्यापारी पुन्हा एकदा रोख व्यवहारांकडे वळू शकतात. आधीच, रोखीने व्यवहार केले तर पैसे कमी खर्च होतात, अशी लोकांची मानसिकता आहे. आता युपीआयवर नाममात्र का होईना, पण शुल्क लागणार असेल, तर ही मानसिकता अधिक दृढ होईल. जुना पायंडा समाज स्वीकारेल आणि तो युपीआयच्या उद्दिष्टांशी पूर्णपणे विसंगत ठरेल. त्यामुळेच यावर अत्यंत समतोल आणि वास्तववादी मार्ग काढणे गरजेचे आहे आणि ते शक्यही आहे. डिजिटल पेमेंटचे जाळे आहे तसे जपणे आणि त्याचवेळी सामान्य जनतेचे रक्षण करणे असा सुवर्णमध्य साधला गेला पाहिजे. १ लाख रुपयांपर्यंतचे सर्व प्रकारचे युपीआय व्यवहार हे पूर्णपणे मोफत आणि शुल्कमुक्त ठेवले पाहिजे. जीवनावश्यक वस्तू, वैद्यकीय खर्च, शिक्षण, रेशन, वाहतूक आणि शेतीविषयक अवजारे यांच्या खरेदीला या शुल्कातून वगळले पाहिजे. युपीआय यंत्रणेचा खर्चच भागवायचा आणि त्यासाठी शुल्क आकारायचेच असेल, तर ते उच्चभ्रू आणि चैनीच्या व्यवहारांवर आकारले जावे. उदाहरणार्थ, दागदागिने (ज्वेलरी), महागड्या गाड्या, महागड्या इलेक्ट्रॉनिक वस्तू आणि पंचतारांकित सेवा यासारख्या उच्चमूल्य व्यवहारांवर ते आकारले जावे. खर्चच भरून काढायचा तर तिथून मिळणाऱ्या उत्पन्नातून युपीआय यंत्रणेचा वार्षिक २० हजार कोटी रुपयांचा खर्च सहज भागवता येऊ शकतो. सर्वसामान्यांच्या रोजच्या गरजांवर ही नवी डिजिटल कराची कुऱ्हाड चालवणे रोग्य नाही. सरकारने या निर्णयाचा पुनर्विचार करून व्यवहार्य आणि दिलासादायक निर्णय घ्यावेत. सरकारकडे भरपूर पर्याय आहेत. त्यांचा प्राधान्याने विचार करावा. सरकारी खर्चात कपात करावी, फुकटगिरीची सवय लावणाऱ्या योजनांना कात्री लावावी. पण, असे शुल्क लादू नये. आता ते नाममात्र वाटते. ते भविष्यात वाढू शकते. तसे झाले तर सरकारचा पुढाकार व नागरिकांचे सहकार्य तसेच सर्वांच्या मेहनतीने, विश्वासाने उभारलेली ही अद्‌भुत अशी युपीआय यंत्रणा मंदावेल. आपली अर्थव्यवस्था पुन्हा एकदा ‘कॅश’च्या जुन्या युगात ढकलली जाईल. अर्थव्यवस्थेचे औपचारिकीकरण मंदावले तर काय-काय तोटे होतात, हे सरकारला लांगणे न लगे! ■

# उभारणी प्रक्रियेतून शिकणारे राष्ट्र

**श्रीधर वेम्बू**

डीप टेक तंत्रज्ञानाच्या बाबतीत भारताची क्षमता ज्या वेगाने विकसित होत आहे, त्यामागे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची दूरदृष्टी आणि वचनबद्धतेचा वाटा मोठा आहे. खरे तर भारत आज ज्या-ज्या गोष्टी उभारतो आहे, १५ वर्षांपूर्वी त्यापैकी बहुतांश गोष्टींना अव्यवहार्य असा शिक्का मारून धुडकावून लावले गेले असते. एखाद्या खाजगी भारतीय कंपनीने अंतराळ कक्षेत सोडलेले रॉकेट असो, भारतीय भूमीवरील सेमीकंडक्टरचा कारखाना असो, देशातच डिझाईन करून परदेशात विकली जाणारी संरक्षण प्रणाली असो किंवा मायदेशातच तयार झालेल्या आधुनिक ट्रेन असो... अशा सगळ्यांच गोष्टींसाठी मिळणारे नेहमीचे उत्तर हेच असायचे की, भारतासाठी ही संधी आता निघून गेली आहे, हे तंत्रज्ञान खूप कठीण आहे, यासाठी खूपच भांडवल लागणार आहे आणि इतर देश या शर्यतीत खूप पुढे निघून गेले आहेत.

कायमच असे उत्तर सहज दिले जायचे. मात्र केवळ आर्थिक परिस्थिती अनुकूल होण्याची वाट पाहत बसल्याने कोणताही देश सक्षम बनत नाही तर कामाला प्रत्यक्ष सुरुवात करून, सुरुवातीचे अपयश पचवून तसेच कौशल्ये आणि क्षमता उत्तरोत्तर वृद्धिंगत होईपर्यंत त्या आव्हानाला सातत्याने भिडूनच देश खऱ्या अर्थाने सक्षम बनतो, हेच वास्तव आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ही गोष्ट फार पूर्वीच ओळखली आणि त्या दृष्टीने ठोस कृती केली आणि आता आपण त्याचेच सकारात्मक परिणाम पाहू शकत आहोत.

आत्मनिर्भरतेचा नेमका अर्थ काय, हे आपण आधी नीट समजून घेतले पाहिजे. आत्मनिर्भरता म्हणजे काही प्रत्येक स्क्रू स्वतःच्याच देशात बनवणे किंवा जगासोबत काम करायला नकार देणे असे नाहीच; त्याउलट आपल्याला आत्मविश्वासाने जगाशी व्यवहार करता यावा या ध्येयाने, आपण ज्या गोष्टी वापरतो त्यांची अभिनव निर्मिती करणे, त्यांची अभियांत्रिकी रचना करणे आणि त्यात सुधारणा करण्याची क्षमता स्वतःमध्ये निर्माण करणे म्हणजे आत्मनिर्भरता.

सेमीकंडक्टर हे क्षेत्र याचे उत्तम उदाहरण म्हणता येईल. आपल्याकडे चिप डिझाईन करणाऱ्यांची मोठी व्यवस्था आधीपासूनच आहे. असे असूनही चिपची प्रत्यक्ष निर्मिती हा या साखळीतील महत्त्वाचा टप्पा आपण आजवर कधीही गाठू शकलेलो नव्हतो. पण आता ही दरीही दूर होतेय, ढोलेरा इथे टाटा इलेक्ट्रॉनिक्सचा ९१,००० कोटी रुपयांचा प्रकल्प उभा राहतोय. मोटार वाहने, औद्योगिक प्रणाली, ऊर्जा उपकरणांसोबत सूक्ष्मनियंत्रकांमध्ये वापरल्या जाणाऱ्या प्रस्थापित प्रक्रियेच्या नोड्ससाठी (एका लहानशा सिलिकॉन चिपवर किती लहान आकाराचे ट्रान्सिस्टर बसवले जाऊ शकतात याचा निर्देशक) दरमहा ५०,००० वेफर्स तयार होतील अशारीतीने या प्रकल्पाची आखणी केली गेली आहे.

प्रत्यक्ष निर्मिती प्रक्रियेत कार्यरत असलेला सेमीकंडक्टर कारखाना चालवण्यासाठी अतिशय शुद्ध वायू आणि रसायने, नेमकी साधने, पॅकेजिंग आणि चाचणी, विश्वासार्ह वीजपुरवठा आणि पाणी, प्रक्रिया अभियंते, देखभाल करणारी पथके आणि शेकडो शिस्तबद्ध पुरवठादारांची गरज असते. याच अनुषंगाने आता ढोलेरा येथील प्रकल्पाच्या माध्यमातून वेफर्सच्या निर्मितीपलीकडे, आपल्या देशाला अधिक सक्षम बनवू शकणाऱ्या क्षमता आणि प्रत्येक टप्प्यावरील तंत्रज्ञानविषयक ज्ञानाची एक संपूर्ण परिसंस्था देशात निर्माण होणार आहे, आणि हेच ढोलेरा प्रकल्पाचे सर्वांत महत्त्वाचे फलित असणार आहे.

आपण हा इथवरच्या टप्पा गाठण्याच्या वाटचालीत केंद्र सरकारकडून मिळालेल्या पाठबळाची भूमिका अत्यंत निर्णायक राहिली आहे. केंद्र सरकारच्या सेमीकॉन इंडिया या कार्यक्रमांतर्गत मान्यताप्राप्त प्रकल्पांना एकूण भांडवली खर्चाच्या ५० टक्क्यांपर्यंत आर्थिक मदत दिली जात आहे. याअंतर्गत मे २०२६ पर्यंत ६ राज्यांमध्ये अशा १२ सेमीकंडक्टर प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे. महत्त्वाचे म्हणजे या प्रकल्पांच्या माध्यमातून सुमारे १.६५ लाख कोटी रुपयांची हमीबद्ध गुंतवणूक होणार आहे. आता सेमीकॉन २.० या अभियानाच्या माध्यमातून सहकार्याचे हे प्रयत्न डिझाईन, उपकरणे आणि कच्च्या मालाच्या क्षेत्रापर्यंत विस्तारले आहेत.

औद्योगिक क्षेत्रांतर्गत आत्मसात केलेल्या धड्यांमुळे मिळणारे फळ कसे उत्तरोत्तर वाढतच जाते याचा अनुभव आपण आधीच घेतला आहे. कधीकाळी मोबाईल फोन जोडणीचे काम हे स्क्रू ड्रायव्हर फिरवण्याचे काम म्हणून या कामाची निंदा केली जात होती. पण या कामाच्या विस्तारलेल्या व्याप्तीनेच मिळणाऱ्या लाभाची व्याप्तीही तितकीच विस्तारली. २०१५ ते २०२६ या आर्थिक वर्षांदरम्यान, भारतातील इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनाचे मूल्य १.९ लाख कोटी रुपयांवरून १३.११ लाख कोटी रुपयांपर्यंत वाढले. याच कालावधीत निर्यात देखील ३८,००० कोटी रुपयांवरून वाढून तब्बल ४.२४ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचली.

मोबाईल फोनचे उत्पादन ६.२७ लाख कोटी रुपयांवर पोहोचले आणि निर्यात २.५९ लाख कोटी रुपयांवर पोहोचली. केवळ असेंब्ली प्रक्रियेमुळे भारत रातोरात इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील महासत्ता बनला नाही. तथापि त्यामुळे कारखाने, कामगार, गुणवत्ता प्रणाली आणि पुरवठादारांच्या पुढील स्तराला आकर्षित करण्यासाठी पुरेशी मोठी देशांतर्गत बाजारपेठ नक्कीच निर्माण झाली.

आता आपण अंतराळाबद्दल बोलूया. जुलै २०२६ मध्ये जेव्हा स्कायरूटच्या विक्रम-१ ने श्रीहरिकोटा येथून उड्डाण केले, तेव्हा हे प्रक्षेपण महत्त्वपूर्ण ठरले. कारण एका खाजगी संघाने प्रणोदन, साहित्य, एव्हियॉनिक्स, सॉफ्टवेअर आणि परिचालन या सर्वांना एकाच आव्हानात्मक यंत्रात एकत्रित करण्याचे तंत्र आत्मसात केले होते. इस्रोच्या संचित ज्ञानामुळे आणि पायाभूत सुविधांमुळे ही शिकण्याची प्रक्रिया शक्य झाली तर इन-स्पेसने त्यासाठी एक व्यावहारिक पूल खुला केला. भारतात आता शेकडो अंतराळ स्टार्टअप्स आहेत. नरेंद्र मोदींनी या अंतराळ पिढीला प्रेरणा दिली आहे.

संरक्षण आयातीमुळे उपकरणे उपलब्ध होऊ शकतात, पण यामुळे आपण महत्त्वाच्या क्षणी असुरक्षित बनू शकतो. भारताचे संरक्षण उत्पादन आर्थिक वर्ष २०२६ मध्ये १.७८ लाख कोटी रुपयांवर पोहोचले आणि निर्यात आर्थिक वर्ष २०१४ मधील ६८६ कोटी रुपयांवरून वाढून ३८,४२४ कोटी रुपयांवर पोहोचली. हे आकडे अभूतपूर्व गती दर्शवतात. इंडिया एआय मिशन १०,३७१.९२ कोटी रुपयांच्या खर्चासह स्टार्टअप्स आणि संशोधकांसाठी सामायिक संगणकीय सुविधा निर्माण करून मुख्य अडथळ्यांपैकी एक कमी करण्याचा प्रयत्न करत आहे. ही एक सुज्ञ सार्वजनिक गुंतवणूक आहे.

हे सर्व एका कमी आकर्षक विषयाकडे घेऊन जाते: संशोधन संस्था. प्रगत तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात असे अनेक मोठे टप्पे येतात, जेव्हा दाखवण्यासारखे काहीही प्रभावी नसते. व्हेंचर कॅपिटल अशा दशकभराच्या अनिश्चिततेला निधी देऊ शकत नाही. ती उणीव भरून काढण्यासाठी अनुसंधान राष्ट्रीय संशोधन प्रतिष्ठानची स्थापना करण्यात आली, ज्यासाठी २०२३-२८ या काळाकरिता ५०,००० कोटी रुपयांची नियोजित तरतूद आहे. उदयोन्मुख क्षेत्रांमधील खाजगी क्षेत्राच्या संशोधन आणि विकासाला पाठिंबा देण्यासाठी १ लाख कोटी रुपयांची एक स्वतंत्र संशोधन, विकास आणि नवोन्मेष योजना आहे.

माझ्या लक्षात आहे, एक काळ होता जेव्हा आपल्याला सॉफ्टवेअर सेवा आणि सॉफ्टवेअर उत्पादने यांमधील फरक ओळखणेही कठीण जात होते. आता ती चर्चा संकुचित वाटते. तरुण भारतीय कंपन्या चिप्स, रॉकेट्स, ड्रोन्स, एआय मॉडेल्स, वैद्यकीय उपकरणे आणि प्रगत सामग्री यांवर काम करत आहेत. हा एक दीर्घ आणि खडतर प्रवास आहे आणि म्हणूनच धोरणातील सातत्य अत्यंत महत्त्वाचे ठरते. एखादे उत्पादन केंद्र, संरक्षण मंच किंवा संशोधन विद्यापीठ निवडणुकीच्या चक्रानुसार उभारले जाऊ शकत नाही. कंपन्या आणि संस्थांना प्रतिसाद देण्यासाठी पुरेसा वेळ मिळावा म्हणून मोदी सरकारने सामरिक तंत्रज्ञानाला आपल्या विकास कार्यक्रमाच्या केंद्रस्थानी ठेवले आहे.

भारताने प्रगत तंत्रज्ञानाला प्रदीर्घ काळ अशी वस्तू मानले, जी इतरांनी ते कठीण ज्ञान मिळवल्यानंतर विकत घ्यायची असते. आता आपण ते ज्ञान स्वतःच अधिक प्रमाणात मिळवण्याचा पर्याय निवडत आहोत. हाच तो बदल आहे, जो साजरा करण्यासारखा आहे. ■

(लेखक झोहो कॉर्पोरेशनचे संस्थापक आणि माजी मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत)



निमित्त

# विश्वगुरू भारत आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी

**श्यामकांत जहागीरदार**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा यावेळचा म्हणजे १७ सप्टेंबरचा वाढदिवस विशेष म्हटला पाहिजे. यावर्षी ७ ऑक्टोबरला मोदी सरकार प्रमुख म्हणून २५ वर्षे पूर्ण करीत आहेत. गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून मोदी यांनी सलग १३ वर्षे काम केले, तर पंतप्रधान म्हणून त्यांना १२ वर्षे पूर्ण झाली आहेत. सरकार प्रमुख म्हणून २५ वर्षांचा रौप्यमहोत्सवी कार्यकाळ पूर्ण करणारे नरेंद्र मोदी देशातील एकमेव पंतप्रधान आहेत.

पंतप्रधान झालेले मोदी देशातील पहिले मुख्यमंत्री नाही; याआधी मोरारजी देसाई, विश्वनाथ प्रतापसिंह, चौधरी चरणसिंह आणि एच. डी. देवेगौडा या पंतप्रधानपद भूषविलेल्या लोकांनी मुख्यमंत्री म्हणून जबाबदारी सांभाळली आहे. पण, हे चौघेही फार काळ पंतप्रधान राहिले नाहीत. पंतप्रधानपदाच्या कार्यकाळाचा विचार केला तर मोदी तिसऱ्या स्थानावर आहेत. पहिल्या स्थानावर पंडित जवाहरलाल नेहरू तर दुसऱ्या स्थानावर त्यांच्या कन्या इंदिरा गांधी आहेत. मात्र, या दोघांनाही कधी मुख्यमंत्रिपद भूषवता आले नाही. मुख्यमंत्री आणि पंतप्रधानपद एक तपापेक्षा जास्त काळ भूषविण्याचे भाग्य लाभलेले मोदी देशातील एकमेव तपस्वी नेते म्हटले पाहिजे.

नेहरू, इंदिरा गांधी, अटलबिहारी वाजपेयी आणि नरेंद्र मोदी वगळता देशात अन्य कोणत्याही पंतप्रधानांना या चार नेत्यांएवढी लोकप्रियता लाभली नाही, ही वस्तुस्थिती आहे. लोकप्रियतेच्या बाबतीत मोदी यांनी पंडित जवाहरलाल नेहरू आणि इंदिरा गांधी यांच्यावर निर्विवाद मात केली आहे.

राजकीय क्षेत्रात मोदी यांनी एकापाठोपाठ जे विक्रम केले, ते आतापर्यंत कोणत्याच नेत्याला शक्य झाले नाही. सध्याच्या स्थितीत इंदिरा गांधी यांचा पंतप्रधान म्हणून कार्यकाळ मोदी यांच्यापेक्षा जास्त आहे, पण इंदिरा गांधींना सलग तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेता आली नाही. तो विक्रम मोदी यांच्या नावावर आहे. असा विक्रम करत मोदी यांनी पंडित नेहरू यांच्या विक्रमाशी बरोबरी केली.

मोदी यांचे सर्व राजकारण जनतेला डोळ्यासमोर ठेवून केलेले म्हणजे लोककल्याणाशी संबंधित आहे. अनेक छोट्या-मोठ्या गोष्टीतून मोदी यांनी देशातील जनतेची नाडी पकडली आणि मन जिंकले आहे. देशातील अनेक दिग्गज राजकीय नेत्यांना जे शक्य झाले नाही, ते मोदी यांनी करून दाखवले आहे. देशातील सर्वसामान्य जनता ज्या घोषणा देत होती, त्या जवळपास सर्व घोषणांची पूर्तता मोदी यांनी केली आहे. मग, ते स्वप्न जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारे घटनेतील कलम ३७० रद्द करण्याचे असो, महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याचे असो की, मुस्लिम महिलांना स्वाभिमानाने जगण्याचा मार्ग उपलब्ध करून देणारा असो की, अयोध्येत राम मंदिर उभारण्याचे असो, या सर्व राष्ट्रीय स्वप्नांची पूर्तता मोदी यांनी केली आहे. एकेकाळी जम्मू-काश्मीरला विशेषाधिकार देणारे कलम ३७० निष्प्रभ होऊ शकेल, अयोध्येत राम मंदिर साकार होऊ शकेल, याची कल्पनाही कोणी करू शकत नव्हते, या गोष्टी अशक्यप्राय वाटत होत्या. ‘जे न देखे रवी ते देखे कवी’ असे कवींचे माहात्म्य सांगणारे एक सुभाषित आहे, त्याच धर्तीवर, जे करण्याची हिंमत देशातील आतापर्यंतच्या एकाही राजकीय नेत्याला झाली नाही, त्या सर्व गोष्टी मोदी यांनी शब्दशः आणि चुटकीसरशी घडवून आणल्या. जादूगार आपल्या पेटाऱ्यातून एक-एक चमत्कार घडवतो, तसे अनेक चमत्कार मोदी यांनी राष्ट्रीय राजकारणात घडवले आहे.

मोदींसाठी अशक्य काहीच नाही. ‘अशक्य’ हा शब्दच त्यांच्या शब्दकोशात नाही. मोदींची राजकीय इच्छाशक्ती, दृढ निर्धार तसेच देशातील गोरगरीब तसेच सर्वसामान्य जनतेबद्दलची आस्था हे मोदी यांच्या यशाचे गमक आहे. सत्तेवर आल्यानंतर मोदी यांनी ‘न खाऊंगा न खाने दूंगा’ अशी गर्जना केली होती; ती त्यांनी बऱ्यापैकी साध्य केली आहे. भ्रष्टाचार पूर्णपणे संपवणे कोणालाच शक्य नाही, पण मोदी यांनी भ्रष्टाचारावर नियंत्रण आणले आहे, तो बऱ्यापैकी कमी केला आहे. महत्त्वाचे म्हणजे आज उजळमाथ्याने भ्रष्टाचार करणे कमी झाले आहे, आज भ्रष्टाचार करणाऱ्यांना आपण पकडले गेलो तर कोणी वाचवणार नाही, अशी धास्ती त्यांच्या मनात सतत असते.

लाल किल्ल्यावरून सलग एक तप भाषण करणारे मोदी देशातील दुसरेच पंतप्रधान आहेत. लालकिल्ल्यावरून भाषण करताना मोदी यांनी ज्या कल्पना मांडल्या, मग ती स्वच्छ भारताची असो, आत्मनिर्भर भारताची असो की गरीब कल्याणाची. या सर्व घोषणांची पूर्तता मोदी यांनी केली आहे. मोदी यांची लोकप्रियता समाजाच्या सर्व वर्गांत आहे. आजपर्यंत देशातील कोणत्याही पंतप्रधानांच्या मनात ‘परीक्षा पे चर्चा’ घ्यावी अशी कल्पना आली नाही. मोदी यांच्या मनात ही कल्पना आल्यावर त्यांनी तातडीने ती कृतीत आणली. अभ्यास करताना आठवी, नववी आणि दहावीच्या मुलांना कोणत्या अडचणींचा सामना करावा लागतो; त्याचे निराकरण मोदी यांनी केले. या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचे विशेष अभियान सुरू केले. देशाचा पंतपधान शाळकरी विद्यार्थ्यांमध्ये सहज रमतो, हे चित्र भारताने काय जगातील कोणत्याच देशाने अनुभवले नसेल. मोदी दरवर्षी आपली दिवाळी सीमेवरील जवानांसोबत साजरी करतात. २०१४ नंतरची मोदी यांनी आपली एकही दिवाळी पंतप्रधान निवासात साजरी केली नसेल. देशाच्या रक्षणासाठी सीमेवर लढणाऱ्या जवानांसोबत दिवाळी साजरी करण्याची कल्पना आजपर्यंत देशातील एकाही पंतप्रधानाला एखादा अपवाद वगळता सुचली नसेल.

मोदी यांची विचार करण्याची, निर्णय घेण्याची आणि काम करण्याची पद्धतच वेगळी आहे. मोदींच्या मनात विचार करताना, निर्णय घेताना प्रत्येक वेळी देशातील जनता केंद्रस्थानी असते. त्यामुळेच मोदींचे सर्व निर्णय हे धाडसी असले तरी लोकाभिमुख आणि कल्याणकारी असतात. त्यामुळेच मोदी देशहितासाठी तसेच देशातील जनतेच्या कल्याणासाठी काहीही करू शकतात, कोणत्याही थराला जाऊ शकतात, त्यामुळेच ‘मोदी है तो मुमकिन है’ असा विश्वास देशवासीयांच्या मनात निर्माण झाला आहे. मोदी यांच्या पंतप्रधानपदावर आरूढ झाल्यानंतर देशातील राजकारणाचे चित्र आणि संस्कृती बदलली आहे. मोदी यांच्या दूरदृष्टीच्या नेतृत्वामुळे जगात भारताची प्रतिमा बदलली आहे, भारताबद्दल विश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे. जगातील अनेक देशांच्या भारताकडून अपेक्षा वाढल्या आहेत, आपल्या अडचणीच्या परिस्थितीत भारत आपल्या मदतीला धावून येईल, असा विश्वास निर्माण झाला आहे. मोदी यांच्या नेतृत्वाचे आणि कर्तृत्वाचे हे यश म्हटले पाहिजे.

मोदी यांच्याबद्दल भारतातीलच नाही तर जगाच्या कानाकोपऱ्यातील अनिवासी भारतीयांच्या मनातही विश्वास आहे, आपल्यावर काही संकट आले तर मोदी आपल्यासाठी धावून येतील, असा विश्वास निर्माण झाला आहे. मोदी यांनी आपल्या कृतीने अनेकदा हा विश्वास सार्थ करून दाखवला आहे. त्यामुळेच मोदी यांच्या नेतृत्वात भारताची विश्वगुरू होण्याच्या दिशेने वाटचाल सुरू झाली, ही वाटचाल निर्णायक टप्प्यात पोहोचून भारत विश्वगुरू झाल्याशिवाय राहणार नाही आणि तसे झाले तर त्याचे निर्विवाद श्रेय फक्त आणि फक्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचेच राहणार आहे. ■

९८८१७१७८१७

# नरेंद्र मोदी यांचे कणखर-लवचीक परराष्ट्र धोरण

**अभिजित लिखिते**

भारताच्या परराष्ट्र धोरणाला नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या दशकात अधिक सक्रिय आणि व्यापक स्वरूप प्राप्त झाले. २०१४ मध्ये पंतप्रधानपद स्वीकारल्यानंतर भारताने अमेरिका, रशिया, जपान, ऑस्ट्रेलिया, युरोप, पश्चिम आशिया आणि आफ्रिका या सर्वच भागांशी संबंध दृढ करण्याचा प्रयत्न केला. त्याचवेळी राष्ट्रीय सुरक्षा, दहशतवाद, ऊर्जा, संरक्षण, व्यापार आणि तंत्रज्ञान हे विषय परराष्ट्र धोरणाशी जोडण्यात आले. मोदी यांच्या परराष्ट्र धोरणाचे वैशिष्ट्य म्हणजे कोणत्याही एका शक्तिकेंद्रावर अवलंबून न राहता भारताच्या हितानुसार विविध देशांशी संबंध ठेवणे. त्यामुळे या धोरणाची ओळख कणखरतेसोबतच व्यवहारवाद, रणनीतिक स्वायत्तता आणि लवचीक अशीही करता येते.

### राष्ट्रीय हिताला सर्वोच्च प्राधान्य

परराष्ट्र धोरणात राष्ट्रीय हित हा मूलभूत आधार असतो. नरेंद्र मोदी यांनी सुरक्षा, आर्थिक विकास, ऊर्जा उपलब्धता, संरक्षण तंत्रज्ञान आणि भारताच्या जागतिक प्रभावाची परस्पर जोडणी केली. भारताने अमेरिकेशी जवळीक वाढवली, परंतु रशियाशी पारंपरिक संबंध कायम ठेवले. इस्त्रायलशी संरक्षण सहकार्य वाढवतानाच अरब राष्ट्रांशीही घनिष्ठ संबंध विकसित केले. या दृष्टिकोनामुळे भारताला एकाच आंतरराष्ट्रीय गटावर अवलंबून न राहता अनेक पर्याय खुले ठेवता आले.

### दहशतवादाविरोधातील कठोर भूमिका

नरेंद्र मोदी सरकारच्या परराष्ट्र धोरणातील सर्वाधिक ठळक बदल म्हणजे दहशतवादाच्या प्रश्नाकडे पाहण्याची पद्धत. उरी हल्ल्यानंतर २०१६ मध्ये झालेली सर्जिकल स्ट्राईक आणि पुलवामा हल्ल्यानंतर २०१९ मध्ये करण्यात आलेली बालाकोट कारवाई, त्यानंतर ‘ऑपरेशन सिंदूर’ या घटनांनी भारताने दहशतवादी हल्ल्यांना प्रत्युत्तर देण्याची राजकीय इच्छाशक्ती दाखवली. यामुळे भारताचे सुरक्षा धोरण परराष्ट्र धोरणाशी अधिक जवळून जोडले गेले.

### चीनसमोर सामरिक संतुलन

भारतासाठी चीन हा एकाच वेळी मोठा व्यापार भागीदार आणि प्रमुख सामरिक प्रतिस्पर्धी आहे. या द्वंद्वात्मक संबंधांमध्ये मोदी सरकारने संवाद आणि प्रतिबंध या दोन्हींचा वापर केला. डोकलाम आणि लडाखमधील तणावानंतर सीमावर्ती पायाभूत सुविधा, लष्करी सज्जता आणि सामरिक भागीदारी यांना अधिक महत्त्व मिळाले. त्याचवेळी चीनशी पूर्ण संबंधविच्छेद करण्याऐवजी बहुपक्षीय व्यासपीठांवर संवाद कायम ठेवण्यात आला. क्वाडमधील भारताचा सहभाग हा भारत-प्रशांत क्षेत्रातील सामरिक संतुलनाचा महत्त्वाचा भाग बनला. अमेरिका, जपान आणि ऑस्ट्रेलियासोबत सहकार्य वाढवून भारताने सागरी सुरक्षेतील आपली भूमिका मजबूत केली.

### ‘ॲक्ट ईस्ट’ आणि आग्नेय आशिया

भारताची पूर्वेकडील भूमिका अधिक सक्रिय करण्यासाठी ‘लूक ईस्ट’ धोरणाला ‘ॲक्ट ईस्ट’चा वेग देण्यात आला. आसियान देशांशी व्यापार, संपर्क, संरक्षण आणि सांस्कृतिक संबंध वाढवण्यावर भर देण्यात आला. जपान आणि ऑस्ट्रेलियासोबतच्या संबंधांनाही यामुळे व्यापक रणनीतिक परिमाण मिळाले. ईशान्य भारताला दक्षिण-पूर्व आशियाशी जोडण्याचा प्रयत्न हा या धोरणाचा आर्थिक आणि भौगोलिकदृष्ट्या महत्त्वाचा भाग आहे.

पश्चिम आशिया भारतासाठी ऊर्जा, व्यापार, गुंतवणूक आणि प्रवासी भारतीय या चारही कारणांमुळे महत्त्वाचा आहे. मोदी सरकारने या प्रदेशातील विविध देशांशी संबंध स्वतंत्रपणे विकसित केले. इस्त्रायलशी संरक्षण आणि तंत्रज्ञान सहकार्य वाढवताना यूएई आणि सौदी अरबशी आर्थिक व सामरिक संबंध मजबूत करण्यात आले. इराणशीही भारताने आपले दीर्घकालीन हितसंबंध जपण्याचा प्रयत्न केला. यामुळे भारताने पश्चिम आशियातील गुंतागुंतीच्या राजकारणात एका गटाची बाजू घेण्याऐवजी स्वतंत्र समीकरणे निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

### अमेरिकेशी रणनीतिक भागीदारी

भारत-अमेरिका संबंध मोदी सरकारच्या काळात संरक्षण आणि तंत्रज्ञानापासून अंतराळ, ऊर्जा आणि भारत-प्रशांतपर्यंत विस्तारले.क्वाड, संरक्षण सहकार्य आणि उच्च तंत्रज्ञान क्षेत्रातील भागीदारीमुळे दोन्ही देशांचे संबंध अधिक व्यापक झाले. अमेरिकेशी वाढलेली जवळीक ही चीनच्या वाढत्या प्रभावाच्या पृष्ठभूमीवर भारतासाठी महत्त्वाची ठरली. तरीही भारताने रशियाशी संबंध तोडले नाहीत. त्यामुळे अमेरिकेशी भागीदारी आणि स्वतंत्र निर्णयक्षमता यांचा समतोल राखण्याचा प्रयत्न दिसतो.

### प्रवासी भारतीय आणि सांस्कृतिक कूटनीती

नरेंद्र मोदी यांच्या परराष्ट्र धोरणात प्रवासी भारतीय समुदायाला विशेष स्थान मिळाले. विविध देशांमध्ये भारतीय समुदायाशी थेट संवाद साधून त्यांना भारताच्या विकास प्रक्रियेशी जोडण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्याचबरोबर योग, भारतीय संस्कृती, बौद्ध वारसा आणि आयुर्वेद यांचा आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रचार करण्यात आला. संयुक्त राष्ट्रांनी २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिन स्वीकारणे हे भारताच्या सांस्कृतिक प्रभावाचे महत्त्वाचे उदाहरण आहे.

### संरक्षण आणि आर्थिक हितसंबंध

परराष्ट्र धोरण केवळ राजनैतिक बैठका किंवा करारांपुरते मर्यादित न ठेवता संरक्षण आणि आर्थिक हितसंबंधांशी जोडण्यावर भर देण्यात आला. विविध देशांबरोबर संरक्षण सहकार्य, तंत्रज्ञान हस्तांतरण, गुंतवणूक आणि व्यापार वाढवण्याचा प्रयत्न झाला. त्यामुळे परराष्ट्र संबंधांचा उपयोग भारताच्या आर्थिक आणि सुरक्षा गरजा पूर्ण करण्यासाठी करण्याची प्रवृत्ती अधिक ठळक झाली. ■

९०२८०५५१४१

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८

RNI Reg.No 46878/87

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# आकांक्षा

# गौराई आली सोनपावली...

शशिकांत तोटे
९१३०८३५४५८



आनंद, उत्कर्ष, चैतन्य, भक्तीभावबंधाचा अनोखा महोत्सव म्हणजेच वर्षा ऋतू.. वर्षा ऋतूत निसर्ग संपदेची भरभराट असते. आषाढ... श्रावण... भाद्रपद मासात तर प्रतिदिन उत्सव साजरा होत असतो. आपली संस्कृती निसर्गपूरक पौराणिक वारसा चालविणारी आहे. आपली व्रतवैकल्ये संस्कृतीची अविभाज्य अंगे बनली आहेत. पौराणिक संदर्भानुसार, भगवान श्रीहरी विष्णू देवशयनी एकादशीपासून तर कार्तिकी देवउठणी एकादशी पर्यंत क्षीरसागरात शेषशय्येवर योगनिद्रेस प्रारंभ करतात. त्यांच्या गैरहजेरीत देवाधिदेव भगवान श्री शंकरांकडे सृष्टीचे चक्र सांभाळण्याचे सूत्र सोपवितात. या काळात संपूर्ण श्रावण मासात श्री शंकराची उपासना केली जाते. श्रावणानंतर शिव गौरींचे पुत्र विघ्नहर्ता वरदविनायकाचे आगमन घरोघरी होते. तर भाद्रपद शुक्ल अष्टमीला आद्यदेवी पार्वतींचे गौराईच्या रूपाने आराधनेस प्रारंभ होतो.

भाद्रपद महिन्याच्या शुक्ल पक्ष अनुराधा नक्षत्रावर गौराई (ज्येष्ठा-कनिष्ठा) चे आगमन होत असते. पुढे सलग तीन दिवस आवाहन, पूजन, महाआरती असा त्रिदिवसीय उपासना विधींचा क्रम मोठ्या श्रद्धेने, भक्तीभावाने, नियोजनाने परिपूर्णरित्या साजरा होतो. ही 'गौराई' आपल्या माहेरी माहेरवाशीण म्हणून आलेली असते. गौर वर्णाची म्हणून 'गौराई' नांवलौकीकास आहे.

विदर्भात तिला महालक्ष्मी म्हटले जाते. गौराई ही एकटी येत नाही, तर त्या दोघी बहिणी ज्येष्ठा आणि कनिष्ठा आपल्या बाळांसोबत येतात. गौराई गणपतीची आई म्हणजेच पार्वती माता आणि माता लक्ष्मीची मोठी बहीण मानली जाते. माहेरवाशीण लेकी प्रमाणेच आनंदाने तिचे स्वागत होते. तिला सुख मिळावे म्हणून तिची धार्मिक चालीरिती, रिवाजानुसार सरबराई केली जाते.

एका पौराणिक कथेनुसार, असुरांच्या त्रासाला कंटाळून सर्व स्त्रिया आपल्या सौभाग्याचे रक्षण करण्यासाठी गौरीला शरण येतात. शरण आलेल्या स्त्रियांच्या प्रसादार्थ गौराईंनी स्त्रियांचे रक्षण केले. भाद्रपद शुक्ल सप्तमीलाच गौराईने असुरांचा संहार करून स्त्रियांना भयमुक्त केले होते. अखंड सौभाग्याच्या अभिलाषेपाई गौराईचा कृपाप्रसाद असाचं कायम राहावा; या श्रद्धा भावाने स्त्रिया गौराईंचे व्रत आजही मोठ्या भक्ती भावाने कुटुंबासमावेत करतात. एवढेच नव्हे, तर तिच्या आगमनार्थ स्त्रिया समूहाने नाचत बागडत गीते सुद्धा म्हणतात..

'चला गो सयांनो चला गौराई पुजुया...गौराई पुजुया..गौराई पुजुया... तिला मानपानं देऊया...

आली गौराई सोनंपावली, अंग भरून लेण ती न्याली... लेकीबाईंची ती माय माऊली... देईल ती सुखाची सावली...!'

या उत्सवात कुटुंबातील लहान थोर सहकार्य करतात. गौराई चरणी आपली सेवा समर्पित करून नतमस्तक होतात.

## गणेशाच्या २१ पत्री : निसर्गाशी नाते सांगणारी परंपरा

डॉ. प्राची क्षीरसागर
९९२३३६७४५२


अडुळसा


डोरली


विष्णुकांत


आघाडा

श्रावण संपताच गणरायाच्या आगमनाची उत्सुकता वाढू लागते. मखर, सजावट आणि पूजेच्या तयारीसोबत गणेशाला अर्पण केली जाणारी २१ पत्री ही केवळ धार्मिक परंपरा नसून आपल्या समृद्ध वनस्पतीज्ञानाची, लोकपरंपरेची आणि निसर्गाशी असलेल्या नात्याची ओळख करून देणारी परंपरा आहे. गणेशपूजेत परंपरेनुसार २१ विविध वनस्पतींची पाने अर्पण केली जातात. धार्मिक दृष्टिकोनातून २१ या संख्येला विशेष महत्त्व आहे. एका मान्यतेनुसार ही संख्या मानवी अस्तित्वातील ५ कर्मेंद्रिये, ५ ज्ञानेंद्रिये, ५ प्राण, ५ महाभूत, १ मन या २१ प्रतीकात्मक संकल्पनेचे प्रतिनिधित्व करते.गणेशोत्सवाच्या काळात विशेषतः कोकण आणि गोव्यात 'माटोळी' सजवण्याची परंपरा आहे. फळे, फुले, पाने, कंद, मुळे, वेली आणि इतर ऋतुनिष्ठ वनस्पतींनी सजलेली माटोळी म्हणजे स्थानिक जैवविविधतेचे जणू एक जिवंत प्रदर्शनच असते. या परंपरेमुळे परिसरातील विविध वनस्पतींची ओळख, त्यांचे पारंपरिक उपयोग आणि निसर्गाशी असलेले नाते पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचण्यास मदत होते.

परंपरेतील दूर्वा, पिंपळ, जाई, अडुळसा, रूई, मारवा, कण्हेर, देवदार, डोरली, आघाडा, आंबाडा, विष्णुकांत, शमी, तुळस, धोत्रा, बेलपत्र, माका, मधुमालती, बोर, हादगा आणि केवडा यांसारख्या वनस्पतींपैकी अनेक वनस्पतींना लोकपरंपरा आणि आयुर्वेदात औषधी किंवा आहारोपचारात्मक महत्त्व दिले आहे. दुर्वा दाहशामक म्हणून, पिंपळ कषाय व स्तंभक गुणांसाठी, तर जाई त्वचा, जखम आणि मुखविकारांतील पारंपरिक उपयोगासाठी ओळखली जाते. अडुळसा सर्दी-खोकला व श्वसनविकारांमध्ये, रूई सूज व काही त्वचाविकारांमध्ये बाह्योपचारासाठी, तर मारवा पाचक आणि सुगंधी वनस्पती म्हणून पारंपरिक वापरात आहे.

कण्हेरचा बाह्योपचारातील पारंपरिक उल्लेख आढळतो; मात्र तो विषारी असल्याने त्याचे अंतर्गत सेवन धोकादायक आहे. देवदार वात-कफशामक व दाहशामक, तर डोरली वात-कफशामक मानली जाते. आघाडा कफ-वातशामक व कृमिघ्न, आंबाडा रुचिवर्धक व पाचक, तर विष्णुकांत मेध्य व शांतिदायक वनस्पती म्हणून पारंपरिक आयुर्वेदात उल्लेखिला जातो. तुळस सर्दी-खोकल्यासाठी, शमी दाह व व्रणशमनासाठी, बेलपत्र पचनविकारांसाठी आणि माका केसांच्या आरोग्यासाठी पारंपरिकरीत्या वापरला जातो. बोर पौष्टिक फळ, हादगा पौष्टिक भाजी, तर केवडा सुगंधी व शीतल वनस्पती म्हणून परिचित आहे. धोत्रा आणि कण्हेर विषारी वनस्पती असल्याने त्यांचा औषधी वापर तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखालीच करणे आवश्यक आहे. मधुमालतीसह इतर पत्रींनाही विविध पारंपरिक उपयोग आहेत.

त्यामुळे २१ पत्री ही केवळ श्रद्धेची परंपरा नसून वनस्पतींची ओळख, पारंपरिक उपयोगज्ञान, स्थानिक जैवविविधतेची जाणीव आणि निसर्गसंवर्धनाचा संदेश देणारी समृद्ध सांस्कृतिक परंपरा आहे. या परंपरेतून आपल्या पूर्वजांनी धार्मिक आचारांमध्येही स्थानिक जैवविविधतेचे ज्ञान जतन केलेले दिसते. मात्र श्रद्धेच्या नावाखाली अनावश्यक वनस्पतीतोड होऊ नये, तसेच वनस्पतींची अचूक ओळख असणे आवश्यक आहे. आजकाल कोणत्याही उपलब्ध झाडांची पाने वापरली जातात मात्र परंपरेतील वनस्पतींची योग्य ओळख आणि शास्त्रीय माहिती जनमानसापर्यंत पोहोचवणे गरजेचे आहे. आवश्यक तेवढीच पाने घ्यावीत; मुळे, कंद, खोड किंवा संपूर्ण वनस्पती उपटू नयेत. दुर्मिळ किंवा स्थानिक पातळीवर कमी होत चाललेल्या वनस्पतींचे विशेष संवर्धन करणे आवश्यक आहे.

माटोळी, गणेशपूजा आणि इतर धार्मिक विधींसाठी वनस्पतींच्या वापरावर वाढता दबाव लक्षात घेता, शक्य त्या वनस्पतींच्या स्थानिक पातळीवर लागवडीला प्रोत्साहन देणे, घरगुती बागांमध्ये त्यांचे संवर्धन करणे आणि शाश्वत पद्धतीने वनस्पतींचे संकलन करणे ही काळाची गरज आहे.

## वर्दीतील गणेशा...!



चित्रा नानिवडेकर
९९६९६६९५२३

सरिता खास 'राजाच्या' ड्युटीसाठी भल्या पहाटे मंडपात पोहचली.

खांद्यावरून हळूच वर येणारी तांबूस किरणं जेव्हा लालबागच्या मंडपावर पडली, तेव्हाच गर्दीचा समुद्र उफाळायला लागला होता. घरच्या गणपतीची तयारी, त्यात काल संध्याकाळी राजाच्या बंदोबस्तासाठी तिची निवड म्हणून एक्सट्रा ड्युटी. पोलीस शिपाई सरिता मुंडे सलग बारा तास उभी होती. पायाच्या शिरा गोळा झाल्यासारख्या दुखत होत्या, पण विश्रांती शब्दालाही या गर्दीत जागा नव्हती.

'गणपती बाप्पा मोरया'च्या गजरापेक्षाही मोठा आवाज सरिताच्या कानाजवळ घुमला, "अहो मॅडम, बघा काहीतरी करा ना! दोन तास झाले रांगेत उभे आहोत!"

सरितानी शांतपणे हात जोडले, "दादा, थोडे सहकार्य करा. पुढे जागा खाली झाली की सोडणार."

एवढ्यात वरिष्ठ अधिकाऱ्याची शिट्टी आणि दमदाटीचा आवाज आला, "मुंडे! तिकडे काय गप्पा मारताय? मागे व्हा! साहेबांची गाडी आणि व्हॉट्सॲपवर पाठवलेली व्ही.आय.पी. लिस्ट आली आहे. त्यांना लगेच व्ही.आय.पी. गल्लीतून आत सोडा!"

सरिता यांच्या छातीत एक सूक्ष्म कळ उमटली. रांगेत तासनतास ताटकळलेली गरोदर महिला, लहान रडणाऱ्या मुलाला कडेवर घेऊन उभी आई आणि पायाने अधू असलेली मुलगी, ज्येष्ठ आजोबा ताटकळत उभे होते. पण काही नामांकित गुंड, स्थानिक पुढारी आणि त्यांचे कार्यकर्ते हसत-खेळत, पोलिसांना हुकूम सोडत थेट बाप्पाच्या चरणांपर्यंत पोहोचत होते.

"मॅडम, तो कालच जेलमधून सुटलेला गुंड आधी आत कसा गेला?" एका तरुणीने सरिता यांच्याकडे पाहून उद्वेगाने विचारले.

सरिताकडे काहीच उत्तर नव्हतं. केवळ मान खाली घालणंच तिच्या हाती होतं. वरिष्ठांचा त्रास, मानसिक ताण आणि गर्दीची धक्काबुक्की चालूच होती. शरीराच्या नैसर्गिक गरजा रोखून धरणं आणि एकाच जागेवर १२-१४ तास उभं राहणं या शारीरिक वेदना तर ह्या पेशात आल्यापासून अनिवार्य आहेत. पण ह्या अन्यायकारक व्यवस्थेची जाणीव मनाला जास्त टोचत होती.

दुपारी अचानक गर्दीचा एक मोठा लोट आत घुसला. एक लहान मुलगी सरिताच्या पायाजवळ येऊन पडली. सरिताने क्षणाचाही विलंब न करता स्वतःच्या शरीराचा ढालीसारखा वापर करून त्या गर्दीला मागे रोखले. स्वतःला दोन-तीन फटके बसले, पण त्यांनी त्या लहान मुलीला सुरक्षित बाहेर काढले. मुलीच्या आईने डोळ्यात अश्रू आणून सरिताचे हात घट्ट धरले, "मॅडम, आज तुम्ही माझ्या लेकीला वाचवलं. बाप्पा तुमचं भलं करो." त्या एका वाक्याने सरिताचा सर्व शारीरिक आणि मानसिक थकवा क्षणात पळून गेला.

लालबागच्या राजाची भव्य मूर्ती सरिताच्या नजरेसमोर आली. भव्य, शांत आणि नयनमनोहर. सरितानी लांबूनच डोळे मिटून हात जोडले आणि मनातल्या मनात म्हणाल्या, "देवा, या व्ही.आय.पी. संस्कृतीच्या आणि व्यवस्थेच्या पलीकडे जाऊन, सामान्य माणसाचे रक्षण करण्याचे बळ मला रोज दे."

वरिष्ठांचा ओरडा पुन्हा ऐकू आला, पण आता सरिता यांच्या चेहऱ्यावर थकवा नव्हता, तर एक अढळ आत्मसन्मान आणि कर्तव्यनिष्ठेचे तेज होते.

त्या गर्दीतून एक तरुण पुढे येऊन सरिताला म्हणाला "मॅडम तुमच्यासारखी कर्तव्यनिष्ठ माणसं पोलिसांच्या वर्दीत असतात. म्हणून हे जग चालतं...गणपती बाप्पा मोरया."

## बाळाचा पूरक आहार आणि पोषण

डॉ. सीमा पांडे
९९२२९१९७२०



बाळाची वाढ होऊ लागते तशी बाळाची आवश्यक पोषक तत्वांची गरजही वाढते. या काळात बाळाला कोणता आहार द्यायला हवा यांबाबत पालकांच्या मनात अनेक प्रश्न असतात. बाळाला काय पाहिजे हे सांगता येत नसल्यामुळे आपण खाऊ घालत आहोत हे योग्य आहे का, बाळाला अन्नपदार्थ खाऊ घालायला कधीपासुन सुरु करावे, हे ही बरेचदा लक्षात न आल्याने गरजेपेक्षा लवकर किंवा खूप उशिरा खाऊ घातले जाते. बाळाचे पोट नाजूक असल्यामुळे बाळाला त्याचा त्रास होऊन बाळाच्या आहाराचा परिणाम त्याच्या शरीरप्रकृतीवर होऊ लागतो. आजचा हा लेख बाळाला सुरवातीच्या काळात कोणता आहार दिला पाहिजे याची माहिती देणारा आहे. पूरक आहार बाळ जन्मल्यानंतर सुरवातीचे सहा महिने बाळाला फक्त मातेचे दूध देणे आवश्यक असते. मातेच्या दूधातून बाळाच्या सर्व पोषणविषयक गरजा भागविल्या जातात. परंतु बाळ सहा महिन्यांचे झाल्यानंतर बाळाची पोषक तत्वांची गरज वाढू लागते जसे कॅल्शियम, लोह, झिंक, जीवनसत्वे. अशा वेळी बाळाला मातेच्या दुधाबरोबरच इतरही पदार्थ देण्याची आवश्यकता असते. यालाच पूरक आहार असे म्हणतात.

### बाळाला सहा महिन्याच्या आधी पूरक आहार देणे चुकीचे आहे कारण

बाळाची पचनसंस्था पूर्णपणे विकसित झालेली नसते. त्यामुळे बाळ वरचा आहार पचवू शकत नाही पर्यायाने बाळाला पोट बिघडणे, बध्दकोष्ठता, गॅस होणे यांसारख्या तक्रारी उद्भवू शकतात.

**बाळाला अन्नपदार्थांची एलर्जी होऊ शकते.**

बाळाच्या पचनसंस्थेवर ताण आल्याने भविष्यात बाळाला चयापचयाशी संबंधित समस्या निर्माण होऊ शकतात.

**बाळाची प्रतिकारशक्ती कमी होऊन बाळाला अनेक संसर्गजन्य आजार होऊ शकतात.**

बाळाला खूप उशीरा पूरक आहार सुरु करणेही चुकीचे आहे कारण,

कार्यशक्ती आणि वाढलेली पोषक तत्वांची गरज पूर्ण होणार नाही त्यामुळे पोषक तत्वांची कमतरता निर्माण होऊ शकते.

**पुरेसा आहार न मिळाल्याने बाळाची वाढ खुंटते.**

### बाळाला पूरक आहार कधी सुरू करावा याचे काही ठोकताळे

**बाळ सहा महिन्याचे झाल्यावर प्रतिक्षिप्त क्रिया, कौशल्ये आणि काही प्रमाणात बाळाचा शारीरिक आणि कारक विकास झालेला असतो ज्यामुळे बाळ वरचे अन्न पचवू शकते.**

बाळ डोकं वर काढतं. डोकं आणि मान यांचा समतोल सांभाळू शकतं. आधार दिल्यावर बाळ बसू शकते.

बाळ अन्न चघळण्याचा आणि गिळण्याचा प्रयत्न करतं.

**बाळाचे वजन वाढायला लागते. सामान्यतः बाळाच्या जन्माच्या वेळी असणारे वजन बाळ सहा महिन्याचे झाल्यावर दुप्पट होते.**

**महत्वाचे** – बाजारातील विकतचे रेडीमेड, इन्स्टंट पदार्थ बाळाला देऊ नयेत कारण असे अन्न दीर्घकाळ टिकावे म्हणून अशा पदार्थात प्रिझर्वेटिव्ज टाकलेले असू शकतात. भेसळीची शक्यता असते. ज्याचा बाळाला त्रास होऊ शकतो. त्यामुळे घरगुती अन्नपदार्थांचा वापर करावा. बाळाला कोणते अन्नपदार्थ द्यावेत, घरगुती इन्स्टंट कसे तयार करावे हे पुढील लेखात बघू.

## प्रश्न तुमचा, उत्तर तज्ज्ञांचे

योगिता तोडकर
yogita1883@gmail.com

**१. भविष्याची खूप चिंता वाटते, रात्री झोप येत नाही**

भविष्याची चिंता सगळ्यांनाच वाटते, विशेषतः करिअरच्या वेळी. कारण काळजी करणं यापेक्षा काळजी घेणं महत्वाचं. रात्री झोपण्यापूर्वी मोबाईल बाजूला ठेव. दिवसभरात जे विचार येतात ते एका वहीत लिहून काढ - याला 'वॉरी टाईम' म्हणतात. झोपण्यापूर्वी गरम पाणी, हलकं संगीत आणि दीर्घ श्वास घेण्याचा व्यायाम कर. जर २-३ आठवड्यांपेक्षा जास्त झोप येत नसेल तर समुपदेशकाशी किंवा डॉक्टरांशी नक्की बोल.

**२. नात्यात 'नाही' कसं बोलायचं? समोरच्याला वाईट वाटेल असं वाटतं**

'नाही' बोलणं म्हणजे वाईटपणा नाही, तो स्वतःचा आदर आहे. तुला जे नको आहे ते शांतपणे आणि स्पष्टपणे सांग - "मला हे आत्ता नको आहे" किंवा "मला यात comfortable वाटत नाहीये". यात अपराधी वाटून घ्यायची गरज नाही किंवा कोणतेही स्पष्टीकरण देण्याचीदेखील गरज नसते. जो खरंच तुझा आदर करतो, त्याला तुझ्या 'नाही' चा राग येणार नाही. सतत 'हो' बोलून स्वतःला त्रास करून घेण्यापेक्षा एकदा स्पष्ट 'नाही' बोलणं जास्त चांगलं.

**३.मला माझ्या शरीराचा खूप न्यूनगंड वाटतो, आरशात पाहायला नको वाटतं...**

याला मानस शास्त्रात सोशल कम्पॅरिझन म्हणतात...

हे आजकाल प्रत्येक दुसऱ्या मुलीला वाटतं, कारण आपण इन्स्टाग्रामवर फिल्टर लावलेली शरीर पाहतो... पण खरं शरीर तसं नसतंच... पण या तुलनांमुळे मेंदू आपोआप सांगतो की "मी कमी आहे". याला न्यूनगंड नाही तर चुकीची तुलना म्हणतात...

इथे बॉडी न्युट्रॅलिटी गरजेची आहे...

रोज आरशात दिसण्यावरून नाही, तर शरीराच्या कामावरून विचार करा- "आज माझ्या पायांनी मला चालायला मदत केली"

शरीर फक्त दिसण्यासाठी नाही, तर जगण्यासाठी आहे... रोज आरशात पाहून एक गोष्ट स्वतःबद्दल चांगली बोलायची सवय लावा... आज जी अकौंटस पाहून कम्पॅरिझन ट्रॅप सुरू असतो, ती म्यूट करणे ही स्वतःची काळजीच आहे...

**४. छोट्या छोट्या गोष्टींवर खूप राग येतो...**

राग येणं वाईट नाही, तो येणं स्वाभाविक आहे... जेव्हा राग येईल तेव्हा लगेच उत्तर देऊ नका... तिथून उठा आणि २ मिनिटं पाणी प्या किंवा अन्य काही काही करून सद्य परिस्थितीतून स्वतःला डायव्हर्ट करा... राग आल्यावर १-२ मिनिट काहीच बोलू नका... राग ही दुय्यम भावना आहे... त्यामुळे त्याच्यामागे अनेकदा थकवा, भूक, दुखावले जाण लपलेलं असू शकतं.. त्यामुळे ओरडण्यापेक्षा स्वतःला विचारा "मला नेमका कशाचा त्रास होतोय" आणि मग सुजाण पणे व्यक्त व्हा...मेंदूला राग आल्यावर रिएक्ट करण्यापेक्षा रिस्पॉन्ड करा...

**५. अभ्यासाचा खूप ताण येतो, काहीच लक्षात रहात नाही**

ताण आला की मेंदू पण थकतो, मग काहीच लक्षात राहत नाही... त्याचप्रमाणे जेव्हा डोक्यात खूप विचार असतात, तेव्हा मेंदूवर कॉग्निटिव्ह लोड येतो आणि तो नवीन माहिती घेत नाही... हा आळस नाही, तर थकवा आहे...

यासाठी मोठ्या कामाचे छोटे भाग करा... जसं आपण पोळीचे तुकडे करून पोळी खातो... आणि सगळ्यात महत्वाचं - झोप आणि जेवण. मेंदूला चार्जिंगची गरज असते, रात्रभर जागून तो चार्ज होत नाही.

**नमस्कार वाचकहो, आकांक्षा पुरवणीसाठी या ईमेल आयडीवर आपले लेखन पाठवा - tarunbharatakanksha@gmail.com / 8668289992**

## 'देवपूजा'

सुचित्रा बाकरे
९९७५७४३८८४



आपल्या सगळ्यांचे लाडके गणपती बाप्पा आपल्या बुद्धीला विवेकाची साथ देण्यासाठी, मनाला श्रद्धेचा आधार देण्यासाठी आणि विघ्नांचे रूपांतर सुखात करण्यासाठी घरोघरी अवतरले आहेत. श्रीगणेशाची खरी महती, देवाला बाहेरून घरात आणण्यापासून ते देवत्वाला अंतर्मनात जागवण्यापर्यंतचा प्रवास आहे, कदाचित हीच साकारातून निर्गुणाकडे जाणारी यात्रा होय.

यावेळी गणपती बाप्पांची पूजा काहीतरी वेगळी असावी असा विचार मनात येताच, स्वतःमधील दोषांचे भागाकार आणि गुणांचे गुणाकार करावे हेच ध्यानात आले. पूजेच्या पहिल्या दिवशी अंतर्बाह्य बदलण्याचा संकल्प घेऊन तो कृतीत आणला पाहिजे असे ठरवले. मानवी मनाला निराकार, निर्गुण तत्त्वांचे चिंतन सहज शक्य होत नाही म्हणून मनाला एक साकार प्रतीकाची आवश्यकता भासते. पण तीच मूर्ती म्हणजे "देव" आणि त्या दगडातच देव सीमित आहे असा अर्थ नव्हे. उलट साकारातून निर्गुणाकडे जाण्याचा तो एक मार्ग होय.

जीवनातील खरी विघ्ने बघायला गेलो तर नाते, पैसे, आरोग्य हे नसून अहंकार, आसक्ती, क्रोध, लोभ, मत्सर आणि यामागील अविवेक हीच आहेत. त्यासाठी मनाची दृष्टी बदलायला हवी. श्रद्धा दिशा देते आणि विवेक योग्य मार्ग दाखवतो. पण श्रद्धा ठेवताना हे ध्यानात असावे, की रूप, देह नश्वर आहे आणि कर्म, तत्व मात्र सत्य आहे. ते अमर आहे. अहंकार कमी झाला, एखादा विकार ओळखता आला, एखाद्या दुःखी व्यक्तीला आधार देता आला आणि मुख्य म्हणजे मनात राग असणाऱ्या व्यक्तीला क्षमा करता आली तर बाप्पाचे आगमन सार्थक झाले असे म्हणायला हरकत नाही.

झोपताना स्वतःसाठी पाच मिनिटे देऊ या. आज कितीवेळा चिडले, दुसऱ्यांना दोष किती वेळा दिला आणि क्वालिटी वेळ किती होता. स्वपरिक्षणाने व्यक्ती दोष नक्कीच कमी होतो असे स्वानुभावावरून सांगू शकते. देवाला घरात आणणे ही "भक्ती" आहे पण दैवत्वाला आचरणात ठेवणे ही "साधना" होय.

आपल्या बुद्धीला सारासार विवेक असावा म्हणजे परदुःख कळले पाहिजे, ज्या व्यक्तीचे छत्र हरवले आहे त्यांना सोबत केली पाहिजे, ज्यांची वाट चुकली आहे त्यांचा सारथी झालं पाहिजे. दुसऱ्याला गोष्टी सांगण्याआधी आपण त्या अमलात आणतो का? हा विचार असणे गरजेचे आहे. आपल्या घरी, आजूबाजूला काम करणाऱ्या व्यक्तींसाठी मनात प्रेम आणि शुद्ध भाव असायला हवा. हे जर लाभले तर ही पूजा खरी मानवतेची पूजा ठरेल!

आजचा २१व्या शतकातील तरुण जेव्हा "गणपती बाप्पा मोरया" अशी घोषणा देतो, तेव्हा त्यात एका आधुनिक आणि प्रगतीशील विचारांचा सूर असायला हवा. सार्वजनिक उत्सव हा दिखाव्यापेक्षा, संस्कार आणि मनोरंजनापेक्षा समाजसेवेकडे नेणारा असेल, तर त्याला निश्चितच सुंदर आध्यात्मिक आणि सामाजिक अर्थ प्राप्त होऊच शकतो. "सर्वांनी मिळून ईश्वराचे स्मरण करणे आणि समाजहितासाठी एकत्र येणे" असा हेतू असायला हवा. बाप्पाची पूजा करताना आपल्या बुद्धीला विवेकवादी बनवण्याचे साकडे घालतो का ? अफवांवर विश्वास न ठेवता, सोशल मीडियाचा सकारात्मक वापर करतो का ? आणि नवनवीन तंत्रज्ञान शिकून देशाच्या प्रगतीला हातभार लावतो का ? असा विचार असेल तरच ही आजच्या काळातील खरी 'बुद्धीची पूजा' होईल. बाप्पासमोर शांतपणे बसून मिळणारी मानसिक शांतता ही आजच्या डिजिटल युगात एका ध्यानासारखी काम करू शकते इथे सुरू होते ती परिपूर्ण साधना....!

## नागपूरच्या संस्कारातून मिसिसॉगाच्या सन्मानापर्यंत

टीम आकांक्षा

**चित्तरलेखा पोतनीस यांची प्रेरणादायी यशोगाथा**



काही प्रवास केवळ यशाचे नसतात, ते मूल्यांचे, संघर्षाचे आणि समाजासाठी जगण्याच्या ध्येयाचे असतात. नागपूरच्या कन्या चित्तरलेखा पोतनीस (पूर्वाश्रमीच्या चित्तरलेखा देशमुख) यांचा नागपूरपासून कॅनडापर्यंतचा प्रवास ही अशीच एक प्रेरणादायी कहाणी आहे. कॅनडातील ओंटारियो प्रांतातील मिसिसॉगा शहराचा प्रतिष्ठेचा "सिविक अवॉर्ड २०२६" त्यांना प्रदान करण्यात आला असून, हा सन्मान त्यांच्या शिक्षण क्षेत्रातील योगदानासाठी आणि समाजसेवेच्या समर्पणासाठी देण्यात आला आहे. मिसिसॉगा शहराच्या महापौर कॅरोलिन पॅरिश यांच्या हस्ते प्रदान झालेला हा पुरस्कार त्यांच्या निःस्वार्थ सेवाभावाची आणि समाजातील सकारात्मक परिवर्तनासाठी केलेल्या कार्याची दखल आहे. चित्तरलेखा पोतनीस या स्वर्गीय प्रा. डी. एन. देशमुख यांच्या कन्या आहेत. प्रा. देशमुख हे सर डॉ.विश्वेश्वरैय्या रिजनल कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सध्याचे व्हीएनआयटी नागपूर येथे आदरणीय प्राध्यापक होते. लहानपणापासूनच त्यांना शिक्षण, शिस्त, प्रामाणिकपणा आणि समाजासाठी योगदान देण्याचे संस्कार घरातून मिळाले.

नागपूर विद्यापीठाच्या पदवीधर असलेल्या चित्तरलेखा यांनी कॅनडामध्ये नवीन आयुष्याची सुरुवात केली. अनेक आव्हानांना सामोरे जात त्यांनी मेहनत, आत्मविश्वास आणि सकारात्मक दृष्टिकोनाच्या बळावर स्वतःची ओळख निर्माण केली. आज त्या पील कॉलेज ऑफ प्रोफेशनल स्टडीज, मिसिसॉगाच्या मालक आणि अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक विद्यार्थी, नवागत स्थलांतरित, महिला आणि युवकांना शिक्षण, कौशल्य विकास आणि करिअरच्या संधी मिळाल्या आहेत. शिक्षणाच्या माध्यमातून जीवन बदलण्याचा त्यांचा सातत्यपूर्ण प्रयत्न समाजासाठी प्रेरणादायी ठरला आहे.

"हा पुरस्कार केवळ माझा नाही; शिक्षण, माणुसकी आणि समाजसेवेवर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा आहे. इतरांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवणे हेच माझ्या कार्याचे खरे समाधान आहे." पुरस्कार सोहळ्यातील शब्द त्यांच्या मनाला कायमचे स्पर्शून गेले.



# संत्रा/मोसंबी फळ पिकातील आंबिया व मृग बहार फळगळ व्यवस्थापन

कृषी व्यवस्थापन

सद्यस्थितीत आंबिया बहाराची फळे ही विकसनशील अवस्थेत आहेत; तर मृग बहाराची वाटाणा दाणे अवस्थेत आहेत. साधारणतः पाण्याचा निचरा होणाऱ्या जमिनीत केलेली लागवड, झाडातील संजीवकांचा फळाच्या शेवटच्या टोकापर्यंत होणारा पुरवठा, कर्ब-नत्राचे संतुलन, संतुलित पोषण यामुळे फळे झाडावर परिपक्व होईपर्यंत टिकण्यास मदत होते. मात्र, सतत पावसाने जमीन संपृक्त होणे व त्यानंतर उघाड होऊन वाढलेले तापमान, कमी पालवी व फळांची झाडावर अधिक संख्या, अपुरे पोषण अशा वातावरणात आंबिया बहारातील फळपिकांवर विपरीत परिणाम होतो.

**वनस्पती शास्त्रीय आंतरिक फळगळ**



पावसाळ्यात सतत पाणी साचून जमीन संपृक्त होते, झाडाच्या मुळ्या कुजतात, मुळ्यांना प्राणवायू अल्प किंवा मिळत नसल्याने श्वसनक्रिया बाधित होते. परिणामी विकसनशील फळांवर त्यांचा परिणाम होऊन ती पिवळी होऊन गळून पडतात.

**बुरशीजन्य फळगळ**

संत्रा फळ झाडांमध्ये बुरशीजन्य फळगळ प्रामुख्याने फायटोप्थोरा, कोलेटोट्रीकम, डिप्लोडिआव ऑलटरनेरिया या बुरशीमुळे होते.

**व्यवस्थापन**

वनस्पती शास्त्रीय आंतरिक फळगळ व्यवस्थापनाकरिता खालील उपाय योजना करावयात -



कोलेटोट्रीकमस्टेम एंडरॉट

- बागेच्या उताराच्या बाजूने शेतातील पाणी बाहेर काढावे.
- सतत पावसाचे पाणी साचून राहल्यास बागेमध्ये तण नाशकाचा वापर टाळावा.
- झाडांवर गळून पडलेल्या फळांना खोल खड्ड्यात दाबून त्यांची विल्हेवाट लावावी. फळबागेत फळांचे ढीग कुठेही ठेवून नयेत कारण ते कीड व रोगाचे प्रसार करण्याचे काम करतात.

आंबिया बहाराची वनस्पती शास्त्रीय आंतरिक फळगळ व्यवस्थापन करिता एनएए १ ग्रॅम (१०पिपीएम) किंवा २-४- डी १.५ ग्रॅम (१५ पिपीएम) किंवा जिब्रेलिक अॅसिड १.५ ग्रॅम (१५ पिपीएम) सह एन-एटीसीए (एन-असेटील थायझोलिडाईन -४- कार्बोक्सीलीन अॅसीड) (१०पिपीएम) १ग्रॅम + ब्रासिनोलाइड (४ पिपीएम) ०.४ ग्रॅम + फॉलिक अॅसिड (१०० पिपीएम) १० ग्रॅम + १०० लिटर पाण्यामध्ये मिसळून १५ दिवसाच्या अंतराने अशा दोन फवारण्या कराव्यात.

मृग बहाराची फळे वाटाण्या एवढी असल्यास गळण संभवते. याकरिता एनएए (१ ग्रॅम) १० पिपीएम किंवा२-४-डी १.५ग्रॅम (१५ पिपीएम)+ युरिया १किलो(१%) + १००लिटर पाणी असे द्रावण करून फवारणी करावी.

संत्रा मृग बहारातील फळगळ कमी करण्याकरिता (चित्र क्र. ५) जिए-३ (१५ पिपीएम) सह सीपीपीयू (फोरच्लोफेणूरोन) १५ पिपीएम किवा ब्रासिनोलाईड ०२ पिपीएमची दुसरी फवारणी फळे वाटाण्याएवढी असताना करावी.

झाडावर पानांची संख्या कमी व पाने पिवळट हिरव्या रंगाची असल्यास कॅल्शियम अमोनियमनायट्रेट (१ किलो) + जिब्रेलिक अॅसिड १.५ ग्रॅम + १०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

सूक्ष्म अन्न द्रव्ये झिंक सल्फेट ५ ग्रॅम, फेरस सल्फेट १ ग्रॅम व बोरॉन १ ग्रॅम प्रति लिटर पाणी घेऊन अंबिया फळांकरिता ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यात तसेच मृगाच्या फळाकरिता ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये फवारणी करावी.

**बुरशीजन्य रोगापासून होणारी फळगळ व्यवस्थापनाकरिता खालील उपाययोजना कराव्यात-**

सर्वप्रथम खाली पडलेल्या पानांची व फळांची विल्हेवाट लावावी. वाफा स्वच्छ ठेवावा.

बागेच्या उताराच्या बाजूने शेतातील पाणी बाहेर काढावे; कारण जिकडे पाणी साठून राहते, त्या भागात फायटोप्थोरा बुरशीची लागण अधिक होते.

फायटोप्थोरा बुरशीमुळे होणाऱ्या पानगळ व फळावरील तपकिरी कुज 'ब्राऊनरॉट' चा प्रादुर्भाव टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून संपूर्ण झाडावर फासिटील ए.एल. २.५ ग्रॅम किवां कॉपर ऑक्सीक्लोराईड ५० डब्लूपी



फायटोप्थोरा बुरशी ग्रस्त फळे

३ ग्रॅम प्रती लिटर पाणी घेऊन फवारणी करावी तसेच जमिनीमधील सक्रीय बीजाणू यांचा नायनाट होण्यासाठी मदत होईल. चांगले परिणाम मिळण्यासाठी या औषधामध्ये इतर कोणतेही तत्सम बुरशीनाशके, कीटकनाशके, विद्राव्य खते मिसळू नये.

बुरशी नाशकाचे द्रावण टाकल्यानंतर ५ दिवसांनी १०० ग्रॅम ट्रायकोडर्मा व १०० ग्रॅम सुडोमोनास १ किलो शेण खतात मिसळून प्रती झाड देण्यात यावे.

कोलेटोट्रीकम बुरशीजन्य फळगळसाठी बोर्डेक्स ०.६ टक्के मिश्रणाची किंवा कॉपर ऑक्सिक्लोराईड ५० डब्लूपी ३.० ग्रॅम किंवा अझोक्सस्ट्रोबिन + डायफेनकोणाझोल १ मिलि प्रति लिटर पाणी घेऊन फवारणी करावी.


●●●

**- डॉ. योगेश वि. इंगळे**
**- डॉ. हितेंद्रसिंह बी. गोरमनगर**
**- डॉ. राजेंद्र स. वानखेडे**
डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला

# शाश्वत कृषी क्षेत्रातील डिजिटल क्रांतीचा कणा

कृषी डिजिटल क्रांती

हवामान बदलाचे तीव्र संकट, भूजलाची खालावलेली पातळी, रासायनिक खतांच्या असंतुलित वापरामुळे मृदेचा घसरता पोत आणि वारंवार उद्भवणारा दुष्काळ यामुळे भारतीय शेती सध्या एका गंभीर संकटातून जात आहे. भारताची जवळपास ४५ टक्के पेक्षा अधिक शेती अजूनही पावसाच्या पाण्यावर अवलंबून असल्याने, शेतीतील अचूकता आणि संसाधन व्यवस्थापन वाढवणे अन्नसुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत निकडीचे ठरले आहे. या पृष्ठभूमीवर उपग्रह तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांचा संगम घडवून आणणारे गुगल अर्थ इंजिन हे क्लाउड-बेस्ड जिओस्पेशिअल प्लॅटफॉर्म भारतीय शेतीसाठी एक शक्तिशाली आधारस्तंभ ठरत आहे. इस्त्रोच्या 'भुवन' पोर्टलच्या जोडीला जीईईच्या




पेटाबाईट-स्केल महासंगणकीय क्षमतेने भारतातील मृदा संशोधन, पीक विमा प्रणाली आणि शाश्वत शेती व्यवस्थापनात क्रांतिकारी बदल घडवून आणले आहेत.

**१. पेटॅबाईट डेटा आणि क्लाउड कॉम्प्युटिंग:**

गुगल अर्थ इंजिन हे केवळ सॅटेलाईट छायाचित्रे पाहण्याचे साधन नसून महासंगणकीय क्षमता असलेले एक जागतिक विश्लेषण व्यासपीठ आहे.

विशाल डेटा संग्रह : जीईईमध्ये नासाच्या ५० वर्षांहून अधिक कालावधीच्या मलँडसॅट', युरोपियन स्पेस एजन्सीच्या 'सेंटिनेल-१ आणि सेंटिनेल-२, 'मोडिस' सारख्या उपग्रहांचा तसेच इतर जागतिक डेटासेट सुमारे ५००० हून अधिक संख्येने आणि संशोधन हेतू विनामूल्य उपलब्ध आहे.

**२. इंडिया-फर्स्ट एआय मॉडेल्स:**

भारतातील शेतजमिनींचे सरासरी क्षेत्रफळ अत्यंत लहान (बहुतांश १ हेक्टरपेक्षा कमी) असल्याने पारंपरिक उपग्रह डेटाद्वारे बांध आणि शेतांच्या वैयक्तिक सीमा ओळखणे कठीण जायचे. या तांत्रिक अडचणीवर मात करण्यासाठी गुगल डीपमाईंडने विशेष एआय मॉडेल्स विकसित केली आहेत.

उच्च रिझोल्यूशन उपग्रह डेटावरून लहान शेतांच्या सीमा स्वतंत्रपणे रेखाटून, तुकडे झालेल्या लहान शेतजमिनींचे अचूक डिजिटल नकाशे बनवणे. टाईम-सिरीज डेटाच्या आधारे पिकांच्या वाढीचा टप्पा अर्थात लागवडीपासून ते काढणीपर्यंत आणि महत्त्वाच्या घटनांचा माग ठेवून पेरणीच्या तारखा, पिकांची वाढ, अचूक सिंचन, पिकांचे वर्गीकरण तसेच उत्पादकतेचा अंदाज यासारख्या टप्प्यांचे रिअल-टाईम ट्रॅकिंग करणे हे काम केले जाते.

**३. मृदा व्यवस्थापनात जीईईचा वापर:**

मृदा संवर्धनासाठी आवश्यक असलेली पारंपरिक शेतातील माती तपासणी ही अनेकदा खर्चिक आणि वेळखाऊ ठरते. जीईईने मोठ्या भौगोलिक क्षेत्रावरील मृदा विश्लेषणाला डिजिटल रूप दिले आहे.

डिजिटल सॉईल मॅपिंग : भारताच्या 'राष्ट्रीय मृदा सर्वेक्षण आणि भूमी उपयोग नियोजन ब्युरोने' जीईईच्या मल्टि-स्पेक्ट्रल डेटाचा वापर करून देशाचा डिजिटल सॉईल मॅपिंग आराखडा समृद्ध केला आहे. याद्वारे मातीतील सेंद्रिय कार्बन आणि मातीचा पोत, मातीचा सामू यांचे गावपातळीवरील आणि तालुका पातळीवरील अचूक नकाशे तयार केले जात आहेत.

**मृदा धूप नियंत्रण :** 'रिव्हाइज्ड युनिव्हर्सल सॉईल लॉस इक्वेशन' मॉडेल थेट जीईईवर चालवून भारतातील चंबळ खोरे, पश्चिम घाट आणि कृष्णा नदी खोऱ्यांमधील जमिनीची धूप अभ्यासण्यात आली आहे. यामुळे पाणलोट क्षेत्र विकास आणि वृक्षारोपणाचे अचूक नियोजन करणे प्रशासनाला शक्य झाले आहे.

**सिंथेटिक अपर्चर रडारद्वारे ओलावा मापन :** सेंटिनेल-१ च्या सी-बँड मायक्रोवेव्ह रडार डेटाचा वापर करून जीईई ढगाळ हवामानात किंवा रात्रीच्या वेळीही जमिनीतील रूट-झोन ओलाव्याचे अचूक प्रमाण मोजू शकते. आगामी नासा-इस्त्रो 'निसार' उपग्रहाच्या डेटा इंटिग्रेशनमुळे हे ओलावा मापन आणखी सूक्ष्म आणि उच्च रिझोल्यूशन पातळीवर उपलब्ध होणार आहे.

**४. कृषी-अर्थव्यवस्था आणि विमा क्षेत्रातील पारदर्शकता :**

भारतातील 'पंतप्रधान पीक विमा योजना' आणि कृषी कर्ज वितरण प्रणालीमध्ये जीईईने मोठी पारदर्शकता आणि वेग आणला आहे.

जीईईमधील सॅटेलाईट टाईम-सिरीज डेटा आणि ऐतिहासिक उत्पादकता विश्लेषणाद्वारे हे काम आता काही दिवसांत अचूकतेने पूर्ण केले जात आहे.

अॅग्री-फिनटेक आणि डिजिटल कर्ज वितरण : अनेक अग्रगण्य भारतीय स्टार्टअप्सनी जीईई आणि ऐएलयूएपीएलचा वापर करून १४ कोटी हेक्टरहून अधिक शेतजमिनींचे डिजिटल मॅपिंग केले आहे. यामुळे काही तासांत पीक कर्ज मंजूर करणे सुलभ झाले आहे.

**५. हवामान अनुकूल शेती :**

भातशेतीतील मिथेन घट आणि कार्बन क्रेडिट्स : भारतातील भातशेतीतून मोठ्या प्रमाणावर मिथेन वायूचे उत्सर्जन होते. 'कार्बनफार्म' सारख्या संस्था जीईई आणि जेमिनी एआय च्या सहाय्याने शेतात 'अल्टरनेट वेटिंग अँड ड्रायिंग' पद्धतीचे सॅटेलाईटद्वारे अचूक प्रमाणीकरण करतात. यामुळे पाण्याची ३० टक्के ते ४० टक्के बचत होतेच, शिवाय शेतकऱ्यांना अतिरिक्त आर्थिक उत्पन्न मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

६. एआयचे जीईईशी एकात्मीकरण करणे ही काळाची गरज आहे. कारण, कमर्शियल डाटा समाविष्ट केलेला असूनही तो मोफत उपलब्ध होत नाही, थोडक्यात गुगल अर्थ इंजिन केवळ बिगर-व्यावसायिक वैज्ञानिक संशोधन, शैक्षणिक अभ्यास, स्वयंसेवी संस्थांचे सामाजिक कार्य आणि धोरणात्मक, अभ्यासपूर्ण सरकारी संशोधनासाठीच विनामूल्य उपलब्ध आहे.

●●●

**- धीरज कदम**
**- निशिगंधा चव्हाण**
आचार्य पदवी विद्यार्थी मृद विज्ञान विभाग
वनामकृवि, परभणी,
**- सुदर्शन भोयर**
डेक्कन स्पेशियल, संस्थापक, नागपूर.

कृषी जैविक शेती

# शाश्वत शेतीकडे वाटचाल

आज जगाची लोकसंख्या झपाट्याने वाढत असून, २०५० पर्यंत ती सुमारे ९ अब्जांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. त्यामुळे वाढत्या लोकसंख्येसाठी पुरेसे अन्नधान्य उत्पादन करणे हे शेतीसमोरील मोठे आव्हान बनले आहे. गेल्या काही दशकांमध्ये रासायनिक खतांच्या वापरामुळे पीक उत्पादनात वाढ झाली असली, तरी त्यांच्या अतिरेकी वापरामुळे जमिनीची सुपीकता कमी होणे, सेंद्रिय कर्बाचे प्रमाण घटणे, उपयुक्त सूक्ष्मजीवांची संख्या कमी होणे, पर्यावरणाचे प्रदूषण आणि मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम यासारख्या समस्या निर्माण झाल्या आहेत. अशा परिस्थितीत जैविक खते ही शाश्वत शेतीसाठी प्रभावी आणि पर्यावरणपूरक पर्याय ठरत आहेत.

जैविक खतांमध्ये उपयुक्त जीवाणू, बुरशी आणि इतर सूक्ष्मजीवांचा समावेश असतो. हे सूक्ष्मजीव वातावरणातील नत्र स्थिर करतात, जमिनीतील स्फुरद व पालाश यासारखी अन्नद्रव्ये पिकांना उपलब्ध करून देतात, वाढीस उपयुक्त पदार्थ तयार करतात आणि पिकांची रोग व प्रतिकूल हवामान सहन करण्याची क्षमता वाढवतात.

**जैविक खतांचे प्रमुख फायदे :** वातावरणातील नत्र स्थिर करून पिकांना उपलब्ध करून देतात. जमिनीतील स्फुरद, पालाश आणि सूक्ष्म अन्नद्रव्यांची उपलब्धता वाढवतात. मुळांची वाढ व अन्नद्रव्यांचे शोषण सुधारतात. पिकांची दुष्काळ, क्षारता आणि तापमानातील बदल सहन करण्याची क्षमता वाढवतात. काही उपयुक्त सूक्ष्मजीव रोगकारक सूक्ष्मजीवांची वाढ कमी करून पिकांचे संरक्षण करतात. रासायनिक खतांची गरज कमी करून उत्पादन खर्चात बचत करण्यास मदत करतात.

**जैविक खतांचे प्रकार आणि भूमिका**

**१. नत्र स्थिर करणारी जैविक खते :** रायझोबियम हे कडधान्य पिकांसाठी महत्त्वाचे जैविक खत आहे. हे जीवाणू मूग, उडीद, हरभरा, तूर, सोयाबीन, वाटाणा आणि चवळी यासारख्या पिकांच्या मुळांवर गाठी तयार करून वातावरणातील नत्र स्थिर करतात. त्यामुळे पिकांना नत्राचा काही भाग नैसर्गिकरीत्या उपलब्ध होतो. यामुळे मुळांची वाढ आणि अन्नद्रव्यांचे शोषण सुधारण्यास मदत होते.

**अझोस्पिरिलम-** हे भात, मका, ज्वारी, बाजरी आणि गहू यासारख्या तृणधान्य पिकांसाठी उपयुक्त आहे. हे जीवाणू मुळांच्या परिसरात वाढून मुळांच्या वाढीस उपयुक्त पदार्थ तयार करतात. त्यामुळे मुळांची संख्या व लांबी वाढते आणि पाणी व अन्नद्रव्यांचे शोषण सुधारते.

**अझोटोबॅक्टर-** हे मुक्तजीवी नत्र स्थिर करणारे जीवाणू आहेत. भाजीपाला, फळबागा आणि इतर बिगर-कडधान्य पिकांसाठी त्यांचा वापर करता येतो. यामुळे मुळांची आणि पिकांची वाढ जोमदार होण्यास मदत होते.

**अझोला- ही पाण्यावर तरंगणारी वनस्पती असून,** तिच्यात ॲनाबिअेना हा नत्र स्थिर करणारा सूक्ष्मजीव आढळतो.

**२. स्फुरदयुक्त जैविक खते :** स्फुरद विरघळविणारे जीवाणू जमिनीतील पिकांना सहज उपलब्ध नसलेला स्फुरद उपलब्ध करून देतात. हे जीवाणू सेंद्रिय आम्ले तयार करून स्फुरदाचे उपलब्ध स्वरूपात रूपांतर करतात. त्यामुळे मुळांची वाढ, फुलधारणा आणि दाणे भरण्यास मदत होते.

व्हेसिक्युलर आर्बस्क्युलर मायकोरायझा- ही उपयुक्त बुरशी असून, ती मुळांशी सहजीवी संबंध निर्माण करते. तिच्या सूक्ष्म तंतूंमुळे मुळांची पोहोच वाढते आणि पिकांना पाणी, स्फुरद व सूक्ष्म अन्नद्रव्ये अधिक कार्यक्षमतेने मिळतात. गहू, मका, कापूस, सोयाबीन, भाजीपाला आणि फळपिकांमध्ये तिचा उपयोग होतो.

**३. पालाशयुक्त जैविक खते :** पालाश विरघळविणारे जीवाणू (केएसबी) जमिनीतील उपलब्ध नसलेला पालाश पिकांना घेता येईल, अशा स्वरूपात आणण्यास मदत करतात. त्यामुळे धान, गहू, मका, ज्वारी, बाजरी, ऊस, कापूस, सोयाबीन, कडधान्ये, भाजीपाला तसेच विविध फळपिकांमध्ये त्यांचा वापर करता येतो.

**प्रतिकूल हवामान व्यवस्थापन :** जैविक खतांचे काम केवळ अन्नद्रव्ये उपलब्ध करून देण्यापुरते मर्यादित नाही. उपयुक्त सूक्ष्मजीव मुळांच्या परिसरात वाढून रोगकारक सूक्ष्मजीवांची वाढ कमी करण्यास मदत करतात. त्यामुळे पिकांची नैसर्गिक रोगप्रतिकारक क्षमता वाढते.

**जमिनीचे आरोग्य सुधारण्यात भूमिका :** जैविक खतांच्या वापरामुळे जमिनीतील उपयुक्त सूक्ष्मजीवांची संख्या वाढते. हे सूक्ष्मजीव सेंद्रिय पदार्थांचे विघटन करून अन्नद्रव्यांचे पुनर्चक्रण करतात. त्यामुळे जमिनीची भुसभुशीत रचना, पाणी धरून ठेवण्याची क्षमता आणि अन्नद्रव्यांची उपलब्धता सुधारते. सेंद्रिय

| अ.क्र | विवरण | पिके | मात्रा |
|---|---|---|---|
| नत्र स्थिर करणारे | रायझोबियम (Rhizobium) | मूग, उडीद, हरभरा, तूर, सोयाबीन, वाटाणा, चवळी | २५ ग्रॅम/किलो बियाणे |
| | अझोस्पिरीलम (Azospirillum) | भात, मका, ज्वारी, बाजरी, गहू | [illegible] |
| | अझोटोबॅक्टर (Azotobacter) | भाजीपाला, फळबागा आणि इतर बिगर कडधान्य | [illegible] |
| | अझोला (Azolla) | तांदूळ (भात). | [illegible] |
| स्फुरदयुक्त जैविक खते | स्फुरद विद्राव्य जीवाणू (PSB) | [illegible] | [illegible] |
| | व्हेसिक्युलर आर्बस्क्युलर मायकोरायझा (VAM) | [illegible] | [illegible] |
| पालाशयुक्त जैविक खते | पालाश विरघळविणारे जीवाणू (KSB) | [illegible] | १० ग्रॅम/किलो बियाणे |

कर्ब वाढल्यामुळे जमिनीची सुपीकता दीर्घकाळ टिकून राहण्यास मदत होते.

**जैविक खतांचा वापर कसा करावा ?**

बियाणे प्रक्रियेसाठी जैविक खताची योग्य मात्रा घेऊन स्वच्छ पाण्यात मिसळावे आणि बियाणांना समान लेप द्यावा. त्यानंतर बियाणे सावलीत वाळवून पेरणी करावी. रोपांची लागवड करताना मुळांची जैविक खताच्या द्रावणातून प्रक्रिया करता येते. फळझाडांसाठी जैविक खत मुळांच्या परिसरात द्यावे.

जैविक खते वापरताना ती थेट उन्हात ठेवू नयेत. पॅकेटवरील अंतिम वापराची तारीख तपासावी. बुरशीनाशक किंवा इतर रासायनिक औषधांसोबत जैविक खते एकाच वेळी वापरणे टाळावे. जैविक खत वापरल्यानंतर जमिनीत योग्य ओलावा ठेवणे आवश्यक आहे. रासायनिक खतांचा संतुलित वापर आणि जैविक खतांचा योग्य पद्धतीने समावेश ही शाश्वत शेतीची महत्त्वाची दिशा आहे. जमिनीचे आरोग्य, सेंद्रिय कर्ब, उपयुक्त सूक्ष्मजीव आणि पाणी धरून ठेवण्याची क्षमता सुधारल्यामुळे दीर्घकाळ जमिनीची उत्पादन क्षमता टिकवून ठेवता येते. त्यामुळे पिकाची गरज, जमिनीची स्थिती आणि माती परीक्षण यांचा विचार करून योग्य जैविक खतांचा वापर करणे आवश्यक आहे. ●●●

**- अंजली राजेश आरज**
**- डॉ सीमा नेमाडे**
**- डॉ. अनिता चौरे**
कृषी विद्या विभाग, डॉ. पीडीकेव्ही, अकोला

हवामान

# मान्सून माघारी फिरतोय



**भौगोलिक घडामोडी :** येणाऱ्या १९ सप्टेंबरच्या सुमारास पश्चिम राजस्थानच्या काही भागांतून नैऋत्य मोसमी वाऱ्यांच्या माघारीसाठी परिस्थिती अनुकूल होत आहे.

आग्नेय राजस्थान आणि लगतच्या उत्तर गुजरातवरील कमी दाबाचे क्षेत्र आज उंचीनुसार दक्षिणेकडे झुकलेले आहे.

**ट्रफ :** आग्नेय राजस्थान आणि लगतच्या उत्तर गुजरात ते झारखंड, मध्यप्रदेश आणि उत्तर छत्तीसगडवरील कमी दाबाच्या क्षेत्राशी संबंधित चक्रीय वाऱ्यांच्या प्रवाहामुळे तयार झालेला द्रोणी (ट्रफ) समुद्र सपाटीपासून ३.१ किमी उंचीपर्यंत पसरलेला आहे.

वायव्य बंगालच्या उपसागरावर आणि लगतच्या उत्तर ओडिशा व पश्चिम बंगालच्या किनारपट्टीवर, समुद्रसपाटीपासून १.५ ते ५.८ किमी उंचीवर असलेले आणि उंचीनुसार नैऋत्येकडे झुकणारे वरच्या हवेतील चक्रीय अभिसरण कायम आहे.

सध्याची वातावरण प्रणाली बघता राज्यात विशेष पावसाची शक्यता संपली आहे. दुपारनंतर स्थानिक वातावरण मधेच मध्यम पाऊस होतील. तापमान वाढणार आहे आणि धुई धुके सुद्धा पडण्याची शक्यता आहे.

पुढील कमी दाब २० सप्टेंबर रोजी बंगालच्या उपसागरामध्ये बनल्यावर त्याच्या मार्गानुसार परतीचा पाऊस चांगला होण्याची दाट शक्यता आहे.

●●●

**- अभिषेक खेरडे,**
हवामान अभ्यासक, अचलपूर

कृषी तंत्रज्ञान

# मूलभूत विज्ञानापासून कृत्रिम बुद्धिमत्तेपर्यंत

भारतीय शेती ही केवळ अन्ननिर्मितीची व्यवस्था नसून, देशाच्या अर्थव्यवस्थेचा आणि ग्रामीण जीवनाचा महत्त्वाचा आधार आहे. पावसातील अनिश्चितता, पाण्याची मर्यादित उपलब्धता, वाढता उत्पादन खर्च, मजुरांची कमतरता, जमिनीच्या गुणवत्तेतील बदल आणि काढणीनंतर होणारे नुकसान यामुळे पारंपरिक पद्धतीने शेती करणे दिवसेंदिवस अधिक आव्हानात्मक होत आहे. या आव्हानांवर तांत्रिक उपाय शोधण्याचे आणि विज्ञान-तंत्रज्ञानाच्या मदतीने शेतीला अधिक कार्यक्षम, किफायतशीर व शाश्वत बनविण्याचे काम कृषी अभियांत्रिकी करते.

१५ सप्टेंबर हा भारतात अभियंता दिन म्हणून साजरा केला गेला. या निमित्ताने विविध अभियांत्रिकी शाखांच्या योगदानाची चर्चा होते, त्यामध्ये कृषी अभियांत्रिकीचे स्थान विशेष महत्त्वाचे आहे. कारण, ही एकमेव अभियांत्रिकी शाखा आहे जी सिव्हिल, मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, केमिकल आणि एनर्जी इंजिनीअरिंग या सर्व मूलभूत शाखांतील ज्ञान एकत्र आणून प्रत्यक्ष शेतात व शेतकऱ्याच्या दैनंदिन आयुष्यात उतरवते. कृषी अभियंता हा केवळ यंत्रे बनवणारा तंत्रज्ञ नसून पाणी, माती, ऊर्जा, यंत्रसामग्री, अन्नप्रक्रिया आणि डिजिटल तंत्रज्ञान यांचा शेतीशी प्रभावी मेळ घालणारा बहुशाखीय तज्ज्ञ आहे. त्यामुळे कृषी अभियंत्याच्या ज्ञानाचा परिणाम थेट शेतकऱ्याच्या उत्पन्नावर, कष्टावर आणि जीवनमानावर होताना दिसतो.



**सर्व अभियांत्रिकी शाखांचा संगम**

कृषी अभियांत्रिकीचा पाया समजून घ्यायचा झाल्यास, सिव्हिल इंजिनीअरिंगमधील माती, जलविज्ञान आणि संरचना अभियांत्रिकीच्या तत्त्वांचा उपयोग शेततळे, बांधबंदिस्ती, कालवे, हरितगृह आणि पॉलीहाऊस सारख्या संरचनांची मजबूत व किफायतशीर रचना करण्यासाठी होतो.

सर्व मूलभूत अभियांत्रिकी ज्ञानाच्या पायावरच पुढे रिमोट सेन्सिंग, जीआयएस, रोबोटिक्स आणि कृत्रिम बुद्धिमत्तेसारखे प्रगत तंत्रज्ञान उभे राहते, जे आजच्या स्मार्ट शेतीचा गाभा बनले आहे.

**जलसंधारण व यांत्रिकीकरण**

पाण्याचे व्यवस्थापन हा शेतीतील सर्वात कळीचा मुद्दा आहे. सिव्हिल अभियांत्रिकीच्या साहायाने शेततळे, समतल चर आणि कंटूर बांध उभारून पावसाचे पाणी अडवले जाते, तर मेकॅनिकल अभियांत्रिकीतून विकसित झालेल्या ठिबक व तुषार सिंचन प्रणाली, स्वयंचलित झडपा आणि ओलावा सेन्सरमुळे पिकाच्या नेमक्या गरजेनुसार पाणी दिले जाते. त्याचबरोबर सीड-कम-फर्टिलायझर ड्रिल, प्लांटर, यांत्रिक तणनियंत्रक आणि कापणी-मळणी यंत्रांमुळे मजुरांची कमतरता असतानाही वेळेवर शेतीकामे पूर्ण होतात.

**ऊर्जा अभियांत्रिकी**

सिंचन, प्रक्रिया, वाळवण आणि साठवणूक यासारख्या कामांसाठी मोठ्या प्रमाणात ऊर्जा लागते. पारंपरिक, महाग व प्रदूषणकारी ऊर्जास्त्रोतांवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी कृषी अभियंते सौरपंप, सौर वाळवण यंत्रे, बायोगॅस प्रकल्प, बायोडिझेल आणि कृषी अवशेषांपासून तयार होणारे बायोइंधन यासारख्या अक्षय ऊर्जा तंत्रज्ञानाचा वापर वाढवत आहेत. उसाच्या चिपाडापासून, भाताच्या तुसापासून किंवा शेतातील काडीकचऱ्यापासून बायोमास ऊर्जा, बायोगॅस किंवा बायोडिझेल तयार करण्याचे तंत्रज्ञान यामुळे कृषी अवशेष हे केवळ कचरा न राहता उत्पन्नाचे अतिरिक्त साधन बनू शकतात. सौरऊर्जेवर चालणारी शीतगृहे, सौर वाळवण यंत्रे आणि सौर कुंपण यामुळे वीजटंचाई असलेल्या दुर्गम भागातही शेतमालावर प्रक्रिया करणे व शेताचे संरक्षण करणे शक्य होते.

**अन्नप्रक्रिया, साठवणूक व मूल्यवर्धन**

शेतमाल बाजारात पोहोचेपर्यंत त्याची गुणवत्ता टिकवणे तितकेच महत्त्वाचे आहे. स्वच्छता, वर्गीकरण, प्रतवारी, पॅकेजिंग, शीतसाखळी, गोदाम व्यवस्थापन आणि नियंत्रित वातावरणातील वखार यामध्ये कृषी अभियांत्रिकीचा वापर करून काढणी पश्चात होणारे नुकसान लक्षणीयरीत्या कमी करता येते.

**डिजिटल शेती**

आजची कृषी अभियांत्रिकी डिजिटल तंत्रज्ञानाशीही तितकीच जोडली गेली आहे. ड्रोनच्या साहाय्याने पिकांची पाहणी, फवारणी आणि खत व्यवस्थापन अधिक अचूक व वेगाने करता येते. यासाठी केंद्र सरकारच्या नमो ड्रोन दीदी योजनेअंतर्गत महिला बचत गटांना ड्रोन खरेदीसाठी अनुदान दिले जात असून, या ड्रोनद्वारे शेतकऱ्यांना भाडेतत्त्वावर सेवा पुरवली जाते. त्याचबरोबर मातीतील ओलावा, तापमान व पोषणद्रव्ये मोजणारे खेढ सेन्सर, उपग्रह प्रतिमा आणि जीआयएस यांच्या माध्यमातून सतत गोळा होणार्या मोठ्या माहितीसंचाचे विश्लेषण करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंग तंत्रज्ञानाचा वापर वेगाने वाढत आहे. ●●●

**- डॉ. सुयोग खोसे,**
**इंजि. मंगेश मांडगे, काजल ढोकळे**
विषयतज्ज्ञ - कृषी अभियांत्रिकी विभाग
कृषी विज्ञान केंद्र, नारायणगाव, पुणे-२

❍ संयोजक : **निखिल रमेश यादव,** कृषी पदव्युत्तर - ८४०८९१२७०६ ❍

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

# शक्तीपीठ महामार्गाविरोधात हिंगोलीत शेतकऱ्यांची जोरदार निदर्शने

## शेतकरी-पोलिसांमध्ये झटापट, पालकमंत्र्यांना मार्ग बदलावा लागला



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ सप्टेंबर**

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त पालकमंत्री नरहरी झिरवाळ हे शासकीय ध्वजारोहनासाठी हिंगोलीत आले दि १७ सप्टेंबर रोजी आले होते. यावेळी शक्तीपीठ महामार्ग बाधित शेतकऱ्यांनी पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांना भेटण्यासाठी नांदेड नाका येथे निदर्शने केली. पोलिसांनी कायदा व सुरक्षेच्या दृष्टीकोनातून शेतकऱ्यांना बॅरिकेडस लावून अडविल्यामुळे संतप्त शेतकऱ्यांनी जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी काही शेतकऱ्यांन बॅरिकेटस बाजूला करण्याचा प्रयत्न करीत असतांना शेतकरी आणि पोलिसांमध्ये झटापट झाली. पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांनी शेतकऱ्यांना न भेटताच दुसऱ्या मार्गाने शासकीय विश्रामगृह गाठले.

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त शहरातील देवडा नगर भागातील नगर पालिका उद्यानात स्वातंत्र्य संग्रामातील हुतात्म्यांना अभिवादन करण्यासाठी पालकमंत्री नरहरी झिरवाळ गुरूवारी हिंगोली येथे आले होते. शासकीय ध्वजारोहनानंतर हुतात्म्यांना पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

हिंगोली जिल्ह्यातील वसमत आणि कळमनुरी तालुक्यातील अत्यंत सुपीक बागायती जमिनी शक्तीपीठ महामार्गासाठी संपादीत केल्या जात आहेत. आंदोलनात सहभाग शेतकऱ्यांनी आपली व्यथा मांडतांना आम्ही रात्रंदिवस घाम गाळून या जमिनी कमावल्या आहेत. आमच्याकडे आधीच कमी शेती आहे. त्यातही शक्तीपीठ महामार्ग घुसवून सरकार आमचा घास का हिरावत आहे असा सवाल संतप्त शेतकरी महिला व पुरूषांनी केला. आमचा जीव गेला तरी चालेल पण आम्ही जमिनीचा एक तुकडाही देणार नाही. जमीन गेली तर आमच्या मुलाबाळांनी काय खायचे देशाचे नागरिक असूनही आम्हाला स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी पालकमंत्र्यांना का भेटू दिले जात नाही हा कुठला न्याय असा सवाल यावेळी एका शेतकरी महिलेने व्यक्त केला. पालकमंत्र्यांनी दि १५ ऑगस्ट रोजी बैठक घेण्याचे आणि मोजणी थांबवण्याचे आश्वासन दिले होते. मात्र आश्वासन देऊनही प्रशासनाकडून गुप्तपणे जमिनीची मोजी सुरू असल्याचा गंभीर आरोप यावेळी शेतकऱ्यांनी केला.

दरम्यान, नगर पालिका उद्यानाजवळ असलेल्या नांदेड नाक्यावर शक्तीपीठ महामार्ग बाधित शेतकरी महिला-पुरूष मोठ्या संख्येने जमा झाले. शेतकऱ्यांना अडविण्यासाठी पोलिसांनी नांदेड नाक्यावर मोठ्या प्रमाणावर बॅरिकेडस लावले होते. तसेच पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला होता. संतप्त शेतकऱ्यांनी बॅरिकेडस तोडून पुढे जाण्याचा प्रयत्न केला. यावेळी शेतकऱ्यांना आम्हाला पालकमंत्र्यांना भेटू द्या, अशी आर्त विनवणी केली मात्र पोलिसांनी त्यांना अडविल्यामुळे आंदोलक व पोलिसांमध्ये जोरदार झटापट झाली. ज्यामुळे पोलिसांचीही मोठी दमछाक झाली. शेतकऱ्यांचा उद्रेक पाहून पालकमंत्री झिरवाळ यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधण्याचे टाळले आणि दुसऱ्या पर्यायी मार्गाने शासकीय विश्रामगृह गाठले. पालकमंत्र्याच्या या भूमिकेमुळे शेतकऱ्यांनी लबाड पालकमंत्र्याचा राजीनामा घ्या अशी जोरदार घोषणाबाजी केली.

# भरती परीक्षा सुधारणांसाठी हिंगोलीत विशेष कक्ष

## १८ सप्टेंबरपर्यंत सूचना, अभिप्राय सादर करा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ सप्टेंबर**

राज्यातील शासकीय भरती परीक्षा अधिक सुरक्षित, पारदर्शक, विश्वासार्ह आणि उमेदवाराभिमुख करण्यासाठी मराठवाड्यातील नागरिक, उमेदवार, विद्यार्थी, शिक्षक, शैक्षणिक संस्था, कोचिंग क्लासेस, अभ्यासिका चालक आणि लोकप्रतिनिधींकडून सूचना व अभिप्राय मागविण्यात आले आहेत. या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी केले आहे.

यासाठी मराठवाड्यातील इतर जिल्ह्यांप्रमाणेच हिंगोली जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष कक्ष स्थापन करण्यात आला आहे. यासंबंधाने सूचना व अभिप्राय १८ सप्टेंबर २०२६ पर्यंत सकाळी १० ते सायं सहा वाजेपर्यंत प्रत्यक्ष किंवा ई-मेलद्वारे सादर करता येतील, असेही विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी कळवले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने राज्यातील शासकीय भरती परीक्षा अधिक सुरक्षित व पारदर्शक करण्यासाठी तसेच गैरप्रकारांना प्रतिबंध करण्यासाठी अपर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती गठित केली आहे. या समितीच्या कार्यक्षेत्रानुसार परीक्षा पद्धतीतील सुधारणा करण्यासाठी सूचना व अभिप्राय मागविण्यात येत आहेत. हिंगोली जिल्ह्यातील नागरिकांना जिल्हाधिकारी कार्यालयातील विशेष कक्षात प्रत्यक्ष सूचना, हरकती व निवेदने सादर करता येतील. सूचना व अभिप्राय सादर करण्याचे ठिकाण निवासी उपजिल्हाधिकारी (नोडल अधिकारी), जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली येथील विशेष कक्ष असेल. ज्यांना प्रत्यक्ष उपस्थित राहणे शक्य नाही, त्यांनी आपले लेखी अभिप्राय विहित मुदतीत ई-मेलवर पाठवावेत. जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत प्राप्त होणाऱ्या सर्व सूचना व अभिप्रायांचे संकलन करून ते शासनाच्या उच्चस्तरीय समितीकडे सादर करण्यात येणार आहेत. समिती या शिफारशींचा सखोल अभ्यास करून राज्य शासनास सर्वसमावेशक अंतिम अहवाल सादर करणार आहे, असेही विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी कळवले आहे.

राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने राज्यातील शासकीय भरती परीक्षा अधिक सुरक्षित, पारदर्शक, विश्वासार्ह आणि उमेदवाराभिमुख करण्यासाठी तसेच गैरप्रकारांना प्रतिबंध घालण्यासाठी अपर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती गठीत केली आहे. उच्च स्तरीय समितीच्या कार्यक्रमानसार राज्यातील प्रत्येक महसुली विभागातील विद्यार्थी, उमेदवार, शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधी आणि संबंधित हितधारकांशी चर्चा करून सुधारणांसाठी सूचना व अभिप्राय प्राप्त करून घेतले जात आहेत. या उच्चस्तरीय समितीमधील समिती अध्यक्ष व सदस्य छत्रपती संभाजीनगर येथील स्मार्टसिटी कार्यालयात २१ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता कामाच्या अनुषंगाने भेट देणार आहेत.

# हिंगोली जिल्ह्यात स्वच्छता ही सेवा अभियानाचा शुभारंभ



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ सप्टेंबर**

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत 'स्वच्छता ही सेवा-२०२६' अभियानाचा जिल्हास्तरीय शुभारंभ आज पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांच्या हस्ते करण्यात आला.

जिल्ह्यात दि. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत विविध स्वच्छता, जनजागृती व पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

यावेळी आमदार संतोष बांगर, जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुधीर ठोंबरे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक केंद्रेकर, सामान्य प्रशासन विभागाचे सम्राट दिवानी, पाणी व स्वच्छता विभागाचे अभियंता नरवाडे, महिला व बालकल्याण विभागाचे बोराटे तसेच विविध विभागांचे विभागप्रमुख आणि जिल्हा पाणी व स्वच्छता विभागातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

अभियानांतर्गत गावस्तरावर परिसर स्वच्छता, अस्वच्छ ठिकाणांची निवड करून स्वच्छता लक्ष युनिट्स (उढणी) अंतर्गत मॅपिंग व साफसफाई, तसेच सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता करण्यात येणार आहे. अधिक लोकसंख्या असलेल्या ठिकाणी विशेष स्वच्छता उपक्रम राबविण्यात येणार असून, ग्राम पंचायत, शाळा, महाविद्यालये, विविध संस्था व सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता उपक्रम घेण्यात येणार आहेत.



**हिंगोली- मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त शहरातील देवडा नगर भागातील उद्यानातील हुतात्मा स्मारक परिसरात स्वातंत्र्य लढ्यातील हुतात्म्यांना पोलिस दलाच्यावतीने सलामी देण्यात आली. यावेळी पोलिस अधिकारी, कर्मचारी यांची उपस्थिती होती. छाया- सुनील पाठक**

# शेतकरी, महिला-बालकांसह अन्नसुरक्षेला प्राधान्य- पालकमंत्री नरहरी झिरवाळ





**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ सप्टेंबर**

देशातील १२ ज्योतिर्लिंगांपैकी आठवे ज्योतिर्लिंग असलेले औंढा नागनाथ मंदिर हिंगोली जिल्ह्याचे धार्मिक व ऐतिहासिक वैभव आहे. या मंदिराच्या विकास आराखड्यास दोन टप्प्यात एकूण १९३ कोटी ५५ लाख रुपयांच्या सुधारित विकास आराखड्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील शिखर समितीने मान्यता दिली आहे. या माध्यमातून मंदिर व परिसरातील मंदिरांचे संवर्धन व जीर्णोद्धार करण्यात येणार आहे. भाविकांना आधुनिक सुविधा उपलब्ध करून देतानाच जिल्ह्याच्या पर्यटन विकासाला चालना देण्यासह जिल्ह्यातील विविध विकासकामांवर भर देणार असल्याचे प्रतिपादन राज्याचे अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांनी केले.

मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त येथील अण्णासाहेब टाकळगव्हाणकर बाल उद्यानातील हुतात्मा स्मारक स्मृतिस्तंभ येथे आयोजित मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभ प्रसंगी पालकमंत्री नरहरी झिरवाळ बोलत होते. यावेळी ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिकांचे कुटुंबीय श्रीमती मालतीबाई पैठणकर, आमदार संतोष बांगर, जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, पोलीस अधीक्षक डॉ. श्रेणिक लोढा, अपर जिल्हाधिकारी महेंद्र कांबळे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर ठोंबरे, निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड यांच्यासह सर्व जिल्हा प्रशासनातील विभागप्रमुख उपस्थित होते.

स्वातंत्र्यानंतरही देशातील काश्मीर, जुनागढ आणि हैद्राबाद ही संस्थाने विलीन झाली नव्हती. हैद्राबाद संस्थानातून मराठवाडा मुक्त करण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली मुक्ती संग्रामाचा लढा सुरु झाला होता. मराठवाड्याच्या गावा-गावातून हा लढा अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी शौर्याने लढला. भारताच्या प्रादेशिक अखंडतेचा हा लढा होता. सतत १३ महिन्यांच्या आंदोलनात अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी प्राणांची आहुती दिली. त्यातून आजचा हा दिवस १७ सप्टेंबर, १९४८ रोजी निजामाच्या जोखडातून मराठवाडा मुक्त झाल्याने पाहता आला. या मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाचा ७८ वा वर्धापन दिन आज मराठवाड्यात सर्वत्र उत्साहाने साजरा होत आहे. याबाबत पालकमंत्री यांनी जनेतला शुभेच्छा दिल्या.

कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा जातीचे प्रमाणपत्र वितरणाची कार्यवाही जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. आतापर्यंत १३ हजारांहून अधिक प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले असून, आजअखेर जिल्ह्यात झिरो पेंडन्सी आहे. जिल्हा प्रशासनामार्फत ही कार्यवाही दक्षतेने सुरू असल्याची माहिती पालकमंत्री झिरवाळ यांनी दिली. तसेच अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या विविध कर्ज व्याज परतावा योजनेंतर्गत १ हजार ३४३ लाभार्थ्यांना विविध बँकांमार्फत ९६ कोटी २३ लाख रुपयांचे कर्ज मंजूर करण्यात आले आहे. यापैकी १२ कोटी ४३ लाख रुपये व्याज परतावा डीबीटी प्रणालीद्वारे लाभार्थ्यांच्या नोंदणीकृत बँक खात्यात जमा करण्यात आले असल्याची माहिती त्यांनी दिली.

अल निनोच्या पार्श्वभूमीवर खरीप हंगाम २०२६ साठी पीक कापणी प्रयोगांना गती देण्यात आली आहे. जिल्ह्यात मूग व उडिद पिकांचे पीक कापणी प्रयोग प्रशासकीय पातळीवर सुरू असून, सोयाबीन पिकाचे पीक कापणी प्रयोग सप्टेंबरअखेर सुरू करण्यात येणार आहेत. ₹उड चक ॲपद्वारे शेतकऱ्यांना स्वतः पीक नोंदणीची सुविधा उपलब्ध झाली असून पीक नोंदणी प्रक्रिया सुलभ, पारदर्शक व जलद होणार असून, शासकीय योजना, अनुदान व विविध सेवांचा लाभ देण्यासाठी ही माहिती उपयुक्त ठरणार आहे. तरी जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांनी आपल्या पिकांची अचूक व वेळेत नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन पालकमंत्री झिरवाळ यांनी केले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत हिंगोली जिल्ह्यातील ४२ हजार ६१२ शेतकऱ्यांनी ई-केवायसी पूर्ण झाली असून, उर्वरित पात्र लाभार्थी शेतकऱ्यांनी फार्मर आयडीसह ई-केवायसीची प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले आहे.

हिंगोली जिल्ह्यात एपीएल केशरी शिधापत्रिकाधारकांसाठी अन्नधान्याऐवजी रोख रक्कम हस्तांतरणाची योजना राबविण्यात येत आहे. सन २०२६-२७ मध्ये जिल्ह्यातील ३४ हजार ९३४ एपीएल शिधापत्रिकाधारकांपैकी १७ हजार लाभार्थ्यांच्या खात्यावर आतापर्यंत ३ कोटी २० लाख ३७ हजार रुपये वितरित करण्यात आले आहेत. उर्वरित पात्र लाभार्थ्यांना रक्कम मिळावी, यासाठी कार्यवाही सुरु असल्याची माहिती पालकमंत्री श्री. झिरवाळ यांनी दिली.

कार्यक्रमाच्या सुरवातीला पालकमंत्री महोदयांच्या हस्ते हुतात्मा स्तंभास सलामी देवून पुष्पचक्र अर्पण करण्यात आले. ध्वजारोहनानंतर पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांनी स्वातंत्र्यसैनिक व त्यांच्या नातेवाईकांची भेट घेत शुभेच्छा दिल्या. तसेच त्यांच्या हस्ते विविध पुरस्काराचे वितरण करण्यात आले. प्रधानमंत्री विश्वकर्मा सन्मान योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना प्रमाणपत्र, टुलकिट वाटप व कर्ज मंजूरी पत्राचे वाटप पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांच्या हस्ते करण्यात आले. यामध्ये सेनगाव तालुक्यातील बाबुळगाव येथील आकाश हनवते, स्वाती विजय लाटे, प्रियंका बबन डाकोरे, दत्तराव माधव हनवते, रामा दगडु बलखंडे यांचा प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले.

# पालकमंत्र्यांच्याहस्ते डायलिसीस युनिटचे लोकार्पण




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ सप्टेंबर**

हिंगोलीच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात नव्याने उभारण्यात आलेल्या डायलिसिस युनिटचे अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांच्या हस्ते आज लोकार्पण झाले.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, हिंगोली येथील या कार्यक्रमास आमदार संतोष बांगर, जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, अधिष्ठाता डॉ. श्रीचक्रधर मुंगल, वैद्यकीय अधीक्षक डॉ. दीपक मोरे आदींसह महाविद्यालय व रुग्णालयातील विविध विभागांचे विभागप्रमुख, प्राध्यापक, वैद्यकीय अधिकारी, परिचारिका तसेच अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नव्याने कार्यान्वित करण्यात आलेल्या या डायलिसिस युनिटमुळे हिंगोली जिल्ह्यासह परिसरातील किडनीविकारग्रस्त व नियमित डायलिसिसची आवश्यकता असलेल्या रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे. विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू रुग्णांना स्थानिक पातळीवर डायलिसिसची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे उपचारासाठी इतर शहरांमध्ये जाण्याची गरज कमी होण्यास मदत होणार आहे. या सुविधेमुळे रुग्णांचा उपचारासाठी होणारा प्रवास, वेळ आणि आर्थिक भार कमी होण्यास मदत होणार असून, जिल्ह्यातील आरोग्यसेवा अधिक सक्षम होण्याच्या दृष्टीने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे.

यावेळी पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांच्यासमवेत उपस्थित मान्यवरांनी डायलिसिस युनिटची पाहणी करून उपलब्ध वैद्यकीय सुविधा व उपचार व्यवस्थेची माहिती घेतली. रुग्णांना दर्जेदार, सुरक्षित आणि वेळेवर आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय कटिबद्ध असल्याचे अधिष्ठाता यांनी पालकमंत्री झिरवाळ यांना सांगितले.

# वसमत येथे शिबीरात १०७ रूग्णांची मोफत नेत्र तपासणी



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, १७ सप्टेंबर**

मराठवाडा मुक्ती दिनाचे औचित्य साधून एसएमबी ग्रुप, लायन्स क्लब ऑफ वसमत प्राईड आणि कामगार कल्याण केंद्र, वसमत यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार, दि. १७ सप्टेंबर रोजी वसमत येथे मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात तब्बल १०७ नागरिकांची नेत्र तपासणी करण्यात आली असून २२ रुग्णांमध्ये मोतीबिंदू आढळून आला. या सर्व २२ रुग्णांवर नांदेड येथील लायन्स नेत्र रुग्णालयात मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

शिबिराचे उद्घाटन वसमत विधानसभा मतदारसंघाचे आमदार राजू नवघरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी वसमत कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती तानाजीराव बेंडे, राजू नवघरे प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळूमामा ढोरे, मोबीन भाई, सय्यद गौस, कामगार कल्याण मंडळाचे साखरे, लायन्स क्लब ऑफ वसमत प्राईडचे अध्यक्ष संजीवकुमार बेंडके, राजू सिद्दिकी, उपाध्यक्ष मोहम्मद गौस बागवान, समीर कुरेशी, अंबादास मनी, प्रसाद लालपोतू, विजय लांडगु यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

मान्यवरांच्या सत्कारानंतर शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित नागरिकांची तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाकडून नेत्र तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान २२ रुग्णांना मोतीबिंदू असल्याचे निदर्शनास आले. या रुग्णांना पुढील उपचारासाठी आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले असून लायन्स नेत्र रुग्णालय, नांदेड येथे त्यांच्यावर मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.

यावेळी बोलताना आमदार राजू नवघरे यांनी अशा आरोग्यविषयक उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. समाजातील सर्वसामान्य आणि गरजू नागरिकांना त्यांच्या परिसरातच मोफत आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी सामाजिक संस्था, उद्योग समूह आणि विविध संघटनांनी पुढाकार घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी लायन्स क्लब चे सर्व पदाधिकारी व रिजवान भाई, सय्यद काशीद, सय्यद फैजान, सय्यद रेहान, शेख कामरान यांच्यासह एसएमबी ग्रुप, कामगार कल्याण केंद्र आणि लायन्स क्लबच्या सदस्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मस्के यांनी केले. लायन्स क्लब ऑफ वसमत प्राईडच्या वतीने अध्यक्ष संजीवकुमार बेंडके यांनी सामाजिक संस्थांच्या सहकार्याने भविष्यातही गरजू नागरिकांसाठी आरोग्यविषयक विविध उपक्रम राबविण्याचा मानस व्यक्त केला.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

# पीक नुकसानीची शासन दखल घेणार, शेतकऱ्यांना मदतीची ग्वाही : पालकमंत्री अतुल सावे

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १७ सप्टेंबर -**

जिल्ह्यात यंदा अल निनोच्या प्रभावामुळे पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने पिकांचे नुकसान झाले आहे. या परिस्थितीची शासन दखल घेऊन शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. कमी पावसामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत शेतकरी बांधवांसाठी आवश्यक उपाययोजना करण्याची शासनाच्यावतीने ग्वाही देतो, असे प्रतिपादन राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपरिक ऊर्जा व दिव्यांग कल्याण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी केले.

मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त माता गुजरीजी विसावा उद्यान येथे पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. प्रारंभी पालकमंत्री अतुल सावे व मान्यवरांच्या हस्ते हुतात्मा स्मारकाच्या स्मृतिस्तंभास पुष्पचक्र अर्पण करून हुतात्म्यांना आदरांजली वाहण्यात आली. यावेळी पोलीस पथकाने धून वाजवून हवेत बंदुकीच्या तीन फैरी झाडत मानवंदना दिली. पालकमंत्र्यांनी मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.



यावेळी राज्यसभेचे सदस्य तथा राज्याचे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, खासदार प्रा. रविंद्र चव्हाण, आमदार अमरनाथ राजूरकर, आमदार बालाजी कल्याणकर, आमदार भीमराव केराम, विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील, पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन, महानगरपालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, अपर पोलीस अधीक्षक सूरज गुरव, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांच्यासह ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक, नागरिक व पत्रकार आदी उपस्थित होते.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील शासनाने जाहीर केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ ची नांदेड जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. जिल्ह्यातील २ लाख २४ हजार ४८७ शेतकऱ्यांची माहिती संकेतस्थळावर नोंदविण्यात आली असून, त्यापैकी ६४ हजार २७९ शेतकऱ्यांच्या खात्यांवर आतापर्यंत ४८८ कोटी १९ लाख रुपयांची कर्जमाफीची रक्कम जमा करण्यात आली आहे. पात्र शेतकरी लाभापासून वंचित राहू नयेत, यासाठी कृषी क्षेत्रातील ग्रीस्टॅक नोंदणी आणि आधार प्रमाणीकरण पूर्ण करण्याचे आवाहन पालकमंत्री अतुल सावे यांनी केले. कर्जमाफीचा लाभ मिळालेल्या शेतकऱ्यांना कर्जफेडीचे ना-देय प्रमाणपत्र देण्यात येत असून, बँकांनी त्यांना तातडीने नवीन पीककर्ज उपलब्ध करून द्यावे, असेही त्यांनी सांगितले.

शेतकऱ्यांना कर्जमुक्तीबरोबरच वीजबिलात सवलत देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय शासनाने घेतला आहे. कर्जाचा भार कमी करणे आणि शेतीसाठी लागणाऱ्या वीज खर्चात दिलासा देणे, हे शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थैर्यासाठी महत्त्वाचे आहे. या निर्णयांबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांचे अभिनंदन करून नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्यावतीने पालकमंत्र्यांनी आभार मानले.

जिल्ह्यात यंदाच्या खरीप हंगामात ९७ टक्के पेरणी पूर्ण झाली आहे. मात्र, अल निनोच्या प्रभावामुळे पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने पिकांचे नुकसान झाले आहे. या परिस्थितीत शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी शासन योग्य ती कार्यवाही करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत ९६६ कोटी रुपयांचे, तर प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या २३ व्या हप्त्यापोटी ७६ कोटी ५३ लाख रुपयांचे वितरण करण्यात आले आहे. यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा मिळाला असल्याचे पालकमंत्री श्री. सावे यांनी सांगितले.

शेतकरी, सर्वसामान्य नागरिक आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला शासनाने विशेष प्राधान्य दिले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राज्य शासनामार्फत 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत सेवा सेतू शिबिरे, छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिरे, इनोव्हेशन चॅलेंज, विकसित भारत संकल्प यात्रा, नमो सेवागाथा, जल-जन आणि सेवा संकल्प यात्रा, जनसेवक महाकुंभ आदी उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

युवाशक्ती हीच राष्ट्रशक्ती या संकल्पनेतून युवकांना रोजगार आणि उद्योजकतेच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत २९ सप्टेंबर २०२६ रोजी 'रोजगार महाकुंभ महाराष्ट्र' हा राज्यव्यापी उपक्रम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमांतर्गत एकाच दिवशी राज्यभरात ५०० रोजगार मेळावे आयोजित करण्यात येणार असून, नांदेड जिल्ह्यात २२ ठिकाणी रोजगार मेळावे घेण्यात येणार आहेत. जिल्ह्यातील युवकांनी या रोजगार मेळाव्यांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन पालकमंत्री अतुल सावे यांनी केले.

नांदेड जिल्ह्यातील आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासाठी जिल्हा रुग्णालयाची क्षमता १०० खाटांवरून ५०० खाटांपर्यंत वाढविण्यात येत आहे. तसेच कंधार, बिलोली आणि हिमायतनगर येथील ग्रामीण रुग्णालयांचे उपजिल्हा रुग्णालयांमध्ये श्रेणीवर्धन करण्यात येत असून, जिल्ह्यातील अन्य ठिकाणीही नवीन आरोग्य सुविधांची उभारणी सुरू आहे. आरोग्य सेवा बळकट करण्यासाठी जिल्ह्यात ३७ अत्याधुनिक डायलिसिस यंत्रे, तीन सीटी स्कॅन यंत्रे, एमआरआय सेवा आणि सोनोग्राफी यंत्रे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी गरजू व पात्र रुग्णांसाठी आधार ठरत असून, जिल्ह्यातील १ हजार ९७४ रुग्णांना १४ कोटी रुपयांची आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे.

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या माध्यमातून नांदेड जिल्ह्यातील २ हजार ६३१ लाभार्थ्यांना व्यवसायासाठी बँकांमार्फत २०६ कोटी ३० लाख रुपयांचे कर्ज वितरित करण्यात आले आहे. तसेच लाभार्थ्यांना सुमारे २२ कोटी ८४ लाख रुपयांचा व्याज परतावा देण्यात आला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेंतर्गत जिल्ह्यातील ८ हजार ५१६ विद्यार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे. ऊसतोड कामगारांच्या पाल्यांसाठी मुखेड व कंधार तालुक्यात संत भगवान बाबा ऊसतोड कामगार वसतिगृहे सुरू करण्यात आली आहेत. तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत खून झालेल्या प्रकरणांतील २० मृत व्यक्तींच्या वारसांना शासकीय नोकरी देण्यात आली असल्याचेही त्यांनी सांगितले.

याप्रसंगी दिवंगत खासदार वसंतराव चव्हाण, दिवंगत माजी आमदार गंगाराम ठक्करवाड, दिवंगत माजी आमदार प्रदीप (नाईक) जाधव यांच्या शोक प्रस्तावाचा कार्यवृत्तांत व स्मृतीपत्र पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते त्यांच्या नातेवाईकांना प्रदान करण्यात आले. तसेच पीएम विश्वकर्मा योजनेच्या लाभार्थ्यांना बँक कर्ज मंजुरीचे पत्र पालकमंत्री श्री. सावे यांच्या हस्ते वितरित करण्यात आले. या कार्यक्रमाचे शानदार सूत्रसंचालन रवींद्र पंडागळे व अंजली नातू यांनी केले.

## गोदावरी विद्यालयात नवा आदर्श ; सेविका निर्मला पोहरे यांच्या हस्ते ध्वजारोहण..!

**नांदेड** -गोदावरी विद्यालयात मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन उत्साहात साजरा; शाळेतील ज्येष्ठ सेविका पोहरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करून एक नवा आदर्श घालून देण्यात आला. दरवर्षीप्रमाणे यंदाही १७ सप्टेंबर रोजी विद्यालयाच्या प्रांगणात हा सोहळा अत्यंत दिमाखात पार पडला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मराठवाडा मुक्तिसंग्रामातील हुतात्म्यांना आणि थोर नेत्यांना अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे संचालक प्रा. कैलास पौळ, व्यवस्थापकीय संचालक आर.एस पाटील उपस्थित होते. शाळेतील मोठ्या पदाधिकाऱ्यांऐवजी, विद्यालयाची अहोरात्र सेवा करणाऱ्या चतुर्थ श्रेणी कर्मचारी 'सेविका निर्मला पोहरे' यांना ध्वजारोहणाचा मुख्य मान देण्यात आला. त्यांच्या हस्ते मुख्य ध्वजारोहण पार पडले. सेविका निर्मला पोहरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करून शाळेने 'श्रमप्रतिष्ठा' आणि 'समानता' हाच खरा संदेश दिल्याचे संचालक कैलास पौळ यांनी नमूद केले. यावेळी निर्मला पोहरे यांचा विद्यालयाच्या वतीने विशेष सत्कारही करण्यात आला. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा.होपळे, प्राचार्या डॉ. वैजयंती कस्तुरे, प्राचार्य नितीन हाटकर, समन्वयक डी.जी. पाटील, पर्यवेक्षक नितीन बिरादार, प्रा. संदीप पावडे,कार्यालयीन अधिक्षिका संध्या वडजे,आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी मेहनत घेतली तर आभार सहशिक्षिका नूतन आंबेकर यांनी मानले.




## आत्महत्याग्रस्त कुटुंबीयांचे संजय भोसीकरांकडून सांत्वन व आर्थिक मदत

**कंधार**-तालुक्यातील मौजे कंधारेवाडी येथील शेतकरी कै. दयानंद जनार्दन नागरगोजे यांनी सततची नापिकी व कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या केल्याची घटना घडली. या दुर्दैवी घटनेमुळे नागरगोजे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या पार्श्वभूमीवर कंधार तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष संजय भोसीकर यांनी नागरगोजे यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. यावेळी कुटुंबीयांशी संवाद साधून त्यांच्या दुःखात सहभागी होत, संकटाच्या काळात कुटुंबाच्या पाठीशी राहण्याची भावना व्यक्त केली. तसेच नागरगोजे कुटुंबीयांना आर्थिक मदत करून त्यांना आधार देण्याचा प्रयत्न करण्यात आला. शेतकऱ्यांसमोर सातत्याने निर्माण होणारी नापिकी, वाढता शेतीचा खर्च आणि कर्जाचा बोजा यामुळे अनेक कुटुंबांवर आर्थिक संकट ओढवत आहे. अशा परिस्थितीत शेतकरी कुटुंबांना शासनासह सामाजिक संस्था व लोकप्रतिनिधींनी मदतीचा हात देण्याची गरज असल्याचे यावेळी उपस्थितांनी नमूद केले. यावेळी नगरसेवक प्रतिनिधी सचिन बसवंते, माजी सरपंच आईनाथराव कंधारे, मारोतराव मंगनाळे आदी उपस्थित होते. त्यांनीही नागरगोजे कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त करून कुटुंबाला धीर दिला.



## डॉ. राजेश दरडे यांची महाराष्ट्र वैद्यकीय परिषद सदस्यपदी निवड

**बाऱ्हाळी** -येथून जवळच असलेल्या मौजे दापका गुंडोपंत येथील रहिवासी तथा लातूर येथील वैष्णवी हॉस्पिटल अँड एन्डोस्कोपी सेंटरचे प्रसिद्ध एन्डोस्कोपी, वंध्यत्व निवारण व स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. राजेश दरडे यांची महाराष्ट्र वैद्यकीय परिषद सदस्यपदी निवड झाली आहे. महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण विभागाच्या राजपत्रातील अधिसूचनेनुसार महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम, १९६५ अंतर्गत डॉ. राजेश दरडे यांची परिषद सदस्य म्हणून निवड झाल्याचे जाहीर करण्यात आले आहे. त्यांच्या या राज्यस्तरीय निवडीमुळे दापका गुंडोपंत गावासह बाऱ्हाळी परिसराच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. डॉ. राजेश दरडे यांच्या निवडीची माहिती मिळताच दापका गुंडोपंत येथे ग्रामस्थ व त्यांच्या हितचिंतकांनी जल्लोष करून आनंद व्यक्त केला. त्यांच्या निवडीबद्दल डॉ. बालाजी झेटकोडे, डॉ. ओम चिट्टे, पत्रकार दत्तात्रय तिपणे, साईनाथ कोटगीरे, उत्तम वाडीकर, बस्वराज दरडे तसेच गजानन देबडवार, संदीप स्वामी, मौला शेख नवाज, मामू तुळशीराम कांबळे, ज्ञानेश्वर पाटील यांच्यासह अनेकांनी अभिनंदन केले.



**दापका गावाचा राज्यस्तरीय सन्मान....**

दापका गुंडोपंत सारख्या ग्रामीण भागातून वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत परिषदेत स्थान मिळविल्याने ग्रामस्थांमध्ये अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## दुर्गंधीयुक्त कचऱ्याची अवैध वाहतूक ; तीन हायवा जप्त

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १७ सप्टेंबर -**

शहराच्या परिसरात दुर्गंधीयुक्त कचर्याची उघड्यावरून बिनधास्त वाहतूक करून नागरिकांच्या आरोग्याशी खेळणार्या हायवा चालक-मालकांवर नांदेड ग्रामीण पोलिसांनी कायद्याचा बडगा उगारला आहे. ताडपत्री न झाकता कचरा वाहून नेणे, रस्त्यावर चिखल व कचरा सांडणे आणि वाहतुकीला अडथळा निर्माण करणार्या तीन हायवा वाहनांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि. १६ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री नांदेड-सिडको परिसरातून काही हायवा वाहने अत्यंत दुर्गंधीयुक्त कचरा घेऊन जात असल्याचे गुन्हेशोध पथकाच्या निदर्शनास आले. पोलिसांनी आरटीओ कार्यालयासमोर वाहने थांबवून तपासणी केली असता कचरा वाहनाच्या वरपर्यंत भरलेला होता. त्यावर कोणतीही ताडपत्री झाकलेली नव्हती. कचऱ्यात पॉलीथिन, कपड्यांचे तुकडे, माती आदी घटक असल्याचेही समोर आले.

हा कचरा महानगरपालिका डम्पिंग डेपोमधून डेरला फाटा येथील खदाणीत विल्हेवाट लावण्यासाठी नेला जात असल्याची माहिती चौकशीत पुढे आली. विशेष म्हणजे संबंधित चालकांकडे कचरा वाहतुकीचा वैध परवाना नसल्याचेही पोलिसांच्या तपासात निष्पन्न झाले.

पोलिसांनी केलेल्या कारवाईत एमएच-२६-डीबी-७७१७ या हायवाचा चालक प्रज्वल सदाशिव दुधमल (२१) रा. धानोरा, ता. नांदेड, वाहन मालक गजानन किसनराव हंबर्डे (रा. विष्णुपुरी, ता. नांदेड) तसेच शिवलींग संभाजी संगेकर रा. लालवाडी, ता. नांदेड यांची नोंद करण्यात आली आहे. तसेच एमएच-४०-बीएल- ६१०५ या हायवाचा चालक नरहरी नामदेव धुतराज आणि वाहन मालक सदानंद संजय पुयड (रा. पुणेगाव, ता. नांदेड), पवन पांडुरंग काळे यांच्यावरही कारवाई करण्यात आली आहे.

उघड्यावर दुर्गंधीयुक्त कचरा वाहून नेत नागरिकांच्या आरोग्याला आणि जीविताला धोका निर्माण केल्याप्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, पोलीस उपनिरीक्षक आनंद चव्हाण व त्यांच्या सहकार्यांनी हि कारवाई केली.

## हिमायतनगर नगरपंचायतीत 'विठ्ठल नामाचा गजर'

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. १७ सप्टेंबर -**

हिमायतनगर नगरपंचायतीचा कारभार विठ्ठलाच्या भरोशावर सुरु असुन मागील काळात बनवाट स्वक्षऱ्या करुन लाखो रुपये लाटल्याची तक्रार करण्यात आली आहे. या तक्रारीमुळे हिमायतनगर नगरपंचायत चांगलीच चर्चेत अली असुन सध्या हिमायतनगर नगरपंचायतीमध्ये 'विठ्ठल नामाचा गजर 'सुरु असल्याची चर्चा सुरु आहे.

हिमायतनगर येथे सन २०२३-२४ मधील एका देयक प्रकरणात बांधकाम विभाग प्रमुखांची बनावट स्वाक्षरी करून सुमारे ८ लाख ५५ हजार १२५ रुपयांचे देयक अदा करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. हिमायतनगर येथील लिपिकाने वर्ष २०२३-२०२४ देयक अदा करण्यासाठी बांधकाम संहितेतील नमुना क्र. ६४ वर बांधकाम विभाग प्रमुख अधिकाऱ्याची बनावट स्वाक्षरी करून देयक अदा करण्यास मदत केली आहे. या भ्रष्टाचाराचे सर्व आवश्यक पुरावे देखील तक्रारदार नगरसेवक विठ्ठल ठाकरे यांनी सादर केले आहेत.




बांधकाम लिपीक विठ्ठल रामजी शिंदे यांनी यापुर्वी देखील शहरातील अंगणवाडी बांधकामासाठी मंजूर झालेल्या ४ लाखाच्या अनुदानातून, तत्कालीन सरपंच, ग्राममविकास अधिकारी यांच्या बनावट सह्या करून दिनांक ०६ ऑक्टोबर २०१० रोजी चेक क्र १६०७०० द्वारे परस्पर ५० हजार रुपये उचलून अपहार केला असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या तक्रारीत नगरसेवक विठ्ठल ठाकरे यांनी नमुद केले आहे.

या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत. या आदेशानंतर विठ्ठल शिंदे यांना बांधकाम विभागाचा पदभार काढण्यात आल्याचे तोंडी आदेश मुख्याधिकाऱ्यांनी देवुन तक्रारदाराचे 'समाधान' केले.

दरम्यान सन २०१० पासुन बनावट स्वाक्षऱ्यांचा हा प्रकार सुरु असल्याची चर्चा सुरु आहे. त्यातच तक्रार करणारेही 'विठ्ठल' आणि ज्यांच्या विरोधात तक्रार करण्यात आली ते देखील 'विठ्ठल'च असल्याने सध्या हिमायतनगर नगरपंचायतीमध्ये विठ्ठल नामाचा गजर सुरु असल्याचे दिसुन येत आहे.

## मुदखेड न्यायालयीन कर्मचाऱ्यांचे काळ्या फिती लावून कामकाज

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. १७ सप्टेंबर -**

मुदखेड येथील दिवाणी कनिष्ठ स्तर व दंडाधिकारी प्रथम स्तर न्यायालयातील कर्मचाऱ्यांनी विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी १६ सप्टेंबर रोजी काळ्या फिती लावून काम करत आंदोलन केले. राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाच्या आवाहनानुसार राज्यभरात या आंदोलनाचा पहिला टप्पा सुरू करण्यात आला आहे.

उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणेच दुय्यम न्यायालयांमध्ये कार्यरत न्यायालयीन कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी लागू करावी, तसेच 'समान काम, समान वेतन' या प्रमुख मागणीवर शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी कर्मचाऱ्यांची मागणी आहे. या मागण्यांसाठी यापूर्वी शासनाला आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता.

न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीसंदर्भात उच्च न्यायालयाने गठित केलेल्या न्यायमूर्तींच्या विशेष समितीचा अहवाल शासनाकडे सादर करण्यात आला आहे. मात्र, अहवाल सादर होऊनही मागील काही महिन्यांपासून या मागणीवर ठोस निर्णय झालेला नसल्याचे कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी असून, प्रलंबित मागण्यांबाबत शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

मुदखेड न्यायालयातील कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून काम करत शासनाच्या भूमिकेचा निषेध नोंदविला. समान स्वरूपाचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीमध्ये असमानता दूर करून न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या मागण्यांची पूर्तता करावी, अशी भूमिका आंदोलनाच्या माध्यमातून मांडण्यात आली.

दरम्यान, १६ सप्टेंबरपासून सुरू झालेला हा आंदोलनाचा पहिला टप्पा असून, मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाकडून देण्यात आला आहे. आंदोलनाचा अंतिम टप्पा म्हणून १७ नोव्हेंबर २०२६ पासून राज्यातील सुमारे ३४ हजार न्यायालयीन कर्मचारी बेमुदत संपावर जाणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

## घुंगराळ्यात स्वतंत्र पशुवैद्यकीय दवाखाना मंजूर करण्याची मागणी

**तभा वृतसेवा**
**नरसी, दि. १७ सप्टेंबर -**

तालुक्यातील घुंगराळा व परिसरातील शेतकरी मोठ्या प्रमाणावर पशुपालनावर अवलंबून आहेत. मात्र, घुंगराळा येथे स्वतंत्र पशुवैद्यकीय दवाखाना नसल्याने पशुधनाच्या उपचारासाठी शेतकऱ्यांना १० ते १५ किलोमीटर अंतर कापून जावे लागत आहे. त्यामुळे वेळेवर उपचार न मिळाल्याने पशुधनाच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होण्याबरोबरच शेतकऱ्यांना आर्थिक फटकाही सहन करावा लागत आहे.

घुंगराळा हे तालुक्यातील मोठे गाव असून परिसरातील अनेक गावांतील शेतकरी पशुपालन व्यवसाय करतात. दुभती जनावरे, शेळ्या, बैल आदी पशुधनावर अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह अवलंबून आहे. जनावर आजारी पडल्यास किंवा अचानक उपचाराची गरज भासल्यास जवळपास पशुवैद्यकीय सुविधा उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांची मोठी धावपळ होते. विशेषतः रात्रीच्या वेळी ही अडचण अधिक गंभीर बनते.



या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी भारतीय जनता पार्टी मोर्चा (अनुसूचित जमाती)चे नांदेड जिल्हा उपाध्यक्ष मोहनराव तुरटवाड यांनी राज्याच्या पशुसंवर्धन व ग्रामविकास मंत्री पंकजाताई मुंडे यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी घुंगराळा येथे स्वतंत्र पशुवैद्यकीय दवाखाना मंजूर करण्याची मागणी करणारे निवेदन सादर केले.

निवेदनात घुंगराळा गावासह परिसरातील आठ ते दहा गावांतील पशुधनासाठी सध्या पुरेशा पशुवैद्यकीय सुविधा उपलब्ध नसल्याचे नमूद करण्यात आले आहे. स्थानिक पातळीवर पशुवैद्यकीय दवाखाना सुरू झाल्यास पशुधनाला वेळेत उपचार मिळतील, तसेच शेतकऱ्यांचा वेळ, प्रवासाचा खर्च आणि होणारे आर्थिक नुकसान कमी होण्यास मदत होईल अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## दुष्काळी परिस्थितीची तातडीने दखल घ्यावी : आ. कोहळीकर

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. १७ सप्टेंबर -**

नांदेड येथे पालकमंत्री अतुल सावे यांच्या उपस्थितीत आयोजित दुष्काळी परिस्थितीच्या आढावा बैठकीदरम्यान हदगाव-हिमायतनगर विधानसभा मतदारसंघातील शेतकरी व ग्रामीण भागातील गंभीर परिस्थितीकडे आ. बाबुराव कदम कोहळीकर यांनी पालकमंत्री तसेच संबंधित अधिकाऱ्यांचे लक्ष वेधले.



हदगाव-हिमायतनगर मतदारसंघात मागील दोन महिन्यांपासून पावसाने मोठी उघडीप दिल्यामुळे खरीप हंगामातील सोयाबीन, कापूस, हळद, ऊस, मूग, उडीद, ज्वारी आदी पिकांवर मोठा परिणाम झाला आहे. पावसाअभावी पिकांची वाढ खुंटली असून अनेक ठिकाणी पिके वाया जाण्याच्या स्थितीत आहेत.

शेतकऱ्यांनी मोठ्या अपेक्षेने खरीप हंगामाची पिके घेतली होती. मात्र पावसाअभावी पिकांचे नुकसान झाल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. वाढता उत्पादन खर्च, कर्जबाजारीपणा आणि हातातून जाणारे पीक उत्पादन यामुळे शेतकऱ्यांसमोर गंभीर आर्थिक संकट निर्माण झाले आहे.

यावेळी आ. बाबुराव कदम कोहळीकर यांनी निवेदनाद्वारे मतदारसंघातील परिस्थिती शासनाच्या निदर्शनास आणून देत दुष्काळी परिस्थितीची तातडीने पाहणी करावी, पीक नुकसानीचे पंचनामे करावेत तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाच्या नियमानुसार तातडीने आर्थिक मदत व आवश्यक सवलती द्याव्यात, अशी मागणी केली.

यंदाच्या प्रतिकूल परिस्थितीमुळे सोयाबीन पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून उर्वरित खरीप पिकांनाही पावसाअभावी मोठा फटका बसत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी प्रशासनाने विलंब न करता प्रत्यक्ष शेतपातळीवर परिस्थितीचा आढावा घेऊन आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली.

शेतकऱ्यांच्या अडचणी शासनापर्यंत पोहोचवून त्यांना आवश्यक मदत मिळवून देण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात येईल, असे आ. बाबुराव कदम कोहळीकर यांनी यावेळी स्पष्ट केले.